# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

**एम. ए. भाग–२ : राज्यशास्त्र**

# आंतरराष्ट्रीय संबंधांचे सिद्धांत

## (Theory of International Relations)

**सत्र ३ : पेपर DSC-5**

नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२३–२४ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)

**प्रथमावृत्ती :** २०२१

**सुधारित आवृत्ती :** २०२३

एम. ए. (राज्यशास्त्र) भाग-२ पेपर **DSC-5**

सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ३००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-00-0

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
## शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) श्रीमती एस. एच. ठकार**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : राज्यशास्त्र ■**

अध्यक्ष - **डॉ. रविंद्र पांडुरंग भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. प्रकाश रामचंद्र पवार**
  राज्यशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. अरुण मारुतीराव चव्हाण**
  भोगावती महाविद्यालय, कुरुकली, जि. कोल्हापूर
- **डॉ. शिरीषकुमार धोंडिराम पवार**
  बाळासाहेब देसाई कॉलेज, पाटण, ता. कराड,
  जि. सातारा
- **डॉ. सचिन महादेव पाटील**
  श्रीमती कुसुमताई राजारामबापू पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. विक्रमराव एन. पाटील**
  शंकरराव जगताप जगताप आर्टस कॉलेज, वाघोली,
  जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मेघा संजय पाटील**
  कै. मालती व. पाटील कन्या महाविद्यालय,
  उरूण-इस्लामपूर, जि. सांगली
- **डॉ. संतोष केशव खडसे**
  कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, उरूण-इस्लामपूर,
  ता. वाळवा, जि. सांगली
- **डॉ. श्रद्धा विनोद कोठावळे**
  सहकारभूषण मा. एस. के. पाटील कॉलेज, कुरुंदवाड,
  ता. शिरोळ, जि. कोल्हापूर
- **डॉ. राहुल दत्ता मांडणीकर**
  श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, २९६८, 'सी',
  दसरा चौक, कोल्हापूर
- **प्राचार्य डॉ. बाळ अनंत कांबळे**
  धनंजयराव गाडगीळ कॉलेज ऑफ कॉमर्स, सातारा
- **डॉ. वासंती प्रतापचंद्र रासम**
  घरोंदा ३८४/३८५ आर. के. नगर सोसायटी नं. ५,
  मोरेवाडी, कोल्हापूर
- **डॉ. अनिल देवगौडा पाटील**
  आर्टस, कॉमर्स अॅण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. सिकंदर आप्पासाहेब जमादार**
  राजहंस हौसिंग कार्पोरेशन प्लॉट नं. ०९, विजय नगर,
  इस्ट सांगली मिरज रोड, सांगली
- **डॉ. रमेश दिनकर डुबल**
  किसन वीर महाविद्यालय वाई, जि. सातारा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या माध्यमातून शिक्षणापासून व्यक्तीगत आणि भौतिक परिस्थितीने दूर गेलेल्या अनेकांना पुन्हा शिक्षण प्रवाहात येण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली  याचे संपूर्ण श्रेय विद्यापीठाला जाते. 'ज्ञानमेवामृतम्' या शिवाजी विद्यापीठाच्या ब्रीद वाक्याप्रमाणे ज्ञानरूपी अमृत प्राप्त करण्याची संधी सर्वांसाठी उपलब्ध करून दिली. याच दूरशिक्षण केंद्राद्वारे नोंद झालेल्या बहिःस्थ विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययन साहित्य उपलब्ध करून दिले आहे.

हे पुस्तक एम. ए. भाग दोन च्या राज्यशास्त्र विषयाच्या आवश्यक पेपर क्रमांक DSC-5 सत्र तीन साठी 'आंतरराष्ट्रीय संबंधांचे सिद्धांत' हे विद्यार्थ्यांच्या हाती देताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

आंतरराष्ट्रीय संबंधांचे सिद्धांत यामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप आणि व्याप्ती, आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सिद्धांत, राष्ट्रीय सत्ता आणि निःशस्त्रीकरण, आंतरराष्ट्रीय संबंधाची प्रक्रिया या घटकांचा विस्ताराने अभ्यास करणार आहोत.

या पुस्तक निर्मितीमध्ये शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू मा. डॉ. डी. टी. शिर्के यांची प्रेरणा व प्रोत्साहन आम्हाला मिळाले त्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार. त्याचप्रमाणे राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रकाश पवार, राज्यशास्त्र अभ्यासमंडळ माजी अध्यक्ष डॉ. भारती पाटील, राज्यशास्त्र विभाग शिवाजी विद्यापीठ मधील प्राध्यापक, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सर्व सन्माननीय सदस्य, शिवाजी विद्यापीठ राज्यशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. शिवाजी पाटील, प्राचार्य डॉ. शिरिष पवार व अधिसभा सदस्य डॉ. वसंत पाटील व सर्व लेखक यांचे सहकार्य लाभल्याबद्दल त्या सर्वांचे मी आभार मानतो.

वरील सर्वांइतकेच महत्त्वाचे म्हणजे दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक प्रा. डॉ. डी. के. मोरे, केंद्रातील सर्व सहकारी विद्यापीठाचे सर्व पदाधिकारी यांचे सहकार्याबद्दल व तत्परतेबद्दल सर्वांचे मनःपूर्वक आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. (डॉ.) रविंद्र भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक


| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **डॉ. संजय सागरू सपकाळ**<br>श्रीमंत बाबासाहेब देशमुख महाविद्यालय, आटपाडी | १ |
| **प्रा. डॉ. नंदकुमार कोल्हापूरे**<br>शिवराज कला, वाणिज्य आणि डी. एस. कदम विज्ञान महाविद्यालय, गडहिंग्लज | २ |
| **प्रा. (डॉ.) रविंद्र भणगे**<br>राज्यशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | २ |
| **डॉ. सुर्यकांत लकाप्पा गायकवाड**<br>दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **प्रा. आर. जी. मोंगले**<br>राजा शिवछत्रपती कला, वाणिज्य महाविद्यालय, महागांव | ४ |

■ **संपादक** ■

**प्रा. (डॉ.) रविंद्र भणगे**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| १. | आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप आणि व्याप्ती | १ |
| २. | आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सिद्धांत | ३० |
| ३. | राष्ट्रीय सत्ता आणि नि:शस्त्रीकरण | ४७ |
| ४. | आंतरराष्ट्रीय संबंधाची प्रक्रिया | ८६ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२३-२४ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

सत्र-३ : घटक-१

# आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप आणि व्याप्ती

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ व व्याख्या

१.२.२ आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप

१.२.३ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विकास

१.२.४ आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती

१.२.५ आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचे महत्त्व

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.५ स्वयं-अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करता येईल.

२. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विकास व व्याप्ती स्पष्ट करता येईल.

३. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे महत्त्व जाणून घेता येईल.

## १.१ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय राजकारण ही नवीन स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राष्ट्राराष्ट्रातील संबंध हे संघर्षाचे किंवा मित्रत्वाचे असू शकतात. राज्यशास्त्राचा जनक ग्रीक विचारवंत

ॲरिस्टॉटलने माणूस हा स्वभावत: आणि त्याच्या गरजामुळे तो सामाजिक प्राणी आहे, त्याचप्रमाणे तो राजकीय प्राणी आहे. याचा अर्थ मानवाला आपल्या गरजा व विकासाकरिता समाजातच राहिले पाहिजे. एकमेकांच्या सहवासाशिवाय माणसाचा विकास व संरक्षण होऊ शकत नाही. हेच तत्व आंतरराष्ट्रीय संबंधात लागू पडते. कोणतेही राष्ट्र आंतरराष्ट्रीय संबंधापासून अलग राहू शकत नाही. आज विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे व जलद दळणवळण साधनांच्यामुळे पूर्वी दूर वाटणारी राष्ट्रे आता अधिक जवळची वाटू लागली आहेत. त्यामुळे विसाव्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणाला एक वेगळे स्वरूप प्राप्त झाले आहे.

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारण किंवा संबंध ही एक स्वतंत्र अभ्यास शाखा म्हणून विकसित झाली आहे. प्राचीन भारतीय व ग्रीक विचारवंत कौटिल्य, प्लेटो, ॲरिस्टॉटल यांनी एका स्वतंत्र राज्याने दुसऱ्या राज्यांशी कसे संबंध ठेवावेत. याविषयी आपल्या ग्रंथामध्ये उपदेश केला आहे. मॅकीयाव्हॅली याने तर धर्म, नीती व राजकारण अलग करून राजाने कसे वागावे या संबंधी राजाला उपदेश केला आहे. असे असले तरी इ.स. १९०० पासून आंतरराष्ट्रीय संबंधाकडे जगाचे लक्ष वेधले गेले. अमेरिकेत आंतरराष्ट्रीय राजकारण हा विषय शिकविण्यास प्रारंभ झाला. पुढे राज्यशास्त्राचा एक स्वतंत्र अभ्यासविषय म्हणून त्याचे महत्त्व वाढत गेले. 'आंतरराष्ट्रीय' हा शब्दप्रयोग इ.स. १७८९ मध्ये जेरीमी बेंन्थम यांनी सर्वप्रथम केला. आंतरराष्ट्रीय संबंध हे केवळ राजकारणापुरते मर्यादित नाहीत. त्यात राष्ट्राराष्ट्रातील राजकीय संबंधाबरोबरच आर्थिक, औद्योगिक, सैनिक शैक्षणिक, सामाजिक, तंत्रविज्ञान या संबंधाचा ही विचार केला जातो. म्हणून असे म्हणता येईल की, आंतरराष्ट्रीय राजकारण किंवा संबंध म्हणजे एका राष्ट्राचे दुसऱ्या राष्ट्राशी असलेले परस्पर संबंध होय.

राष्ट्रराज्याच्या उदयानंतरच आंतरराष्ट्रीय संबंधांना खरे महत्त्व प्राप्त झाले. इ.स. १६४८ च्या वेस्ट-फालिया तहानंतर युरोप खंडात राष्ट्रराज्यांच्या उदयाला चालना मिळाली आणि आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये राष्ट्रराज्ये ही महत्वाचा घटक बनली. त्यानंतरच राष्ट्रराज्यांतील संबंधाना एक वेगळे स्थान निर्माण झाले. पुढील काळात विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रामध्ये झालेली प्रगती, औद्योगिक क्रांती, राष्ट्राराष्ट्रामध्ये वर्चस्वासाठी सुरू झालेली स्पर्धा, नव्या जलमार्गाचा व नव्या भूप्रदेशांचा शोध, दळणवळणाच्या साधनांत झालेली सुधारणा इत्यादी कारणांमुळे जगातील अनेक राष्ट्रांचे परस्परांशी संबंध वाढू लागले. तथापि, वर सांगितल्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाला विसाव्या शतकातच सुरवात झाली.

## आंतरराष्ट्रीय राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंध :-

आंतरराष्ट्रीय राजकारण आणि आंतरराष्ट्रीय संबंध या दोन्ही शब्दामध्ये वेगवेगळे विचारप्रवाह दिसून येतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासकांनी आंतरराष्ट्रीय राजकारण या नावाला अधिक

पसंती दिली आहे. याउलट, इतर काही लेखकांनी आंतरराष्ट्रीय संबंधाला महत्त्व दिले आहे. तर अन्य कांही अभ्यासकांनी या विषयाला जागतिक राजकारण, आंतरराष्ट्रीय व्यवहार, जागतिक व्यवहार, आंतरराष्ट्रीय व्यवस्था अशा वेगवेगळ्या नावानी संबोधले आहे. अशा स्थितीत यातील फरक जाणून घेणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाला मॉर्गेन्थॉ व केनेथ थॉम्सन या लेखकांनी आंतरराष्ट्रीय संबंधाचे अविभाज्य अंग मानले आहे. परंतु या दोन्ही संज्ञा मध्ये पुढीलप्रमाणे फरक दाखविता येतो.

आंतरराष्ट्रीय संबंधात राज्याच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक या सर्व प्रकारच्या संबंधाचा समावेश होतो, परंतु आंतरराष्ट्रीय राजकारणात या सर्व संबंधाचा राजकीय दृष्टीकोनातून विचार केला जातो. म्हणजेच आंतरराष्ट्रीय राजकारणात ज्या संबंधातून क्रिया आणि प्रतिक्रिया निर्माण होतात, अशाच संबंधाचा प्रामुख्याने विचार होतो. आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास वर्णनात्मक असतो तर आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास प्रामुख्याने विश्लेषणात्मक असतो. आंतरराष्ट्रीय संबंधात सत्यघटनांचा अभ्यास केला जातो, तर आंतरराष्ट्रीय राजकारणात एखाद्या वर्तमान घटनेचे भूतकालीन संदर्भ व भविष्यकालीन परिणामाच्या दृष्टिकोणातून विश्लेषण केले जाते. आधुनिक आंतरराष्ट्रीय राजकारणाचा हेतू आंतरराष्ट्रीय संघटनाद्वारे जागतिक शांतता प्रस्थापित करणे हा असतो व आंतरराष्ट्रीय संबंधाचा हेतू देखील हाच आढळून येतो.

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये विज्ञान, शिक्षण, तंत्रज्ञान, आंतरराष्ट्रीय संघटना, आंतरराष्ट्रीय राजकारणाची उद्दिष्टे इत्यादीबाबत व्यापक दृष्टीकोणातून अभ्यास केला जातो तर आंतरराष्ट्रीय राजकारणात मर्यादित अर्थाने त्याकडे पाहिले जाते. यामध्ये राजनय आणि राष्ट्राराष्ट्रातील परस्पर संबंधाचा अभ्यास केला जातो. उदा. भारत-पाकिस्तान, भारत-अमेरिका, भारत-चीन, भारत-जपान, आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये इतर राष्ट्रांशी आर्थिक संबंध, राजकीय, संबंध, सांस्कृतिक संबंध कसे सुधारतील व परस्परांच्या देशातील नागरिकांना याचा लाभ कसा होईल हे पाहिजे जाते. तर आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आपल्या राष्ट्रांच्या सीमांचा विस्तार कसा होईल, दुसऱ्या राष्ट्रातील साधनांचा वापर आपल्याला कसा होईल असा स्वार्थी हेतू असतो.

आंतरराष्ट्रीय संबंधात अनेक सिध्दांत, संकल्पना, शास्त्रीय दृष्टीकोन यामध्ये वर्तनवादी दृष्टीकोण, निर्णय निर्धारण प्रक्रिया इत्यादी घटकांचा अभ्यास केला जातो. आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती मर्यादित स्वरूपात आहे. यामध्ये युध्द, तह, करार, शांतता, राजनय इत्यादीवर भर दिला जातो. आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये प्रत्येक राष्ट्रामध्ये राहणाऱ्या प्रत्येक व्यक्ती समूहाचे हित, संरक्षण, आरोग्य इत्यादी बाबी डोळ्यासमोर ठेवून ध्येयधोरणे ठरवली जातात तर आंतरराष्ट्रीय राजकारणात फक्त स्वत:च्या राष्ट्राचे हित पाहिले जाते व त्यानुसार ध्येय धोरणे ठरवली जातात.

अशा प्रकारचे काही फरक या दोन्ही विषयांमध्ये दिसून येत असले तरी हे दोन्ही विषय परस्परांना पूरक आहेत. दोन्ही विषयाच्या अभ्यासांची विभागणी काटेकोरपणे करता येणार नाही. हॅन्स

मॉर्गेन्थॉ व थॉम्सन या विचारवंतांनी आंतरराष्ट्रीय राजकारण हा आंतरराष्ट्रीय संबंधाचा गाभा आहे, असे म्हटले आहे, ते यामुळेच. आंतरराष्ट्रीय राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंध हे दोन्ही शब्द एकाच अर्थाने वापरले जातात. परंतु दोन्ही शब्दांचे अर्थ त्यांचा आशय आणि त्यांच्या विषयाची मांडणी ही वेगवेगळी आहे. यात काही राजकीय विचारवंत या विषयाच्या नावासंबंधीच्या चर्चेत न पडता आंतरराष्ट्रीय राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंध या दोन्ही शब्दांचा सोयीप्रमाणे वापर करताना दिसतात.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ व व्याख्या

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अर्थ स्पष्ट करताना राजकीय विचारवंतानी वेगवेगळी मते व्यक्त केली आहेत. मात्र एका मुद्यावर मात्र सर्वांचे एकमत आहे. तो मुद्दा म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे गतिशील स्वरूप हा होय. आंतरराष्ट्रीय राजकारण ही परिवर्तनशील प्रक्रिया असून तिच्यामध्ये सातत्याने परिवर्तन होत आले आहे. ही गोष्ट सर्वांनीच मान्य केली आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या या बदलत्या किंवा गतिशील स्वरूपामुळे त्याचा अर्थ लावताना विचारवंतामध्ये मतभिन्नता निर्माण होणे स्वाभाविकच आहे. जगातील सार्वभौम राष्ट्रे आपल्या हितसंबंधाच्या रक्षणासाठी करीत असलेल्या प्रयत्नातूनच आंतरराष्ट्रीय राजकारण आकाराला येते आणि त्याला विशिष्ठ दिशा प्राप्त होते. जगातील सर्वच राष्ट्रे आपल्या हितसंबंधांच्या रक्षणासाठी एकमेकांशी संबंध प्रस्थापित करू लागतात.

त्यांच्यातील हे संबंध काही वेळा सहकार्याचे असतात. तसेच ते संघर्षाचेही असतात. अशाप्रकारे जगातील राष्ट्रांमध्ये विविध प्रकारच्या आंतरक्रिया घडत असतात. निरनिराळ्या राष्ट्रांमधील आपापसातील संबंध आणि त्यांच्यात घडून येणाऱ्या आंतरक्रिया किंवा क्रिया-प्रतिक्रिया म्हणजेच आंतरराष्ट्रीय राजकारण होय.

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विविध विचारवंतांनी व्याख्या पुढीलप्रमाणे केल्या आहेत.

१. **हॅन्स जे मॉर्गेन्थॉ :-**

''आंतरराष्ट्रीय राजकारण संबंध म्हणजे राष्ट्राराष्ट्रांतील संघर्ष व सत्तेचा वापर करण्याचा प्रयत्न होय.''

२. **हार्टमन :-**

''ज्या प्रक्रियांद्वारे विभिन्न राज्ये आपल्या राष्ट्रीय हितसंबंधाची जुळवणी इतर राज्याच्या हितसंबंधाशी करीत असतात, त्या प्रक्रियांना आंतरराष्ट्रीय राजकारण असे म्हणतात.''

### ३. हेराल्ड व मार्गरिट स्पाऊट :–

''आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे स्वतंत्र राजकीय समाजाचे उद्देश किंवा हितसंबंध यांच्याबाबत परस्परातील विरोध व संघर्षामुळे निर्माण होणाऱ्या क्रिया व प्रतिक्रियांचा अभ्यास होय.''

### ४. चार्लस् श्लैश्वर :–

''आंतरराष्ट्रीय संबधांमध्ये राजकीय व बिगरराजकीय अशा सर्व प्रकारच्या आंतरराज्य संबधाचा समावेश होतो.''

### ५. पामर व पार्कीन्स :–

''आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचा संबंध मुख्यत्वेकरून राज्यपध्दतीशी असतो.''

### ६. **नॉर्मन पेडलफोर्ड** आणि **जॉन लिंकन :–**

''आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राज्याच्या धोरणातील परिवर्तनशील सत्ता संबंधाच्या पध्दतीमध्ये घडून येणाऱ्या क्रिया प्रतिक्रिया होय.''

### ७. केनेथ थॉमसन :–

''राष्ट्राराष्ट्रांतील स्पर्धा तसेच त्यांच्यातील संबंध बिघडविण्यास किंवा सुधारण्यास कारणीभूत होणारी परिस्थिती व संस्था यांचा अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारण होय.''

### ८. फेलिक्स ग्रॉस :–

''राष्ट्रांच्या परराष्ट्रीय धोरणांचा अभ्यास म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास होय.''

### ९. क्विन्सी राईट :–

''आपल्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रमुख गटांवर प्रभाव पाडण्याची आणि नियंत्रण ठेवण्याची कला म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारण होय.''

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या वरील विचारवंतांच्या व्याख्याच्या अभ्यासानंतर राजकीय विचारवंतात बरीच मतभिन्नता असल्याचे स्पष्ट होते. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या काही विचारवंतानी जगातील सार्वभौम राज्यांमध्ये घडत असलेल्या राजकीय आंतरक्रियांचा समावेश या विषयाच्या अभ्यासात होत असल्याचे म्हटले आहे. राज्याराज्यातील संबंधाचा विचार करताना त्यांनी राजकीय संबंध विशेष महत्त्वाचे मानले आहेत. काही विचारवंतांनी राष्ट्राराष्ट्रांत सतत चालू असलेल्या सत्तासंघर्षाच्या अध्ययनावर विशेष भर दिला आहे. काही विचारवंतानी मात्र याहून व्यापक दृष्टिकोन स्वीकारला आहे. त्यांच्या मते, आंतरराष्ट्रीय राजकारणात राज्याराज्यांमधील राजकीय व बिगरराजकीय अशा सर्व

प्रकारच्या संबंधांचा समावेश होतो, म्हणून त्यांनी 'आंतरराष्ट्रीय राजकारण' याऐवजी 'आंतरराष्ट्रीय संबंध' या शब्दप्रयोगास अधिक महत्त्व दिल्याचे दिसून येते.

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय संबंधातही शक्ती ही गोष्ट महत्त्वाची असल्याचे दिसून येते. महाशक्ती आज महासंहारक अशा शस्त्रास्त्रांची, अण्वस्त्रांची, प्रक्षेपास्त्रांची निर्मिती करून आपल्या शक्तीत वाढ करीत आहे. काही राष्ट्रे शस्त्र-अस्त्र निर्मिती करून आपल्या शक्तीत वाढ करीत आहेत तर काही राष्ट्रे शस्त्र-अस्त्र निर्मिती करू शकत नाहीत. ती अन्य मार्गाने आपले संरक्षण करण्याचा प्रयत्न करतात. याचा अर्थ प्रत्येक राष्ट्र युध्दासाठी नेहमीच तयार असते असा नाही. युध्द हे कोणालाच परवडणारे नाही. आज अमेरिका, रशिया, चीन, भारत-जपान इत्यादी अनेक राष्ट्रात जे सहकार्याचे वातावरण आहे ते संघर्ष, युध्द टाळण्याच्या व शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न आहे.

अशा परिस्थितीत शक्तीचा प्रभाव नसतो. तसेच शक्तीचा अभाव असतो, असेही म्हणता येणार नाही. प्रत्येक राष्ट्र जे कार्य दुसऱ्या राष्ट्रासाठी करीत असते ते सर्व शक्तीवर आधारित असते असेही म्हणता येणार नाही. जगातील सर्व राष्ट्रे सारख्याच प्रमाणात आंतरराष्ट्रीय राजकारणात भाग घेत नसतात. आंतरराष्ट्रीय राजकारणात काही राष्ट्रांचा भाग जास्त असतो, तर काहींचा कमी प्रमाणात असतो. आज आंतरराष्ट्रीय राजकारणात अमेरिका, ब्रिटन, रशिया, फ्रान्स साम्यवादी चीन, भारत इत्यादी अनेक देश मोठ्या प्रमाणात भाग घेताना दिसून येतात. परंतु गेली पन्नास-साठ वर्षांपूर्वी इंग्लंड, जर्मनी, फ्रान्स, इटली या राष्ट्रांचाच आंतरराष्ट्रीय राजकारणात दबदबा होता. यावरून आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये राष्ट्रा-राष्ट्रांमधील संबंध त्यांची शक्ती आणि सामर्थ्य सतत बदलत जाते अशा सर्व घटनांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारणात होत असतो.

## १.२.२ आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप

आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप हे वेगवेगळ्या कालखंडात बदललेले दिसून येते. आज आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप मोठ्या प्रमाणात व्यापक बनलेले आहे. प्राचीन काळी हे स्वरूप अतिशय मर्यादित होते. ते डावपेचात्मक व सैनिकी स्वरूपाचे होते, त्या काळात अनेक राष्ट्रांची लोकसंख्याही मर्यादित असल्यामुळेच अशी राष्ट्रे पूर्णपणे स्वावलंबी स्वरूपाची होती. आधुनिक काळात मानवाने विज्ञान-तंत्रज्ञान केलेल्या प्रगतीमुळे व दळणवळणाच्या वेगवेगळ्या क्षेत्रात झालेल्या बदलामुळे राष्ट्राराष्ट्रातील अंतर कमी होऊन ती एकमेकांच्या अगदी जवळ आली आहेत.

आज आधुनिक काळात राष्ट्रांची लोकसंख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे त्यांच्या गरजाही मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. त्यामध्येच मानवाने अतिसंहारक शस्त्रास्त्रे निर्माण केल्यामुळे जागतिक राजकारणात तणावाची परिस्थिती निर्माण झाली. प्रत्येक राष्ट्र संरक्षणासाठी व इतर गरजाच्या

पूर्ततेसाठी एकमेकांच्यावर अवलंबून राहू लागली. त्याचवेळी दुसरीकडे अशा तणावाच्या परिस्थितीमधून जगाला बाहेर काढण्यासाठी आणि जागतिक शांतता व सुरक्षिततेसाठी आंतरराष्ट्रीय संघटनेच्या निर्मितीवर भर देण्यात आला. यातूनच आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपाच्या कक्षा व्यापक झालेल्या आपणास दिसून येतात.

**१. आंतरराष्ट्रीय राजकारण एक स्वतंत्र अभ्यासशाखा :-**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपाला आधुनिक काळात एक स्वतंत्र दर्जा मिळाला आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर या विषयाला अंतर्गत राजकारण आणि आंतरराष्ट्रीय राजकारण असे दुहेरी स्वरूप प्राप्त झाले आहे. मॉर्गेथॉ, क्विन्सी राईट, मेनिंग, कॉपर या अभ्यासकांनी त्याला आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयास एक स्वतंत्र अभ्यास शाखा म्हणून मान्यता दिली. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करताना कार्यकारण संबंध स्पष्ट केले जातात. विशिष्ट परिस्थितीत राष्ट्रे आपआपसात कशा पध्दतीने संबंध ठेवतात, कसे व्यवहार करतात. या संबंधाचा अभ्यास केला जातो. रिचर्ड सी. स्नायडर, मॉर्गेथॉ, फ्रेड स्लायडरमन, चार्ल्स मेकलेलॅन्ड या अभ्यासकांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाला महत्व आणि स्वतंत्र दर्जा देण्याचा प्रयत्न केला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयास डॉ. महेंद्रकुमार या विचारवंताने पाहिजे तेवढ्या प्रमाणात स्वतंत्र विषयाचा दर्जा प्राप्त झालेला नसला तरी भविष्यकाळात स्वतंत्र अभ्यास, विषयाचा दर्जा प्राप्त करण्याचे प्रयत्न चालू असल्याचे म्हटले आहे.

**२. आंतरराष्ट्रीय राजकारण एक सामाजिक शास्त्र आहे :-**

आंतरराष्ट्रीय राजकारण हा सामाजिक शास्त्राचा विषय आहे. त्याचा संबंध मानवी व्यवहारांशी, वर्तनाशी येत असतो. मानवी वर्तन परिवर्तनीय, चंचल अनिश्चित असते. तसेच अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, नीतिशास्त्र, इतिहास अशा सामाजिक शास्त्रांप्रमाणेच आंतरराष्ट्रीय राजकारण हे साामजिक शास्त्र आहे. आंतरराष्ट्रीय राजकारण हा विषय रसायनशास्त्र, भौतिकशास्त्र या विषयांप्रमाणे शास्त्र म्हणता येणार नाही. भौतिकशास्त्राप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारणात निरीक्षण, परीक्षण, प्रयोग करून योग्य स्वरूपाचे निष्कर्ष काढता येत नाहीत. मात्र आंतरराष्ट्रीय राजकारणात शास्त्रशुध्द पध्दतीने अचूक निष्कर्ष काढले जात नसले तरी निरीक्षण, परीक्षण करून वास्तववादी स्वरूपाचे निष्कर्ष काढले जातात.

विसाव्या शतकात व उत्तरार्धात आंतरराष्ट्रीय राजकारण हा केवळ राज्यशास्त्रातील अभ्यास विषय राहिला नसून एक स्वतंत्र अभ्यास विषय बनला आहे. आजही अभ्यासकामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारण हा स्वतंत्र अभ्यास आहे की नाही, याबाबत परस्परविरोधी मते दिसून येतात. क्विन्सी राईट, मॉर्गेन्थॉ, मेनिंग, कॅरलिन एम. कँपर, रिचर्ड स्नायडर इ. अभ्यासकांच्या मते, आंतरराष्ट्रीय राजकारण हा केवळ इतिहास किंवा राज्यशास्त्राचा भाग नसून एक व्यापक असा स्वतंत्र अभ्यास

विषय आहे.

### ३. आंतरराष्ट्रीय राजकारण ही एक कला :–

एखादे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपलब्ध साधनाचा कौशल्याने केलेला वापर म्हणजे कला होय. कलेचा हा अर्थ विचारात घेतल्यास आंतरराष्ट्रीय राजकारण ही एक कला आहे. असे म्हटल्यास ते फारसे चुकीचे ठरणार नाही. कारण आंतरराष्ट्रीय राजकारणात जगातील विविध राष्ट्रे आपल्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी प्रयत्नशील असतात. आपले हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी प्रत्येक राष्ट्र इतरावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न करते. परराष्ट्र संबंधाच्या माध्यमातून ते साधण्यावर भर दिला जातो. एखाद्या राष्ट्राने इतर राष्ट्रावर प्रभाव पाडण्याचे चालविलेले प्रयत्न ही एक कलाच आहे. परराष्ट्रधोरणाची व्याख्या करताना असे म्हटले जाते की, परकीय राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करण्यासाठी सरकारने योजनाबध्द रीतीने आखलेले धोरण आणि केलेली कृती म्हणजे परराष्ट्र धोरण होय.

कोणत्याही गोष्टीबाबत योजनाबध्द रीतीने धोरण आखणे आणि कृती करणे यांत कौशल्याचा भाग अधिक असतो. म्हणून परराष्ट्र धोरणाची यशस्वीरित्या अंमलबजावणी करणे किंवा राबविणे ही एक श्रेष्ठ दर्जाची कला आहे. राजनयिक डावपेचामार्फत इतर राष्ट्रांशी तह, करार, मैत्री या मार्गांनी आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करीत असताना राजकीय नेते आपल्या मुत्सद्देगिरीने, चातुर्याने व उपलब्ध साधन सामग्रीचा वापर करून आपल्या राष्ट्राचे संरक्षण आणि संवर्धन करीत असतात.

### ४. आंतरराष्ट्रीय राजकारण एक तत्वज्ञान :–

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास तात्वीक पध्दतीने करण्याचा प्रारंभ विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून झाला. राजकीय अभ्यासक राष्ट्राराष्ट्राचे संबंध कसे आहेत व कसे असावेत याचे विवेचन तात्विक भूमिकेतून करीत आहेत. आंतरराष्ट्रीय राजकारण ही एक कला असल्याने तिचे अस्तित्व तत्वज्ञानाच्या आधाराने जोपासले आहे. उदा. हिटलरने नाझी तत्वज्ञान, मुसोलिनीने फॅसिस्ट तत्वज्ञान, लेनिन व स्टॅलिन, माओ यानी साम्यवादी तत्वज्ञान निर्माण करून सत्ता प्राप्त केली. जागतिक शांतता, मानवतावाद, शांततामय सहजीवन, सहकार्य, समता, सामाजिक न्याय यासाठी उदारमतवादी लोकशाहीचे तत्वज्ञान निर्माण केलेले आहे. अलीकडच्या काळात हे विकसीत झालेले तत्वज्ञान प्रत्यक्षात येण्यासाठी अमेरिकन अध्यक्ष केनेडी व पंडित नेहरू यांच्या अलिप्ततावादी चळवळींचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप हे तात्वीक झाले आहे.

### ५. आंतरशास्त्रीय दृष्टिकोनाचा विषय :–

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारण हा विषय आंतरशास्त्रीय झाला आहे. आज कोणत्याही सामाजिक शास्त्राचा अभ्यास स्वतंत्रपणे केला जाऊ शकत नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा संबंध

समाजशास्त्र, भूगोल, इतिहास, अर्थशास्त्र, तत्वज्ञान, आंतरराष्ट्रीय कायदा. या सामाजिक शास्त्राशी येतो. त्यांना सामाजिक शास्त्राची मदत घ्यावी लागते. आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या घटनाचे स्वरूप समजण्यासाठी त्यांचा विचार करावा लागतो. युध्द व शांततेच्या अभ्यास करताना भौगोलिक रचना व मानसिकतेचाही अभ्यास करावा लागतो. अशा अभ्यासाचा आंतरराष्ट्रीय व्यवहारावरही प्रभाव पडत असतो. इतर शास्त्रांच्या अभ्यासामुळे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात विविधता निर्माण झाली आहे. प्रत्येक राष्ट्र आपल्या हिताची जोपासना करण्यासाठी दुसऱ्या राष्ट्रातील विविध विषयाचे आकलन करूनच संबंध प्रस्थापित करीत असते, त्यामुळे ही स्वतंत्र आंतरशास्त्रीय विद्याशाखा निर्माण होते.

## ६. संघर्ष आणि समन्वयाचे शास्त्र :-

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राराष्ट्रात मैत्रीचे व शत्रुत्वाचे असे संबंध असू शकतात. मैत्रीपूर्ण संबंधात परस्पर सहकार्य, देवाणघेवाण, सामंजस्य इत्यादी गोष्टी अभिप्रेत असतात. तर शत्रुत्वाच्या संबंधात मतभेद, संघर्ष, युध्द, आक्रमण इ. गोष्टी अभिप्रेत असतात. उदा. भारत-चीन संबंध सुरवातीला मैत्रीचे होते. इ.स. १९६२ मध्ये चीनने आक्रमण केल्यानंतर संबंध बिघडले. पुन्हा भारत-चीन संबंध मैत्रीपूर्ण, सहकार्याच्या दृष्टीने वाढविण्याचा प्रयत्न होत आहे. भारतीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तेवर आल्यापासून विविध राष्ट्रांना भेटी देऊन मैत्रीचे आणि सहकार्याचे संबंध वाढविण्यास सुरवात केली आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप १९४५ पर्यंत सत्तेसाठी चाललेला संघर्ष अशा प्रकारचे होते. आंतरराष्ट्रीय संबंधात राष्ट्रहित आणि राष्ट्रशक्ती या दोन तत्वांना अतिशय महत्व प्राप्त झाले होते. त्यामुळे त्यावेळच्या राष्ट्राराष्ट्रातील संबंधाचा उद्देश स्पर्धा, संघर्ष आणि शत्रुत्वाची भावना हा होता. दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात अनेक घटना घडत गेल्या, त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपात परिवर्तन होण्यास सुरवात झाली. संघर्षाऐवजी सहकार्य, युध्दाऐवजी शांतता आणि शत्रुत्वाऐवजी मित्रत्व अशा प्रकारचे परिवर्तन आंतरराष्ट्रीय संबंधात घडून आले ते पुढीलप्रमाणे.

## ७. नवीन सार्वभौम राज्याचा उदय :-

आधुनिक काळात नवीन सार्वभौम राज्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ झाली. साम्राज्यवाद व वसाहतवादच्या अंतामुळे जागतिक राजकारणाचे केंद्र म्हणून युरोपचे महत्व संपले. त्याकाळी जगाचे राजकारण म्हणजे युरोपचे राजकारण असे समीकरण होते. दुसऱ्या महायुध्दानंतर आशिया, आफ्रिका खंडातील अनेक राष्ट्रे स्वतंत्र झाली. याचा परिणाम आंतरराष्ट्रीय राजकारणावर झाला व युरोपचे वर्चस्व असलेले नाहीसे झाले. संयुक्त राष्ट्र संघटनेची सदस्य संख्या १९४५ मध्ये ५१ होती. आज या संघटनेची सदस्य संख्या १९२ एवढी आहे. थोडक्यात, नवीन राज्याच्या उदयामुळे आंतरराष्ट्रीय

राजकारणाला खऱ्या अर्थाने आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासामध्ये काही ठरावीक राष्ट्रांच्या हितसंबंधाचा विचार न करता सर्वच स्वतंत्र राष्ट्रांच्या हितसंबंधाचा विचार करावा लागतो. आर्थिक विकास, प्रशासकीय स्थिरता, वाढती लोकसंख्या, संरक्षण व्यवस्था इत्यादी अनेक घटकांचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर परिणाम झाला.

## ८. लोकशाही शासनाचा विकास :-

आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूपात बदल घडवून आणण्याचे कारण म्हणजे लोकशाहीकरणाला आलेला वेग होय. पूर्वी परराष्ट्र धोरणात भाग घेणाऱ्या व्यक्तींची संख्या थोडी होती. सत्ताधीश, राजनयज्ञ यांची मक्तेदारी होती. लोकमताला फारसे महत्त्व दिले जात नव्हते. पण दुसऱ्या महायुध्दानंतर शांततामय जीवनाची आवश्यकता, संयुक्त राष्ट्रसंघटनेचा उदय, स्वतंत्र राष्ट्रांचा उदय, अशा अनेक कारणामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणावर लोकमताचा प्रभाव पडू लागला. आंतरराष्ट्रीय पातळीवर वृत्तपत्रे, राजकीय पक्ष, लोकसंघटना, ह्या आपली मते प्रकट करू लागल्या. त्यामुळे परराष्ट्र धोरण ठरवताना सत्ताधाऱ्यांना या लोकमताची नोंद घेणे भाग पडले. अमेरिकेने दक्षिण व्हिएतनाम मध्ये साम्यवादी गनिमांशी लढण्यासाठी स्वत:चे सैन्य पाठवले. मात्र अमेरिकेतील जनतेच्याच या युध्दाला विरोध असल्या कारणाने अमेरिकन शासनाला व्हिएतनाममधून आपले सैन्य मागे घ्यावे लागले, त्याप्रमाणे महासत्तांच्या अण्वस्त्राचे तळ आपल्या देशात उभारण्याबाबत, युरोपीयन जनतेने वेळोवेळी आपला विरोध दर्शविल्यामुळे त्याची दखल राज्यकर्त्यांना घ्यावी लागली. अशाप्रकारे परराष्ट्र धोरणामध्ये जनतेचा सहभाग वाढत चालला आहे.

## ९. वैज्ञानिक व तांत्रिक क्षेत्रातील विकास :-

विज्ञान आणि तांत्रिक क्षेत्रात झालेल्या प्रचंड प्रगतीने आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलून टाकले आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर अणुतंत्रज्ञानाचा वापर शस्त्रनिर्मितीमध्ये होऊ लागला. विज्ञान-तंत्रज्ञानाचा वापर शस्त्रनिर्मितीमध्ये होऊ लागला. विज्ञान-तंत्रज्ञानाचा विकास हा आधुनिक युगामध्ये सतत चालूच आहे. अतिसंहारक अशा अण्वस्त्रांची निर्मिती, अण्वस्त्र सज्ज जेट विमाने, अणुशक्तीवर चालणारी क्षेपणास्त्रे, पाणबुड्या, अनेक ठिकाणी उभारलेले अण्वस्त्रांचे तळ, एकाचवेळी अनेक ठिकाणी मारा करणारी क्षेपणास्त्रे यामुळे अण्वस्त्र सज्ज अशा बड्या राष्ट्रांकडे प्रचंड मोठी संहारक शक्ती निर्माण झाली. लष्करी सामर्थ्याला त्यामुळे एक नवेच महत्त्व प्राप्त झाले. चंद्र व मंगळावर मानवाने पदार्पण केले आहे, याचाही विचार करावा लागतो. युध्द हे दोन सैन्यातील लढाई हे स्वरूप बदलून ते सर्वंकष संहार करण्याची शक्ती असणारे बनले आहे.

## १०. महासत्तांचा उदय :-

आंतरराष्ट्रीय राजकारणात दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक राजकारणात अमेरिका व रशिया या

महासत्तांचा उदय झाला. या दोन राष्ट्रांच्याकडे असलेल्या प्रचंड अण्वस्त्र सामर्थ्यामुळे त्यांना हे स्थान प्राप्त झाले. त्या अगोदरचा काळ हा बहुकेंद्री राजकारणाचा होता. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रात अनेक सत्तेची केंद्रे निर्माण झाली. महासत्तांच्या उदयाने आंतरराष्ट्रीय राजकारणाचे बहुकेंद्री स्वरूप जाऊन त्याला द्विकेंद्री स्वरूप प्राप्त झाले. या दोन महासत्तांच्या अण्वस्त्र प्रभावामुळे इतर राष्ट्रांच्या संरक्षण व्यवस्था ही प्रभावहीन बनल्या. संरक्षणासाठी त्यांना बड्या राष्ट्रांचे सहाय्य घेणे आवश्यक ठरले. या गरजेतूनच अमेरिका व रशिया यांच्या प्रभुत्वाखालील लष्करी गटांचा उदय झाला. नंतरच्या काळात फ्रान्स, चीन, पश्चिम जर्मनी, भारत इ. अशा अनेक देशांनी अण्वस्त्र निर्मितीला प्रारंभ केला. त्यामुळे ध्रुवीकरण नाहीसे होऊन त्या जागी पुन्हा बहुध्रुवीकरणाने गट उदयाला आले.

### ११. जागतिक शांतता चळवळी :–

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये दुसऱ्या महायुध्दानंतर एका बाजूला संरक्षणासाठी संहारक शस्त्रांस्त्रांची निर्मिती तर दुसऱ्या बाजूने जागतिक शांततेची चळवळी जोर धरू लागल्या. प्रत्येक राष्ट्राला आपले परराष्ट्र धोरण ठरवताना शांततावादी तत्वाचा विचार करणे भाग पडले. आज आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राष्ट्रीय हितसंबंधातील परस्पर संबंध एवढे त्याचे स्वरूप राहिले नसून, राष्ट्रीय हितसंबंध आणि जागतिक शांतता या दोन तत्वांमधील नवे स्वरूप प्राप्त झाले. जागतिक शांतता राखण्याबद्दल जी भावना सर्वत्र निर्माण झाली. त्यामुळे शांतता रक्षणाच्या प्रश्नाचा विचार केल्याशिवाय जागतिक राजकारणाचा अभ्यास होऊ शकत नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाला एक नवा उद्देश प्राप्त झाला आहे.

### १२. आंतरराष्ट्रीय संघटनांचा उदय :–

शांतता स्थापन्याची चळवळ पहिल्या महायुध्दानंतर सुरू झाली व दुसऱ्या महायुद्धानंतर त्यास मिळालेली गती यामुळे शांतता प्रस्थापित करणे हे प्रत्येक राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाचे प्रमुख उद्दिष्ट बनले. पूर्वी शांतता प्रस्थापित करणे हा राज्यांचा उद्देश नव्हता. राष्ट्रीय हिताचे संरक्षण राज्ये युध्दांच्या मार्गाने करीत असत. म्हणून आजचे आंतरराष्ट्रीय राजकारण हे केवळ परस्पर विरोधी हितसंबंधाचा संघर्ष नव्हे तर राष्ट्रीय हित व शांततेसाठी चालू असलेला प्रयत्न आहे. राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्रसंघ, आंतरराष्ट्रीय न्यायालय, विश्वबँक, जागतिक व्यापारी संघटना, नाटो, सिटो, वार्सा इ. संघटनांनी आंतरराष्ट्रीय हितसंबंध जोपासण्यासाठी महत्वाची भूमिका पार पाडली आहे. आंतरराष्ट्रीय शांतता आणि मानवतावादी धोरण राबविण्याच्या दृष्टीने युनो आणि अन्य संघटना यांची भूमिका महत्वपूर्ण असल्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाला नवी दिशा मिळाली.

### १३. शास्त्रीय व सैध्दांतिक अध्ययन :–

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा सुरवातीच्या काळातील अभ्यास ऐतिहासिक दृष्टीकोणातून होत

असे. आज वर्तनवादाच्या दृष्टीकोनातून आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विचार केला जातो. वर्तनवाद्यांनी समाजशास्त्र, मानसशास्त्र, मानववंशशास्त्र यांचा आधार घेऊन अभ्यासाचे नवीन तंत्र शोधून काढले. उदा. व्यवस्थात्मक दृष्टीकोणाचा सिद्धांत, खेळ सिध्दांत, निर्णय-निर्माण सिध्दांत, संचार सिध्दांत, पर्यावरणात्मक सिध्दांत इत्यादी. यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या शास्त्रीय व सैध्दांतिक अध्ययनास चालना मिळाली.

### १४. विचार प्रवाहातील परिवर्तन :-

रशियामध्ये इ. स. १९१७ मध्ये क्रांती होऊन साम्यवादी समाजरचना स्थापन झाली. इटलीने फॅसिझम, जर्मनीने नाझीझम विचार प्रवाहाला चालना दिली. त्यामुळे दुसरे महायुध्द घडून आले. दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक राजकारणामध्ये अमेरिका महासत्ता म्हणून उदयाला आली आणि नवीन विचार प्रवाहांच्या संघर्षास सुरवात झाली. हुकूमशाही विरुध्द लोकशाही असा संघर्ष सुरू झाला. या संघर्षामुळे जगाची विभागणी दोन गटात झाली. साम्यवादी विचारांचे प्रतिनिधीत्व रशिया करीत होता. तर भांडवलशाही विचारांचे प्रतिनिधीत्व अमेरिका करीत होती. या दोन गटातील तणावाचे रूपांतर युध्दात होण्याऐवजी शीतयुध्दात झाले.

### १५. साम्यवादी समाजरचनेचा अस्त :-

आंतरराष्ट्रीय राजकारणाला शीतयुध्दाच्या माध्यमातून विशिष्ट स्वरूप मिळाले. रशियन अर्थव्यवस्था सावरावयाची असेल तर खुली अर्थव्यवस्था स्वीकारण्याशिवाय पर्याय नाही हे ओळखून मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी रशियाला आर्थिक संकटातून वाचवण्यासाठी पुनर्रचना व खुलेपणाचे धोरण स्वीकारले. या नवीन धोरणामुळे साम्यवादी राष्ट्रात आमूलाग्र बदल घडून आले व सोव्हिएट संघराज्याचे १९९१ मध्ये विघटन झाले. या विघटनाचा परिणाम साम्यवादी राष्ट्रावर होऊन पूर्व युरोपीय साम्यवादी, एकाधिकारशाही संपुष्टात आली. पोलंड, रूमानिया, हंगेरी आदी साम्यवादी राष्ट्रांना लोकशाही पध्दतीचा पर्याय अधिक परिणामकारक वाटला. यातूनच नव्याने शांततेचे वारे वाहू लागले व याचा प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणावर झाला.

### १६. तेलाच्या राजकारणाचा प्रभाव :-

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाला एक वेगळी दिशा देण्याचे कार्य तेल उत्पादक राष्ट्रांनी केले. विकसित व विकसनशील राष्ट्रांनी तेलाचे महत्व लक्षात घेऊन अरब राष्ट्रांनी तेलांच्या किंमतीत भयंकर वाढ केली. अरब राष्ट्रांनी इस्त्राईलवरही दबाव आणण्यास सुरवात केली. यातूनच अरब इस्त्राईल युध्द झाले. या संधीचा फायदा घेऊन रशिया व अमेरिका या देशांनी एकमेकांना शस्त्रात्राची मदत करण्यास सुरवात केली. या दोन्ही महासत्तांचा मुख्य उद्देश, तेल उत्पादक राष्ट्रावर

नियंत्रण ठेवण्याचा होता. इराक, कुवैत, सौदी अरेबिया अशा राष्ट्रांना मोठ्या प्रमाणात शस्त्रास्त्रे पुरवण्यात आली. याचा परिणाम इराक व कुवैत युध्दात दिसून आला. अमेरिकेने कुवैतच्या संरक्षणाच्या नावाखाली इराकच नष्ट करण्याचा प्रयत्न केला. थोडक्यात, तेलाच्या महत्त्वामुळे या महासत्ता तेल उत्पादक राष्ट्रावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत आहेत. तर इतर राष्ट्रे स्वत:च्या विकास कार्यासाठी तेलाच्या गरजेमुळे अरब राष्ट्राबरोबर आपले चांगले संबध प्रस्थापित व्हावेत यासाठी प्रयत्न करीत असतात.

**१७. लष्करी सत्तेतील बदल :–**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या नवीन स्वरूपामुळे राष्ट्रांच्या लष्करी सत्तेत बदल झाला आहे. त्यामुळे युध्दाचे स्वरूप बदललेले आहे. युध्द म्हणजे केवळ लढणे नसून विनाश घडविणे असे असल्यामुळे प्रत्यक्ष युध्द करण्यापेक्षा फक्त विध्वंसक युध्दसाहित्याची निर्मिती करणे हे प्रतिष्ठेचे बनले आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात लष्करी सत्ता प्राप्त करणे हे प्रमुख ध्येय मानले जाते. सोव्हिएट रशियाचे विघटन होऊनही रशियाकडे असलेल्या अण्वस्त्रधारी युध्दसाहित्यामुळे त्याचा प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणात आहे. या विचारांशी संबंधित दुसरी एक महत्वाची बाजू म्हणजे नवीन शस्त्रास्त्राविरुध्द संरक्षण करण्यात आलेली असमर्थता होय. आज युध्दातील विजय ही संकल्पना पूर्णपणे अर्थहीन ठरलेली आहे. कारण अणुयुध्द म्हणजे परस्परांचा नाश होय. आज सत्ता या संकल्पनेत क्रांतीकारक बदल झाला आहे. अणुयुगामुळे राष्ट्रांचे परराष्ट्रीय धोरण आणि आंतरराष्ट्रीय राजकारण अधिकच गुंतागुंतीचे बनले आहे.

## १.२.३ आंतरराष्ट्रीय राजकारणाचा विकास

आंतरराष्ट्रीय राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंध या विषयाचा अभ्यास पहिल्या महायुध्दानंतर करण्यास सुरवात झाली. जगातील अनेक देशांचे परस्परातील संबंध हे राष्ट्र राज्यांच्या निर्मितीसोबत निर्माण झालेले आहेत. ज्यावेळी राज्याचा उदय झाला, त्यावेळीच हे संबंध निर्माण झाले आहेत. प्राचीन काळातील इतिहास, धर्मग्रंथ, पुराणग्रंथ तसेच कौटील्याच्या अर्थशास्त्रात आंतरराज्य संबंधाबाबत भरपूर माहिती उपलब्ध आहे. पण त्याचा वस्तुनिष्ठ आणि हेतूपूर्वक स्वतंत्र अभ्यास पहिल्या महायुध्दानंतर सुरू झाला. राज्यशास्त्र व इतिहास अभ्यासकांना हा विषय स्वतंत्र अभ्यासला पाहिजे असे प्रकर्षाने जाणवू लागले.

पहिल्या महायुध्दामुळे जागतिक राजकारण, समाजकारण, अर्थकारण अशा अनेक गोष्टींवर परिणाम झाला. त्यामुळे समाजाला स्थैर्य, सहकार्य, शांतता, मानवी मूल्ये याबाबतची आस्था वाढू लागली व त्याचा अभ्यास करण्याची परिस्थिती निर्माण झाली. जागतिक राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंध याचा स्वतंत्र व व्यापक स्वरूपात अभ्यास व विचार केला पाहिजे असे जाणकारांचे मत बनले.

म्हणून आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासांची सुरवात झाली. गेल्या ९०-१०० वर्षाचा कालखंड हा आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचा कालखंड म्हणता येईल. या काळामधील काही अभ्यासाचे टप्पे-कालखंड काही प्रमुख घटनांच्या आधारे पाडता येतील, असे कालखंड प्रत्येक अभ्यासकाच्या दृष्टीकोणातून वेगवेगळे असू शकतात. केनेथ थॉम्सन यांनी चार कालखंड सांगितले आहेत, त्यावरून काही प्रमुख कालखंड अभ्यासाच्या सोयीचे व्हावे म्हणून त्याप्रमाणे सांगता येतील.

## १. पहिला कालखंड :-

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास हा पहिल्या महायुध्दानंतर म्हणजे १९१९ नंतर सुरू झालेला आहे. त्यामुळे पहिला कालखंड हा १९१९ पर्यंतच्या आंतरराष्ट्रीय राजकारण आणि संबंधाचा अभ्यास यात येईल. यातील पहिल्या कालखंडात जागतिक राजकारणाच्या अभ्यासापेक्षा इतिहासावरच आणि ऐतिहासिक घडामोडींवर जास्त लक्ष दिले जात होते. त्यामुळे या अभ्यासाविषयीचा सैध्दांतिक अभ्यासाचा विकास होऊ शकला नाही. कारण पहिले महायुध्द संपुष्टात येईपर्यंतचा कालखंड हा राजनैतिक इतिहासकारांच्या मक्तेदारीचा होता. तसेच आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासाची पार्श्वभूमीची माहिती देणारा हा कालखंड होय. ते राजकारणाचे विश्लेषण करून वर्तमान व भविष्यकाळासंबंधीचे विवेचन करीत नसत. या कालावधीमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सिध्दांत मांडण्याचा प्रयत्न झाला नाही.

## २. दुसरा कालखंड :-

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या ऐतिहासिक घडामोडीवरून वर्तमान आणि भविष्यकालीन राजकीय घडामोडींबद्दल विचार करायला भाग पडणारा, संकुचित राष्ट्रवादापेक्षा व्यापक जागतिक राजकारणाचा विचार करण्यास लावणारा मानवी समाज, राजकीय व्यवस्था निर्माण करणारा हा कालखंड होय. पहिल्या महायुध्दातील दुष्परिणामामुळे युध्द कशी टाळता येतील, शांतता कशी निर्माण करता येईल. या विषयीचा जागतिक नेते, विचारवंत, अभ्यासक प्रयत्न करून पहिल्या महायुध्दानंतर जगात पहिली 'राष्ट्रंसघ' ही पहिली आंतरराष्ट्रीय संघटना ही १९२० मध्ये स्थापन केली. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा गांभीर्याने अभ्यास व्हावा, विचार व्हावा. तसेच केवळ वेगवेगळ्या राजघराण्यांच्या, राष्ट्रांच्या, साम्राज्याच्या घटना म्हणून न पाहता मुत्सद्दी भावी पिढ्यांना अशा महाभयंकर युध्दास सामोरे जावू लागू नये या दृष्टीने प्रयत्न होऊ लागले.

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा योग्य प्रकारे अभ्यास व्हावा म्हणून १९१९ मध्ये वेल्स विद्यापीठात प्रसिध्द इतिहास तज्ज्ञ, प्रो. आल्फ्रेर्ड झिमर्न, प्रो. सी. के. बेन्स्टर यांच्या मार्गदर्शनाखाली ''आंतरराष्ट्रीय धोरण व राजकारण'' किंवा आंतरराष्ट्रीय संबंध अशा स्वतंत्र नावाने अभ्यासाला चालना मिळाली. या काळात जागतिक राजकारणातील विविध देशांमध्ये आंतरराष्ट्रीय संबंध याविषयाचा स्वतंत्र अभ्यास होऊ लागला. आंतरराष्ट्रीय वाद-संबंध या विषयावर विविध विचारवंत लिखाण करू लागले जसे

बर्डाल, फेनविक, विल्सन राईट, लर्श इ. विचारवंतांनी संकुचित राष्ट्रवादाऐवजी आंतरराष्ट्रवादाचा पुरस्कार केला असा हा दुसरा कालखंड होय.

### ३. तिसरा कालखंड :–

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा कालखंड हा विविध विचारवंतांनी १९३० ते १९४५ असा मानलेला आहे. दुसऱ्या कालखंडातील आदर्शवादी संकल्पना या एका दशकातच फोल ठरल्या. राष्ट्रसंघ हा अल्पावधीत अपयशी ठरला. हिटलर, मुसोलिनीचा उदय आणि विकास, रशियातील साम्यवादी क्रांतीचे वर्चस्व, जागतिक राजकारणात वसाहतवाद आणि साम्राज्यवाद यांच्याविरोधी वातावरण, बड्या राष्ट्रांचा अविवेकी व अतिरेकी राष्ट्रवाद व त्यातून निर्माण झालेले दुसरे महायुध्द या युध्दांतील संहारक शस्त्रे व अणुबॉम्बचा वापर, ब्रिटनपेक्षा अमेरिकेचे वाढते वर्चस्व आणि त्याचा जागतिक राजकारणावरील परिणाम याचा गांभीर्याने अभ्यास होऊ लागला असा हा वास्तववादी विचार करायला लावणारा कालखंड होय. कारण आंतरराष्ट्रीय संबंधासंदर्भात आजपर्यंत काढले निष्कर्ष हे अशास्त्रीय व उपयुक्त नसणारे आहेत. या सर्व घटनांचा आढावा घेता 'आंतरराष्ट्रीय राजकारण' या विषयाचा अभ्यास अधिकाधिक शास्त्रीय कसा करता येईल व या विषयाला अधिक महत्व कसे देता येईल यासंबंधी विचार होऊ लागला.

### ४. चौथा कालखंड :–

दुसरे महायुध्द संपल्यानंतर १९४५ मध्ये हा कालखंड सुरू होतो. हा कालखंड १९६० ते ६५ पर्यंत मानला जातो. या कालखंडाच्या सुरवातीला म्हणजे दुसरे महायुध्द संपल्यानंतर संयुक्त राष्ट्रसंघटनेची स्थापना, शीतयुध्दांचा आरंभ, अमेरिका आणि रशिया या दोन बढ्या महासत्तांचा उदय, वसाहतवाद आणि साम्राज्यवादांचा अंत, अण्वस्त्रांच्या वापरामुळे युध्दामध्ये किती मोठी मानवी हानी होते आणि प्रचंड नुकसान होते, हे जपानवर झालेल्या अणुबॉम्ब हल्ल्यामुळे जपानची हिरोसिमा व नागासाकी ही दोन शहरे बेचिराख झालेली होती. जागतिक राजकारणात नवोदित स्वतंत्र होणाऱ्या राष्ट्रांची संख्या वाढत होती. सत्तासंतुलनामध्ये बदल झालेला होता. संघर्षाऐवजी, शांतता आणि परस्पर सहकार्य हा विचार रुजायला लागला होता.

प्रत्येक राष्ट्र संरक्षणासाठी अनेक राष्ट्रे संरक्षण करार करून क्षेत्रीय संघटनाची निर्मिती करू लागले. नाटो, सिटो, सेंटो आणि अलिप्ततावादी चळवळ यांचा उदय याच काळात झाला. भांडवलशाही अमेरिका विरुध्द साम्यवादी रशिया अशा द्विध्रुवीकरणाला छेद देण्यासाठी अलिप्तवादी चळवळीने कामाला सुरवात केली. साम्यवादी चीनच्या उदयाने एका नव्या आंतरराष्ट्रीय शक्तीला जन्म दिला. आंतरराष्ट्रीय प्रश्नांचे निराकरण युध्दात नाही तर ते वाटाघाटी व कराराने होऊ लागले. या काळातील आंतरराष्ट्रीय राजकारणातील विचारवंतांनी वास्तववादी परिस्थितीचे चित्रण केले. यामुळेच आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विविध अभ्यास पध्दतीचे महत्त्व सर्वांच्या लक्षात आले.

## ५. पाचवा कालखंड :–

पाचवा कालखंड हा साधारणपणे १९६५ ते १९९१ या काळातील मानता येईल. या काळात क्षेत्रीय संघटनांचे महत्त्व वाढत गेले. वसाहतवाद आणि साम्राज्यवाद हा जगातून नष्ट झाला. नवोदित स्वतंत्र राष्ट्रांची संख्या वाढत गेली. दळणवळण साधनांचा प्रचंड विकास झाला. आर्थिक, साामजिक, व्यापारविषयक, शैक्षणिक या क्षेत्रांचा विकास झाला. दळणवळण साधनांच्या विकासामुळे संपूर्ण जग जवळ आले आणि त्यामुळे प्रत्येक राष्ट्रांचे व्यवहार आणि गरजा त्यांची पूर्तता ही परस्परांवर अवलंबून राहू लागली. अनेक ठिकाणी लहान–मोठी युध्दे झाली, तणाव निर्माण झाले पण ते तणाव शक्य तितक्या लवकर सोडवण्यासाठी शांततेचा मार्गद्वारे, सोडवण्यावर जोर देण्यात येऊ लागला. या सर्व प्रश्नांमध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेची भूमिका महत्त्वाची ठरली.

जागतिक लोकमतापुढे महासंतानाही आपली भूमिका बदलून माघार घ्यावी लागली. मानवतावादी मूल्ये परस्पर सहकार्य हे विचार वाढू लागले. लोकशाही शासनपध्दतीचा विकास फार मोठ्या गतीने झाला. वास्तववादी दृष्टीकोण, आदर्शवादी दृष्टीकोण, वर्तनवादी दृष्टीकोण या सर्व गोष्टींचा अभ्यास वेगवेगळ्या पध्दतीने व दृष्टीकोणातून होऊ लागला.

## ६. सहावा कालखंड :–

सोव्हिएत रशियामध्ये मिखाइल गोर्बाचेव्ह यांनी १९८५ पासून पेरेस्त्रायका आणि ग्लासनोस्त या संकल्पना स्वीकारल्या. याचे रशियाच्या राजकारणावर दूरगामी परिणाम झाले. त्याबरोबरच जागतिक राजकारणावरही परिणाम झाले. त्यांचे रूपांतर १९९१ मध्ये रशियाचे विभाजन झाले व साम्यवादी रशियाची महासत्ता संपुष्टात आली आणि अमेरिकेचा पारंपारिक विरोधक संपला. जागतिक राजकारणात साम्यवादी राज्यव्यवस्था व अर्थव्यवस्थेचे पुरस्कार व प्रचार करणारा साम्यवादी रशियाचे अस्तित्व संपल्यामुळे, जागतिक राजकारणावर अमेरिकेचे वर्चस्व वाढले व अमेरिकेच्या प्रभावावर नियंत्रण ठेवणारा दुसरा कोणी नसल्यामुळे अमेरिकेला महासत्तेची स्वप्ने पडू लागली, हे सर्वांना ज्ञात आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात १९९१ पासून हा नवीन कालखंड सुरू झाला, यामध्ये आमूलाग्र असे बदल घडून आले. भांडवलशाहीचा विकास मुक्त अर्थव्यवस्थेत, उदारीकरण, जागतिकीकरण अशा संकल्पनात झाला. या संकल्पनांनी आणि त्यावर आधारलेल्या राजकीय घडामोडीनी एक नवे वळण घेतले आहे. जागतिक राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंध हे सर्व अमेरिकेच्या वर्चस्वाखाली वाटचाल करीत असले तरी, सतत वाढती लोकसंख्या, त्यांच्या आवश्यक गरजा त्यांची पूर्तता करण्यासाठी अनेक राष्ट्रांची धडपड, औद्योगिकीकरणाने निर्माण केलेले प्रश्न,पर्यावरणाचा ऱ्हास आणि त्यामुळे मानवी आरोग्यावर होणारे दुष्परिणाम, दारिद्र्य, बेरोजगारी, निरक्षरता, आरोग्यविषयक प्रश्न, दहशतवाद यासारखे नवीन प्रश्न जगापुढे निर्माण होत आहेत. या प्रश्नांच्या सोडवणुकीचा अभ्यास हा आंतरराष्ट्रीय राजकारणात केला जातो. एकूणच मानवी समाज

आणि त्याचा विकास आणि त्या अनुषंगाने येणारे संबंध आणि कार्य याचा अभ्यास या विषयामध्ये केला पाहिजे, अधिक शास्त्रीय पध्दतीने, वस्तुनिष्ठ अभ्यास होत आहे म्हणून या विषयाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

## १.२.४ आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती

आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयामध्ये प्रामुख्याने राष्ट्र-राज्य व्यवस्था आणि राष्ट्रराज्यांतर्गत राजकीय संबंधावर प्रभाव पाडणारे इतर घटक, गट संघटना यांचाही अभ्यास या विषयामध्ये होतो. एक शास्त्र म्हणून या विषयाचा उगम अलीकडील काळात झाला आहे. तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप हे गतिशील, बदलणारे आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाची व्याप्ती निश्‍चित झालेली नाही. इ.स. १९४७ मध्ये अमेरिकेतील एका परराष्ट्र संबंधविषयक मंडळाने प्रसिध्द केलेल्या अहवालात या विषयांतर्गत पाच विभाग पाडल्याचे स्पष्ट केले आहे.

१) राज्यव्यवस्थेचे स्वरूप आणि कार्यवाही.

२) राज्यसत्तेवर परिणाम करणारे घटक.

३) प्रमुख राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण व त्यांचे आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील स्थान.

४) सध्याचा आंतरराष्ट्रीय संबंधाचा इतिहास.

५) स्थिर जागतिक व्यवस्था उभारण्याचे प्रयत्न.

व्हिन्सेंट बेकरने १९५४ मध्ये केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे सादर केलेल्या अहवालात पुढील सात घटकांचा समावेश केला आहे.

१) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप आणि मूलतत्वे.

२) आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील राजकीय संघटना.

३) राष्ट्रीय सत्तेचे घटक.

४) राष्ट्रीय सत्तेची साधने.

५) प्रमुख सत्तांचे परराष्ट्र धोरण.

६) राष्ट्र सत्तेवरील नियंत्रण व मर्यादा.

७) आधुनिक काळातील आंतरराष्ट्रीय घडामोडींचा इतिहास.

याशिवाय बेकरने धोरण प्रक्रिया, विचारप्रणाली व आंतरराष्ट्रीय राजकारणावर प्रभाव पाडणारे विविध घटक यांचाही व्याप्तीमध्ये समावेश केला आहे.

आधुनिक काळात राज्यव्यवस्थेतील झालेले बदल, तंत्रज्ञानाचा क्रांतीकारक झालेला विकास यामुळे दुसऱ्या महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलले. आजही त्यामध्ये वारंवार बदल होत आहेत. या विषयाच्या स्वरूपात झालेल्या बदलामुळे त्याच्या व्याप्तीतही बदल होत आहेत. आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती अधिक विस्तारित बनलेली आहे, ती पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१. राष्ट्रांच्या परस्परसंबंधाचा अभ्यास :-**

आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राष्ट्राराष्ट्रातील संबंध हे कशा प्रकारचे आहेत. ते सहकार्याचे आहेत की संघर्षाचे याचा अभ्यास हा आंतरराष्ट्रीय राजकारणात करावा लागतो. यादृष्टीने राज्याचे सामर्थ्य तेथील शासनपध्दती त्यानी स्विकारलेली विचारप्रणाली आणि राज्यातील लोकमत या सर्वांचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. कारण या सर्व गोष्टी लक्षात घेऊन राज्याच्या परस्पर संबंधाचा अभ्यास करावा लागतो. अनेक राष्ट्रे आपले हितसंबंधाचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करीत असतात. प्रत्येक राष्ट्राचे आर्थिक, लष्करी व भौगोलिक रचना वेगळी असते. त्याच्या आधारावर दुसऱ्या राष्ट्रावर प्रभाव टाकण्याचा प्रयत्न होत असतो. राष्ट्राराष्ट्रातील संबंध हे परिस्थितीनुसार बदलत असतात. रशियाच्या विघटनामुळे भारताला अमेरिके सोबतच्या संबंधाचा विचार करावा लागतो.

**२. आंतरराष्ट्रीय संबधाचा अभ्यास :-**

विसाव्या शतकामध्ये अनेक राष्ट्रे स्वतंत्र आणि सार्वभौम झाली. त्यांच्यामध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती, लोकसंख्या, आकारमान, लष्करीस्थान इत्यादीबाबत विविधता दिसून येते. अशा राष्ट्रांनी आपआपल्या सीमा उल्लंघन करून बाहेरील राज्यांशी जे संबंध प्रस्थापित केले आहेत त्यांचा समावेश या विषयात करावा लागतो. हे सार्वभौम राष्ट्रांतील संबंध प्रामुख्याने दोन तऱ्हेचे असतात. १) सत्तेवर आधारित असलेले संघर्षपूर्ण संबंध. उदा. इराक-अमेरिका, इस्त्राईल-अरब राष्ट्रे, भारत-पाकिस्तान. २) सहकार्यातील संबंध- आंतरराष्ट्रीय शांतता स्थापन करण्यासाठी अथवा नि:शस्त्रीकरणाच्या हेतूने अमेरिका, रशिया या बड्या राष्ट्रांच्या साथीला इतर राष्ट्रांनी दिलेले सहकार्य होय.

**३. आंतरराष्ट्रीय सत्तासंघर्ष :-**

आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे अनेक राष्ट्रांचा सत्तेसाठी चाललेला संघर्ष होय. प्रत्येक राष्ट्राला आपल्या शक्तीचा वापर करणे अपरिहार्य असते, आणि अशा बळाचा वापर करून सत्ता मिळवली जाते. ह्या सत्तेच्या मदतीने अनेक राष्ट्रे एकमेकांच्यावरती कुरघोडी, नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न करीत असतात. सुवेझचा पेच प्रसंग किंवा व्हिएतनाममध्ये युध्द अशी अनेक उदाहरणे देता येतील. राष्ट्राची सत्ता हे राष्ट्रीय हित साध्य करण्याचे एकमेव आणि महत्त्वपूर्ण साधन आहे. या सत्ता संघर्षाचे परिणाम त्यांची कारणे यांचा आंतरराष्ट्रीय राजकारणात अभ्यास केला जातो.

## ४. परराष्ट्रीय धोरणाचा अभ्यास :–

परराष्ट्रीय धोरण हे आंतरराष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू असते. परराष्ट्रीय धोरण ठरविणाऱ्या घटकांचाही यामध्ये समावेश करावा लागतो. राष्ट्रांचे प्रमुख परराष्ट्रमंत्री, राजदूत, राष्ट्राध्यक्ष, पंतप्रधान, संसद, प्रसारमाध्यमे यांची भूमिका परराष्ट्र धोरणात महत्त्वाची असते. राष्ट्राचे परराष्ट्र धोरण निश्चित करत असताना राष्ट्राची अंतर्गत स्थिती, हितसंबंध व बाह्यस्थिती यांचा अभ्यास केला जातो. परराष्ट्र धोरणांची ध्येये आणि उद्दिष्ट्ये ही राष्ट्रीय हितसंबंधावर आधारित असतात. त्याचप्रमाणे देशाची संस्कृती, परंपरा, इतिहास, मूल्ये या घटकांचा प्रभाव परराष्ट्र धोरणावर होत असतो. उदा. भारताचे अलिप्ततावादी धोरण व पंचशील तत्वे, तत्कालीन वृत्तपत्रे, रेडिओ, दूरदर्शन या साधनांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात करावा लागतो.

## ५. आंतरराष्ट्रीय संघटनांचा अभ्यास :–

आंतरराष्ट्रीय राजकारणात संघटनांच्या मार्फत राष्ट्राराष्ट्रातील एकमेकांचे संघर्ष मिटवून त्यांना सहकार्य करण्याचा प्रयत्न केला जातो. आधुनिक काळातील दोन महायुध्दांच्या अनुभवांमुळे जागतिक शांतता निर्माण करणे व त्या टिकवून ठेवणे यामध्ये जागतिक संघटनांचा भूमिका महत्वाची मानली जाते. राष्ट्रसंघ किंवा संयुक्त राष्ट्र संघटना यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाला एक वेगळी दिशा दिलेली आहे. विशेषत: या व्यासपीठावरून लहान राष्ट्रांना आपली मते स्पष्ट करण्याची संधी मिळाली आहे. अण्वस्त्र कपात किंवा आर्थिक, सामाजिक सहकार्याचे धोरण निश्चित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनांच्या बैठका उपयुक्त ठरल्या आहे. यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांचे स्वरूप, कार्य, यशअपयश, भवितव्य यांचा अभ्यास होतो, त्याचबरोबर मजूर संघटना, युरोप, कॉमन मार्केट, सार्क, आंतरराष्ट्रीय आरोग्य संघटना इ. अभ्यास होतो.

## ६. आंतरराष्ट्रीय विचारप्रणालींचा अभ्यास :–

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात विचारप्रणालींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या व्याप्तीत, साम्राज्यवाद, वसाहतवाद, राष्ट्रवाद तसेच नववसाहतवाद या विचारप्रणालींचा समावेश होतो. या विचारप्रणालीच्या मदतीने आंतरराष्ट्रीय राजकारणाचे ज्ञान प्राप्त होते. राष्ट्रवाद हा तर जगातील राजकीय जीवनाचा आत्मा आहे. पण याच राष्ट्रवादाचा अतिरेक झाला तर जागतिक शांतता धोक्यात येवून महायुध्दे घडली गेली. साम्राज्यवादाने शोषक आणि शोषित अशी विषम व्यवस्था अस्तित्वात आणली. साम्यवादाने जगाचे ध्रुवीकरण घडविले. साम्राज्यवाद व वसाहतवाद आज समाप्त झाले असले तरी त्याची जागा नववसाहतवादाने घेतली आहे. आधुनिक जग काही काळ शीतयुध्दाच्या प्रभावाखाली होते. अशा विचारप्रणालींनी आंतरराष्ट्रीय संबंधांना एक दिशा देण्याचा प्रयत्न केला आहे.

### ७. राष्ट्रीय हितसंबंध :–

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रीय हित साध्य करण्यासाठी परराष्ट्र धोरण ठरत असते. मॉर्गेन्था यांच्या मते, राष्ट्रीय हित हे जागतिक राजकारणाचे अंतिम आणि निर्णायक तत्व आहे. कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्रीय धोरण राष्ट्रीय हित डोळ्यासमोर ठेवूनच आखले जाते. सत्ताधारी राष्ट्रे आंतरराष्ट्रीय राजकारणात भाग घेऊन जास्तीतजास्त राष्ट्रीय हित साध्य करून घेतात. त्यासाठी प्रत्येक राष्ट्राला आपल्या राष्ट्रीय हितसंबंधांची आखणी व वस्तुस्थितीचा विचार करावा लागतो. यावरूनच या विषयात राष्ट्रीय हिताच्या अभ्यासाला प्राधान्य देण्यात आले आहे.

### ८. राजनयाचा अभ्यास :–

आपल्या राष्ट्राचे हितसंबंध सुरक्षित ठेवण्याचे त्यात वाढ करण्याचे महत्त्वाचे साधन म्हणून राजनयाकडे पाहिले जाते. त्याचबरोबर राष्ट्राची शांतता व सुव्यवस्था आणि युध्दापासून संरक्षण करणे, या तत्वाला देखील विशेष महत्त्व दिले आहे. कोणत्याही राष्ट्राला शांततेच्या मार्गाने परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे राजनयाद्वारे साध्य करून आंतरराष्ट्रीय संबंध अधिक विकसीत करणे. युध्द आणि परस्पर संघर्ष टाळण्यासाठी प्राचीन काळापासून राजनयाचा वापर होत आला आहे. यादृष्टीने राजनयाचे कार्ये स्वरूप, राजनयाचे प्रकार, जुना व नवा राजनय इ. अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात केला जातो.

### ९. मानवी वर्तनाचा अभ्यास :–

आंतरराष्ट्रीय राजकारणात मानवी वर्तनाचा समावेश होतो, कारण मानवी वर्तनाचा निर्णय प्रक्रियेशी संबंध आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात जे राजकारणी वा मुत्सद्दी निर्णय घेतात त्यांचा परिणाम राजकारणावर होत असतो. त्यामुळे त्याला वेगळी दिशा मिळू शकते. अध्यक्ष विल्सन यांनी पहिल्या महायुध्दात सहभागी होण्याचा घेतलेला निर्णय असो किंवा रूझवेल्टने दुसऱ्या महायुध्दात रशियाला जर्मनीच्या विरोधात मदत करण्याचा निर्णय असो किंवा गोर्बाचेव्ह यांचा ग्लासनोस्त–पेरेस्त्रोईकाचा निर्णय असो अशा निर्णयांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वपूर्ण बदल केलेले आहेत. निर्णय घेणारे नेते केव्हा आणि कसे निर्णय घेतात हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा महत्वाचा विषय आहे.

### १०. प्रादेशिक संघटनांचा अभ्यास :–

आधुनिक काळात संरक्षणाच्या दृष्टीने अनेक प्रादेशिक आधारावर अनेक सैनिकी संघटना स्थापन करण्यात आल्या आहेत. उदा. सिटो, वार्सा, नाटो इ. संघटनाच्या स्थापनेमुळे राष्ट्रांच्या परस्पर संबंधावर तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणावर परिणाम होत असल्यामुळे अशा संघटनांचा समावेश आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयात केला जातो. प्रादेशिक सहकार्याच्या दृष्टीने अनेक संघटना स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यांचा अभ्यास केला जातो. उदा. सार्क, आसियान, ओपेक युरोपीय

आर्थिक समूह इत्यादी.

## ११. आर्थिक संघटनांचा अभ्यास :–

आंतरराष्ट्रीय राजकारणात काही आर्थिक संघटना महत्त्वाची भूमिका बजावतात. बड्या राष्ट्रांनी मागास व विकसनशील राष्ट्रांना केलेली मदत व त्या मदतीचा परराष्ट्र धोरणावर होणारा परिणाम यांचाही अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात केला जातो. उदा. आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधी, जागतिक बँक, ब्रिक्स बँक, युरोपीयन कॉमन मार्केट, अमेरिकन कॉमन मार्केट इ. आर्थिक संघटनांचा अभ्यास या विषयात केला जातो.

## १२. आंतरराष्ट्रीय नियम :–

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्राराष्ट्रांनी परस्पर संबंधाबाबतच्या काही नियमांना मान्यता दिली आहे. यांनाच आंतरराष्ट्रीय कायदे म्हणतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय कायदे, आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे निर्णय इ. अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात केला जातो.

## १३. नियंत्रक शक्तींचा अभ्यास :–

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राज्याच्या अनिर्बंध व्यवहारावर नियंत्रण ठेवणाऱ्या काही व्यवस्था निर्माण करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी प्रमुख म्हणजे सामूहिक सुरक्षा व्यवस्था होय. सामूहिक सुरक्षा व्यवस्थेमुळे कोणत्याही राष्ट्राला इतर राष्ट्रावर आक्रमण करणे शक्य होत नाही. याशिवाय महाशक्तीच्या प्रभावानेसुध्दा काही राज्यावर अप्रत्यक्ष नियंत्रणे प्रस्थापित होत असल्याने या महाशक्तीच्या परराष्ट्र धोरणांचा अभ्यास करणे आवश्यक वाटते.

## १४. राष्ट्रीय राजकारण :–

प्रत्येक राष्ट्राच्या अंतर्गत राजकारणाचा प्रभाव हा त्या राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर होत असतो. म्हणून प्रत्येक राष्ट्राच्या अंतर्गत राजकारणातील अनेक पैलूंचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. आंतरराष्ट्रीय राजकारण हे राष्ट्रीय राजकारणावर अवलंबून असते. आज इतर देशांबरोबर असलेले संबंध उद्या सत्तेवरती दुसरा पक्ष आल्यानंतर ते तसेच राहतील असे नाही. आजच्या धोरणात काही मूलभूत परिवर्तनाची शक्यता असू शकते.

## १५. राज्याचे नेतृत्व :–

आधुनिक काळात दळणवळणाच्या प्रगतीमुळे राजनयाचे महत्व कमी होऊन प्रत्यक्ष राजनयाला सुरवात झाली आहे. राष्ट्राचे नेते एकत्र येऊन महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घेतात. राज्याच्या संदर्भात विधिमंडळ जनता ही निर्णयात भाग घेत असली तरी प्रत्यक्ष निर्णय राजकीय नेत्याकडून घेतले जातात, त्यामुळे अशा महत्त्वाच्या व्यक्तींचे व्यक्तीमत्व, त्यांच्यावरील प्रभाव विशिष्ट प्रश्नांसंबंधी त्याचा

दृष्टीकोन, अशा सर्व गोष्टींची माहिती करून घेणे आवश्यक आहे. निर्णयवादी दृष्टीकोणाचा विकास या दृष्टीकोणातून करण्यात आला आहे.

## १.२.५ आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचे महत्त्व

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान निर्माण झाले आहे. आज जागतिक राजकारणात प्रत्येक राष्ट्र हे परस्परावलंबी बनल्यामुळे मानवाची प्रगती आणि मानवजातींचे संरक्षण या विषयाच्या अभ्यासाचे महत्त्व वाढत आहे. विशिष्ट व्यक्ती व राष्ट्रे यांची विशिष्ट परिस्थितीमध्ये कशी वर्तणूक असते याचे ज्ञान या विषयात मिळते. या विषयासंबंधी असणाऱ्या समस्या, उद्दिष्टे, अडचणी या सर्व या विषयात अभ्यासल्या जातात. नैसर्गिक शास्त्रात ज्याप्रमाणे बिनचूक निष्कर्ष काढले जातात. त्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या, अभ्यासात बिनचूक असे निष्कर्ष काढता येत नाहीत. कारण हे एक सामाजिक शास्त्र आहे. या विषयाचा अभ्यास परंपरा, सांस्कृतिक मूल्ये, मानवी व्यवहार यावर अवलंबून असते. त्याचप्रमाणे मानवी वर्तन नेहमी बदलत असते, त्यामुळे या विषयात निश्चित असे निष्कर्ष निघत नाहीत.

आधुनिक काळात या विषयाला शास्त्रीय दर्जा मिळावा यासाठी या विषयाची शास्त्रशुध्द व पध्दतशीर मांडणी केली जात आहे. प्राचीन काळापासून आंतरराष्ट्रीय राजनीती हा विषय अभ्यासला जात आहे. रामायण, महाभारत, शुक्रनीती, कौटिल्याचे अर्थशास्त्र या ग्रंथामध्ये आंतरराज्य संबंध व परराष्ट्र धोरण याविषयी विचार आढळतात. राज्यकारभाराच्या दृष्टीने प्राचीन व मध्ययुगीन राजनीतीचा हा अभ्यास राज्यकर्त्यांना मार्गदर्शक आणि उपयुक्त ठरलेला आहे. आज एकविसाव्या शतकात विदेशी नीती, राजनय यासंबंधीचा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास अतिशय महत्त्वाचा झाला आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाचे अभ्यासाचे महत्त्व पुढील प्रमाणे विशद केले आहे.

### १. विश्वराज्याची निर्मिती साकार करण्यासाठी :-

आंतरराष्ट्रीय राजकारण या विषयाच्या अभ्यासामुळे जागतिक राजकारणाची वाटचाल विश्वराज्याकडे कशी जाते त्याचे ज्ञान होते. जागतिक शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न व जागतिक संस्कृतीचे जतन याची माहिती होते. सत्तासमतोल, सामूहीक सुरक्षितता संयुक्त राष्ट्र संघटना, नि:शस्त्रीकरण इ. साधनांमुळे विश्वराज्याच्या जडणघडणीचे ज्ञान होऊ शकते. संघराज्य, जागतिक शासन याची निर्मिती कशी होईल याची माहिती होते. आज कोणतीही समस्या एका राष्ट्राची किंवा राज्याची मर्यादित राहू शकत नाही. त्यासाठी स्थानिक व राष्ट्रीय प्रश्नापेक्षा आंतरराष्ट्रीय प्रश्नांची सोडवणूक करणे गरजेचे आहे.

### २. मानवी व्यवहाराचे ज्ञान होण्यासाठी :-

आंतरराष्ट्रीय राजकारणात डावपेच, शह, काटशह, मुत्सद्देगिरी सतत चालत असतात. विशिष्ट

परिस्थितीत राजकीय नेते, मुत्सद्दी व राज्ये विशिष्ट प्रकारे व्यवहार कसे करतात. त्यातील पूर्वग्रह, तणावाची कारणे कोणती यांचे आकलन या विषयाच्या अभ्यासामुळे होते. आजची संकटे लवकरात लवकर नष्ट करून नव्या जगाची निर्मिती कशी करता येईल याचे ज्ञान होते.

**३. आंतरराष्ट्रीय दृष्टिकोणाची निर्मिती होते :–**

प्रत्येक राष्ट्राचे परराष्ट्रधोरण हे राष्ट्रीय हितसंबंधाची जोपासना करीत निर्माण होत असते, पण राष्ट्रवादाला अवास्तव महत्त्व प्राप्त झाले व तो आक्रमक व विषारी झाला तर आंतरराष्ट्रीय व्यवस्था आपल्या राष्ट्रासह धोक्यात येते व जागतिक शांततेस मोठा धोका निर्माण होतो. या सर्वांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात केला जातो.

**४. सत्तेच्या राजकारणाचे विश्लेषण :–**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील मानवी व्यवहारांचे ज्ञान आपणास होऊ शकते. विशिष्ट परिस्थितीत व्यक्ती व राष्ट्रे कशा प्रकारे वर्तन करतात याची माहिती मिळते. परंपरागत संकल्पना कशा निरूपयोगी ठरल्या आहेत, त्यात कोणते बदल करावे लागतील याचा अभ्यास या विषयात केला जातो. सर्वच बडी राष्ट्रे सत्तास्पर्धेत गुंतलेली असतात त्याचा परिणाम सर्व लहान राष्ट्रांवर व पर्यायाने जगावर होतो. राजकारणातील परिवर्तन समजल्याशिवाय आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील आपले अस्तित्व समजू शकत नाही.

**५. आंतरराष्ट्रीय समस्यांची उत्तरे शोधण्यासाठी :–**

आज आंतरराष्ट्रीय राजकारण अतिशय गुंतागुंतीचे व जटिल स्वरूपाचे झाले आहे. सत्तेच्या राजकारणाचे विश्लेषण म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास होय. त्यातील प्रश्नांची सोडवणूक झाली नाही तर जग विनाशाच्या काठावर येऊन थांबेल. २१व्या शतकाच्या प्रारंभीच जग अशा वळणावर आले की यातून जो मार्ग निघेल त्यावरच त्याचे भवितव्य, विनाशकारी वा हितकारी ठरणार आहे. जागतिक व्यवस्थेमध्ये अनेक राष्ट्रांचे परस्परावलंबन दिवसेंदिवस वाढत आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासकांची प्रयोगशाळा म्हणून संपूर्ण जगच समजले जाते. यामध्ये सामाजिक, मानसशास्त्रीय, राजकीय व आर्थिक प्रश्न समजून घ्यावे लागतात. या विषयाच्या अभ्यासामुळे संघर्ष व तणावाची कारणे समजू शकतात.

**६. आंतरराष्ट्रीय घडामोडीतील महत्त्वपूर्ण घटना समजण्यासाठी :–**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या घडामोडीतील महत्त्वपूर्ण घटनांचा परिणाम अनेक राष्ट्रांवर व तेथील जनतेवर वारंवार होत असतो. या घटना का, कशा व कशासाठी, कशाप्रकारे घडतात किंवा

घडवून आणल्या जातात याचे स्वतंत्र देशातील नागरिकांना त्याचे ज्ञान होणे आवश्यक आहे.

### ७. युध्द थांबवणे, शांतता निर्माण करणे :-

मानवाची युध्दखोर वृत्ती सामाजिक व जागतिक शांततेला धोकादायक ठरली आहे. युध्दाच्या वणव्यापासून मानवजातीला मुक्त करणे व चिरकाल स्वरूपाची शांतता निर्माण करणे ही मानवतेची काळाची गरज आहे. जगात प्रत्येक राष्ट्र सत्ता स्थापन करण्यासाठी धडपडत असते. कारण सत्तेशिवाय राष्ट्रहित साध्य करता येत नाही. सत्ता मिळवत असताना संघर्ष होत राहतात. संयुक्त राष्ट्रसंघटना युध्द टाळण्याचा प्रयत्न करीत असते. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाने युध्दाची कारणे व त्याचे दुष्परिणाम कोणते याचे ज्ञान या विषयाच्या अभ्यासामुळे होते. शस्त्रास्त्र संधी व त्याची जागतिक शांततेवरील परिणामांची माहिती होते.

### ८. परराष्ट्र धारेणाचे आकलन होण्यासाठी :-

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये परराष्ट्र धोरणाचा उगमच राष्ट्रीय हितसंबंधातून होत असतो. प्रत्येक राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण हे राष्ट्रीय हिताला अनुसरून कसे निर्माण होईल व त्याचे इतर राष्ट्रांवर चांगले किंवा वाईट परिणाम कसे होतात. हे समजण्यासाठी आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास होणे गरजेचे आहे.

अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय राजकारणात आंतरराष्ट्रीय पातळीवरील समस्यांचा अभ्यास, राजकारणाचे विश्लेषण, युध्द टाळणे, शांतता निर्माण करणे, मानवी व्यवहाराचे ज्ञान, विश्वराज्याची निर्मिती, राष्ट्रीय हिताची जपणूक याचा सर्व पातळ्यांवर अभ्यास होत असतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात आंतरराष्ट्रीय संबधाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जगात मानवी प्रगती आणि मानवी संरक्षण यासाठी आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास हा अतिशय महत्वाचा ठरला आहे.

### ९. जागतिक समस्यांचे आकलन होण्यासाठी :-

जगाचे व्यवहार हे आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासासाठी प्रयोगशाळाच आहेत. जागतिक राजकारणात भेडसावणाऱ्या अनेक आर्थिक, सामाजिक, राजकीय समस्या आहेत, त्यांचे व्यवस्थित आकलन झाले नाही तर त्यातून जागतिक समतोल ढासळू शकतो. म्हणून जागतिक प्रश्नांचे आकलन व सोडवणूक आवश्यक ठरते.

## १.३ सारांश

आंतरराष्ट्रीय राजकारण हा विषय फार प्राचीन काळापासून चालत आलेला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप काळानुरूप बदलत गेले आहे. प्रथम या विषयाचा अभ्यासाचा उद्देश हा विविध

घटनांचे विवेचन करणे हाच होता. कालांतराने समाजशास्त्र, राज्यशास्त्र, तत्वज्ञान, विज्ञान, भूगोल, कायदा अशा अनेक विषयांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात केला जाऊ लागला. जगामध्ये आज अनेक स्वतंत्र राष्ट्रे आहेत. या सर्व राष्ट्रांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात होतो. या राष्ट्रांचे विविध व्यवहार, निर्णय आंतरराष्ट्रीय संबधाचे स्वरूप निर्धारित करीत असतात.

नवीन राष्ट्रांच्या उदयामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप हे व्यापक बनले. १९९० पूर्वी आंतरराष्ट्रीय राजकारण द्विध्रुवीय होते. दुसऱ्या महायुध्दानंतर अनेक स्वतंत्र राष्ट्रांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात भाग घेण्यास सुरवात केली. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलले. लोकमताचा प्रभाव, नवीन राष्ट्रांचा उदय, वैज्ञानिक प्रगती, शांतता चळवळी, राष्ट्रीय संघटनांचा उदय या सर्वांमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या स्वरूपात बदल झाला.

पहिल्या व दुसऱ्या महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलले शस्त्रअस्त्र वापरावर नियंत्रण शांततेसाठी प्रयत्न यातून आंतरराष्ट्रीय कायदा व आंतरराष्ट्रीय संघटनांची निर्मिती, राष्ट्रसंघाची स्थापना यातून आंतरराष्ट्रीय संबंधाचा विकास विविध टप्प्यातून झाल्याचे दिसते. परराष्ट्र धोरणांची निर्मिती, लोकमताचा प्रभाव, वर्तमानकाळातील घटनांचे विश्लेषण, आंतरराष्ट्रीय शांततेसाठी विविध मार्ग, आंतरराष्ट्रीय संघटनांचा अभ्यास, युध्दांच्या कारणांचा शास्त्रशुध्द अभ्यास व युध्द टाळण्यासाठी उपाययोजना, आंतरराष्ट्रीय संघर्ष, समस्यांचा अभ्यास, संघर्षावर उपाय व राजनयाचा अभ्यास या सर्वांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात होत आहे. यातूनच या विषयाचा विकास झाला आहे.

दुसऱ्या महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय राजकारणावर विशेषत: वर्तनवादी क्रांतीनंतर त्यांच्या व्याप्तीत फार मोठा बदल घडून आला आहे. भविष्यातील घटनांविषयी अंदाज बांधण्याची क्षमता विकसित झाली आहे. आंतरराष्ट्रीय संबंध व आंतरराष्ट्रीय राजकारण या दोन्ही संकल्पना परस्परांशी निगडीत आहेत. या संकल्पनांचा अभ्यास होत असला तरी त्यामध्ये काही प्रमाणात फरक असल्याचे दिसून येते. एकूणच आंतरराष्ट्रीय संबंध हा एक सर्व समावेशक असा विषय असून यात सार्वभौम राष्ट्रांमधील सर्व प्रकारच्या विविध पातळ्यांवरचा संबंध राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाचा राजनय, युध्द, शांततेची विचारसरणी, सत्ता आणि राष्ट्रीय हितसंबंधाचा, आंतरराष्ट्रीय संघटनांचा, व्यवस्थापनाचा आणि सोडवणूकीचा, शस्त्रास्त्र स्पर्धा आणि नि:शस्त्रीकरण या सर्वांचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात होतो.

एकूणच आंतरराष्ट्रीय राजकारणात जागतिक समस्यांचा अभ्यास, युध्द टाळणे, शांतता निर्माण करणे, राजकारणाचे विश्लेषण मानवी व्यवहारांचे ज्ञान, विश्वराज्याची निर्मिती, राष्ट्रीय हित या सर्व पातळ्यांवर अभ्यास होत असतो, त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात आंतरराष्ट्रीय संबंधाला महत्त्व प्राप्त झाले आहे. विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जगात मानवाची प्रगती व मानवी संरक्षण यासाठी

आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास हा अत्यंत महत्वाचा मानला जातो.

## १.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **आंतरराष्ट्रीय संबंध** : राष्ट्रा-राष्ट्रांमधील संबंध.
- **आंतरराष्ट्रीय राजकारण** : राष्ट्रांचे राजकीय संबंध.
- **शक्ती** : सत्ता, दुसऱ्यावर प्रभाव निर्माण करणे.
- **कूटनिती** : व्यूहरचना.
- **करार** : तह, संधी.
- **सार्वभौमत्व** : सर्वश्रेष्ठ सत्ता, प्रभुसत्ता.
- **द्विध्रुवीकरण** : दोन राष्ट्रांत सत्ता वाटप.
- **बहुध्रुवीकरण** : अनेक राष्ट्रांत सत्ता वाटप.
- **राष्ट्रीय हित** : एखाद्या राष्ट्राद्वारे सैध्दांतिकदृष्ट्या निश्चित केलेले ध्येय.
- **राजनय** : वाटाघाटी करून आंतरराष्ट्रीय संबंधाचे व्यवस्थापन करणे.
- **शीत युध्द** : युध्द न होता युध्दजन्य परिस्थिती निर्माण होणे.
- **पेरिस्त्रोईका** : पुनर्रचना.
- **ग्लासनोस्त** : स्वातंत्र्य.

## १.५ स्वयं-अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

❑ **अ) रिकाम्या जागा भरा.**

१. आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राष्ट्रांराष्ट्रांतील संबंध हे .............. किंवा .............. असू शकतात.

२. ............. हा शब्दप्रयोग प्रथम जेरेमी बेंथम यांनी केला.

३. ............ यांच्या मते, 'आंतरराष्ट्रीय राजकारण' म्हणजे राष्ट्राच्या शासन पध्दतीचा आंतरराष्ट्रीय संबंधाच्या संदर्भातील अभ्यास होय.

४. फेलिक्स ग्रास यांच्या मते, आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास विषय आणि .............. अभ्यास विषय हा एकच असतो.

५. १९१९ मध्ये जेव्हा ................ आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचे अध्यासन या नावाने स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आला.

६. आंतरराष्ट्रीय राजकारणात ................ सतत संघर्ष असतो.

७. ............. यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाला आंतरराष्ट्रीय संबंधाचा गाभा मानले आहे.

८. अमेरिकन अध्यक्ष वुड्रो विल्सन यांनी ................ योजनेच्या आधारे राष्ट्रसंघ या संघटनेची स्थापना केली.

९. आंतरराष्ट्रीय राजकारण हे .............. शास्त्र आहे.

१०. आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करीत असताना राजकीय नेते आपलया मुत्सद्देगिरीने, चातुर्याने व उपलब्ध साधनसामग्रीचा वापर करून आपल्या राष्ट्राचे ............. आणि .............. करीत असतात.

११. संयुक्त राष्ट्र संघटनेची सदस्य संख्या १९४५ मध्ये ............. होती.

१२. ............. आणि .............. क्षेत्रात झालेल्या प्रचंड प्रगतीने आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप बदलून टाकले आहे.

१३. आंतरराष्ट्रीय राजकारणात दुसऱ्या महायुध्दानंतर जागतिक राजकारणात ................. व .................. या महासत्तांचा उदय झाला.

१४. मिखाईल गोर्बाचेव्ह यांनी रशियाला आर्थिक संकटातून वाचवण्यासाठी .................. व .................. धोरण स्विकारले.

१५. प्राचीन काळापासून युध्द आणि परस्पर संघर्ष टाळण्यासाठी .................. चा वापर होत आला आहे.

❐ **अ) उत्तरे :–**

१. संघर्षाचे, मित्रत्वाचे.

२. आंतरराष्ट्रीय.

३. पामर आणि पार्कीन्स.

४. परराष्ट्र धोरणाचा.

५. वेल्स विद्यापीठामध्ये.

६. सत्तेसाठी.

७. हॅन्स जे मॉर्गेथॉ.

८. चौदा कलमी.

९. सामाजिक.

१०. संरक्षण आणि संवर्धन.

११. ५१.

१२. विज्ञान आणि तंत्रज्ञान.

१३. अमेरिका व रशिया.

१४. पेरिस्त्रोईका व ग्लासनोस्त.

१५. राजनयाचा.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

❐ **अ) पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करा?

२. आंतरराष्ट्रीय राजकारणाची व्याप्ती स्पष्ट करा?

❐ **ब) टिपा लिहा.**

१. आंतरराष्ट्रीय राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंध.

२. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विकासाचे टप्पे.

३. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे महत्त्व.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **डॉ. रायपूरकर, वसंत** (२००१) : *'आंतरराष्ट्रीय संबंध'*, मंगेश प्रकाशन, नागपूर.

२. **डॉ. भोगले, शांताराम** (२००१) : *'आंतरराष्ट्रीय संबंध'*, विद्या प्रकाशन, नागपूर.

३. **डॉ. जोशी, सुधाकर गं.** (१९९२) : *'आंतरराष्ट्रीय संबंध'*, गोमटेश प्रकाशन, परभणी.

४. **डॉ. दाते, सुनिल** (१९९८) : *'आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण'*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

५. **डॉ. रासम, वासंती** आणि **डॉ. खापरे, करिअप्पा** (२००७) : *'आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६. **प्रा. वराडकर, रघुनंदन घ.** (१९९१) : *'आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण'*, विद्या प्रकाशन, नागपूर.

७. **प्रा. कुलकर्णी, बी. वाय.** आणि **प्रा. नाईकवाडे, अशोक** (२००४) : *'आंतरराष्ट्रीय संबंध सिध्दांत आणि व्यवहार'*, विद्या प्रकाशन, पुणे.

८. **डॉ. बाचल, वि. मा.** आणि **डॉ. टोनप, ललिता** (१९९६) : *'आंतरराष्ट्रीय राजकारण'*, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

९. **प्रा. कुलकर्णी, सुधाकर** (२००५) : *'आंतरराष्ट्रीय संबंध'*, विद्याभारती प्रकाशन, लातूर.

१०. **डोळे, ना. य.** (१९९८) : *'आंतरराष्ट्रीय संबंध'*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

११. **डॉ. देवळाणकर, शैलेंद्र** (२०११) : *'आंतरराष्ट्रीय संबंध'*, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

१२. **डॉ. शिंदे, ज. य.** (१९९८) : *'आंतरराष्ट्रीय संबंध'*, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.

१३. **प्रा. गोपछडे, मनोज. बो.** (१९९८) : *'आंतरराष्ट्रीय संबंध'*, कल्पना प्रकाशन, नांदेड.

१४. **प्रा. पाटील, वा. भा.** (१९९९) : *'आंतरराष्ट्रीय संबंध'*, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

१५. **प्रा. तोडकर बी. डी.** (२०१०) : *'आंतरराष्ट्रीय संबंध'*, डायमंड प्रकाशन, पुणे.

१६. Jayapalan, N. (1999) : *"International Relations"*, Atlantic Publishers, New Delhi.

❑❑❑

सत्र-३ : घटक-२

# आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सिध्दांत

अनुक्रमणिका


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ आदर्शवादी सिध्दांत

२.२.२ वास्तववादी सिध्दांत

२.२.३ मार्क्सवादी सिध्दांत

२.२.४ परावलंबन आणि परस्परावलंबन सिद्धांत

२.२.५ खेळ सिध्दांत

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.५ स्वयं-अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला,

१. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे विविध सिध्दांत समजून घेणे.

२. आंतरराष्ट्रीय राजकारणातील आदर्शवादी व वास्तववादी सिध्दांताची भूमिका समजून घेणे.

३. आंतरराष्ट्रीय राजकारणातून मार्क्सवादी सिध्दांत आकलन करणे.

४. आंतरराष्ट्रीय राजकारणातील मार्टन काप्लानच्या व्यवस्थावादी सिध्दांताच्या प्रतिमा समजून घेणे.

५. आंतरराष्ट्रीय राजकारणातील खेळ सिध्दांताचा समजून घेणे.

## २.१ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास करताना आंतरराष्ट्रीय राजकारणाविषयीचे सिध्दांत अभ्यासणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात अनेक सिध्दांत असून यात पारंपारिक व शास्त्रीय दृष्टिकोनावर आधारलेले सिध्दांत आहेत. पारंपारिक दृष्टिकोनामध्ये आदर्शवाद व वास्तववादी सिध्दांत असून ज्यात आदर्शवाद हा विश्वशांतीची निर्मिती विवेक, शिक्षा व विज्ञानाच्या सहाय्याने प्राप्त करण्याचे प्रतिपादन करतो, तर वास्तववादी सिध्दांत हा सत्तासंघर्ष हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू मानतो. याचपध्दतीने व्यवहारवादी किंवा वैज्ञानिक दृष्टीकोनात व्यवस्थावादी सिध्दांत खेळ सिध्दांत यांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय राजकारणाचे विवेचन केलेले आहे. याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारण हे मार्क्सवादी विचारांच्या परिप्रेक्षातूनही अभ्यासले आहे. अशा पध्दतीने आंतरराष्ट्रीय राजकारणात वरील सिध्दांताचा अभ्यास केल्याशिवाय आंतरराष्ट्रीय राजकारण समजून येणार नाही.

## २.२ विषय विवेचन

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विविध सिध्दांतापैकी आदर्शवादी सिध्दांत वास्तववादी सिध्दांत मार्क्सवादी सिध्दांत, व्यवस्थावादी सिध्दांत आणि खेळ सिध्दांताचे विश्लेषण करण्यात आले असून हे सिध्दांत आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या बदलत्या दृष्टीकोनाना समजून घेणे आवश्यक आहे. प्रत्येक सिध्दांत हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचे वेगळे आयाम व्यक्त करतो. यातील आदर्शवादी सिध्दांत नैतिकतेला महत्व देतो, वास्तववादी सिध्दांताचा केंद्रबिंदू सत्ता संघर्ष आहे. मार्क्सवादी सिध्दांताने आर्थिक व भौतिकवादी सिध्दांतावर भर दिलेला आहे. व्यवस्थावादी सिध्दांत जागतिक व्यवस्थेचे प्रतिमान स्पष्ट करतो. तर खेळ सिध्दांतामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणामधील विविध खेळांचे विश्लेषण केले आहे. अशा या सर्व सिध्दांताचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारण समजून घेण्यास होतो.

### २.२.१ आदर्शवादी सिध्दांत

आदर्शवादी सिध्दांत हा आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आदर्शवादी मूल्यांद्वारे जगाच्या विकास होतो. या तत्त्वावर भर देणारा सिध्दांत आहे. आदर्शवादी सिध्दांताचा उदय हा १८व्या शतकात झाला असून १९७५ ला ''स्केच फॉर अ हिस्टॉरिकल पिक्चर ऑफ दी प्रोग्रेस ऑफ दि ह्युमन स्पीरिट'' या पुस्तकात आदर्श विश्वव्यवस्थेची कल्पना कान्डसरसेट या विचारवंताने मांडली. कान्डरसेट हा विचारवंत आंतरराष्ट्रीय राजकारणात आदर्शवादी सिध्दांताचे प्रतिपादन करणारा प्रथम विचारवंत होता. याने जगात आदर्श विश्वव्यवस्था निर्माण करताना शुध्द विषमता व अत्याचार या घटकांना सर्वार्थाने या व्यवस्थेत स्थान दिले नाही. त्यांच्या मते, आदर्श विश्वव्यवस्थेमध्ये विवेक, शिक्षण, विज्ञान. या माध्यमातून मानवी कल्याणावर भर दिला पाहिजे.

आदर्शवादी सिध्दांत हा आंतरराष्ट्रीय समाजामध्ये हिंसा, अनैतिकता, सत्तेचे राजकारण यांना

स्थान देत नाही, तर शिक्षण, विवेकशीलता आणि विविध प्रभावशाली आंतरराष्ट्रीय संघटनांच्या माध्यमातून चांगली विश्वव्यवस्था निर्माण करण्यावर भर देतो. यांच्या मते, आंतरराष्ट्रीय संघर्ष हा सत्तेसाठी न होता विविध आदर्शासाठी झाला पाहिजे.

## ❐ आदर्शवादी सिध्दांताची वैशिष्ट्ये :-

१. आंतरराष्ट्रीय जगामध्ये सत्ता धोरणाचा परित्याग करून नैतिक सिध्दांताचे पालन करावे.

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आदर्शवादी सिध्दांत सत्तेऐवजी नैतिकतेवर भर देतो. यासाठी सत्ता राजकारण व संघर्ष न करता परस्पर संबंध आंतरराष्ट्रीय राजकारणात नैतिकतेवर निर्माण करावेत.

२. लोकशाहीविरोधी सर्वंकषशाही सत्तेचा प्रभाव समाप्त करण्याचा प्रयत्न करावा. आदर्शवादी सिध्दांताच्या मते, सर्वंकषशाही व्यवस्थेमध्ये सत्तेचा प्रभाव जास्त असता, यामुळे सत्ता संघर्ष अधिक प्रखर बनतो. या सत्ता संघर्षातून व्यवस्था ही अस्थीर होते.

३. आदर्शवादी सिध्दांत व आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये मानवी स्वभाव हा चांगले कार्य करण्यास सक्षम असतो असे स्पष्ट केले आहे.

४. अयोग्य मानवी वर्तन हे वाईट वातावरणाची निर्मिती करते, ज्यातून मानवी कल्याण व संस्कृतीची प्रगती होत नाही. यामुळे चांगल्या वर्तनाची मानवाकडून अपेक्षा हा सिध्दांत ठेवतो.

५. आदर्शवादी सिध्दांत हा आंतरराष्ट्रीय राजकारणात युध्द, हिंसा व अशांतता संपवण्याचे प्रयत्न करतो.

६. आंतरराष्ट्रीय राजकारणात शांती, समृध्दी व विकासासाठी आंतरराष्ट्रीय कायदे निर्माण करणे तसेच आंतरराष्ट्रीय संस्था निर्माण करणे त्यांच्या कार्यपध्दतीतून शांतता निर्माण होऊ शकेल.

७. आदर्शवादी सिध्दांत हे आंतरराष्ट्रीय राजकारणात विश्व शासनप्रणालीची स्थापना निर्माण करून सत्तेच्या राजकारणाच्या समाप्तीसाठी प्रयत्न करतात.

अशा पध्दतीने आदर्शवादाची वैशिष्ट्ये दिसून येत असून यात नैतिकतेला महत्त्व देवून वास्तववादी शक्तीला नाकारले आहे. या आदर्शवादी सिध्दांताचे मुख्य समर्थक म्हणून म. गांधी, बर्टंड रसेल, वुड्रो विल्सन, अल्डस हक्सले, विल्यम लॅड, रिचर्ड कोबेन, मार्गेट मोड इ.चा समावेश होता. हा सिध्दांत आंतरराष्ट्रीय राजकारणात युध्द सत्ता व संघर्ष यांना नष्ट करण्यासाठी शिक्षण व विज्ञानाचा वापर याचे समर्थन करतो.

## ❐ आदर्शवादी सिध्दांतांची अंमलबजावणी :-

वुड्रो विल्सन यांनी आदर्शवादी विचाराला प्रोत्साहन दिले. पहिल्या महायुध्दानंतर लिग ऑफ नेशनच्या निर्मितीमध्ये आदर्शवादी विचारांचा प्रभाव दिसून येतो. आदर्शवाद हा मानवी हक्काचा प्रचारक आहे. या आदर्शवादाला लोकशाही शांतता सिध्दांत असेही म्हटले जाते. नैतिक तत्व, संविधानिकता, विश्वास, न्यायाची अपेक्षा याचा आंतर्भाव यात असतो.

वुड्रो विल्सन यांनी लिग ऑफ नेशनच्या निर्मितीवेळी १४ सूत्र कल्पना मांडली. त्यात सत्ता संघर्षाऐवजी शांततेवर अधिक भर होता. या शांततेच्या माध्यमातून जगाची उभारणी केली पाहिजे असे सांगितले. यात जगात शांतता निर्माण करून सुरक्षितता निर्माण करण्याचे धोरण होते. युध्द असमानता,निराशावाद, हिंसा हे जर जगातून नष्ट करावयाचे असेल तरच नैतिकतेला स्थान दिले पाहिजे, असा विश्वास आदर्शवादी सिध्दांतात स्पष्ट केला आहे.

## २.२.२ वास्तववादी सिध्दांत

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये वास्तववादी सिध्दांत हा तर्क व अनुमानावर अवलंबून आहे. हा सिध्दांत सुरक्षा व शक्ती तत्वावर अधिक भर देतो. विचारधारेत व्यक्तीमध्ये अशी भावना निर्माण होते की, दुसरे लोक आपणास नष्ट करणारे आहेत. या असुरक्षित भावनेतूनच तो आपली सुरक्षितता निर्माण करण्यास नेहमी तत्पर असतो. वास्तववादी सिध्दांताच्या मते, जगामध्ये नेहमी कोणत्या-ना-कोणत्या दोन राष्ट्रात संघर्ष चालू असतो आणि या संघर्षातून सत्ता मिळवण्याचा नेहमी प्रयत्न चालू असतो. यातून जगात नेहमी सत्ता स्पर्धा दिसून येते. याबाबत जॉन केनन व हेन्स मार्गेन्थॉ यांच्या मते, राष्ट्रहिताचा आधार हा बुध्दीमत्तापूर्ण धोरण असले पाहिजे. पण राष्ट्र हित व नैतिक सिध्दांत दोन्ही विचारामध्ये नेहमी संघर्ष चालू असतो. ज्यातून आंतरराष्ट्रीय संबंध निर्माण होत असतात. यातील जॉन केनन या विचारवंतांच्या मते, नैतिक सिध्दांताचा वापर आपल्या राष्ट्रहितासाठी केला पाहिजे. दुसऱ्यांवर तो लादला नाही पाहिजे. पण हेन्स मार्गेन्थॉ यांच्या मते, राष्ट्र हित हे सर्वोच्च असून ते नैतिक सिध्दांताच्यापेक्षाही सर्वोच्च आहे.

## ❐ हेन्स मॉर्गेन्थॉचा वास्तववादी सिध्दांत :-

मॉर्गेन्थॉ हा वास्तववादी सिध्दांताचा प्रवक्ता असून त्याने या सिध्दांताला सुव्यवस्थीत स्वरूप प्राप्त करून दिले आहे.

मॉर्गेन्थॉ यांनी पॉलिटिक्स अमंगनेशन या पुस्तकामध्ये प्रभावीरित्या वास्तववादी सिध्दांताची मांडणी केली आहे, त्याने वास्तववादी सिध्दांताची प्रतिमा विकसीत केली आहे.

## ❑ हेन्स मॉर्गेन्थॉच्या वास्तववादी सिध्दांताचे प्रमुख तत्त्वे :-

१. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा मूळ आधार राष्ट्रीय हित असून जो सत्ता संघर्षामध्ये नेत आहे :-

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राष्ट्रहिताला विशेष भर दिला असून हे राष्ट्रीय हित सत्तेच्या द्वारे साध्य केले पाहिजे. यासाठी सत्ता केंद्रिकरणाला प्रोत्साहन हा दृष्टीकोन देतो, यामुळे या सिध्दांताला सत्तावादी सिध्दांतसुध्दा म्हणतात. मॉर्गेन्थॉ यांच्या मते, आंतरराष्ट्रीय राजकारण सत्तेचा संघर्ष असून याचा अंतिम उद्देश सत्ता प्राप्त करून नियंत्रण निर्माण करणे होय, याच्यातून प्रत्येक राष्ट्र आपले राष्ट्रीय हित साध्य करीत असत. मॉर्गेन्थॉच्या या तत्वामध्ये सत्तेसाठीचा संघर्ष हे मानवी स्वभावातूनच प्रतिबिंबीत होत असते. हे तत्व त्या प्रतिबिंबाचे रूप दाखवते.

२. राष्ट्रहिताला सर्वोच्च स्थान : राष्ट्र हित म्हणजेच सत्ता होय. वास्तववादी सिध्दांत आंतरराष्ट्रीय राजकारणात काय झाले पाहिजे. काय होईल. नैतिक अनैतिक घटक याचा विचार करत नाही तर तत्कालीन वास्तविकता काय आहे आणि राष्ट्र हित कोणते आहे. याचा विचार करते आणि त्या राष्ट्र हिताच्या प्राप्तीसाठी सत्तेचा वापर करत राष्ट्रहिताचा केंद्रबिंदू सुरक्षा हा असून या सुरक्षेसाठी सत्ता प्राप्त केली जाते. मॉर्गेन्थॉ यांच्या मते, परराष्ट्र धोरणाच्या निर्मिती सत्तेच्या आधारावर केली पाहिजे. यातूनच राष्ट्रीय हित साध्य होऊ शकेल. तसेच नैतिक व राजकीय प्रयोजनातून कार्य न पाहता वास्तविक परिणामातूनच कार्य बघितले पाहिजे असे प्रतिपादन करतो.

३. राष्ट्रहिताचे कोणतेही निश्चित व निर्धारित अर्थ नाहीत : मॉर्गेन्थॉ यांच्या मते, आंतरराष्ट्रीय राजकारणाचे मूलतत्त्व हे शाश्वत आहे. परंतु बदलत्या परिस्थितीनुसार त्यात परिवर्तन होत असते. त्यामुळे एखाद्या राजकीय नेत्याला मूलतत्त्वाच्या बदलत्या परिस्थितीनुसार बदलणे आवश्यक आहे. म्हणजेच सत्ता सिध्दांतामध्ये परिवर्तन करणे आवश्यक आहे व हे करीत असताना सत्तेच्या मर्यादाही लक्षात ठेवल्या पाहिजेत. म्हणून मॉगेन्थॉ म्हणतो, राष्ट्रहित हे निश्चित नसते ते परिवर्तनशील असते व हे परिवर्तन आंतरराष्ट्रीय राजकारणानुसार होत असते. त्यामुळे राष्ट्रहितात हित हे वास्तविक घटनांवर व परिवर्तनावर अवलंबून असते.

४. राजकीय कार्य व नैतिक कार्य यांचे महत्व व तणाव : वास्तववादी सिध्दांत राजकीय कार्य व नैतिकतेला महत्त्व देतात. तसेच या दोघांच्यामध्ये तणावही निर्माण होत असतात. पण पूर्ण नैतिक कार्य हे राज्यावर लागू होऊ शकत नाही. परिस्थितीनुसार नैतिक सिध्दांताची निवड केली पाहिजे व ही निवड विवेकी संभावित परिणामाच्या आधारित केली जावी. मार्गेन्थॉ म्हणतात, नैतिकतेचे महत्व व्यक्तीसाठी आवश्यक आहे. पण राज्यासाठी ते पूर्णपणे लागू होऊ शकत नाही. कोणताही देश नैतिकतेचा विचार करून आपली सुरक्षितता संपुष्टात आणू शकत नाही. याप्रकारे

राजकीय व नैतिक कार्याचे महत्त्व असले तरी यांच्यात तणाव असून राज्य व्यवस्थेत नैतिकतेची अंमलबजावणी करताना परिस्थिती विचारात घेऊन विवेकी पध्दतीने त्याचा वापर करतो.

५. राष्ट्रीय नैतिक मुल्य व सार्वभौम नैतिक मूल्य एक नसून पृथक आहेत. मॉगेन्थॉ यांच्या मते, सार्वभौम नैतिक कायद्याचे पालन कोणत्याही देशाला लाभदायक असत नाही. कारण नैतिक सिध्दांताच्या रक्षणासाठी आपल्या देशाच्या हितसंबंधाचे बलिदान देणे व्यवहार्य नाही. पण या विचाराने नैतिकतेचा परित्याग करणे हे चुकीचे आहे, असे टीकाकार म्हणतात. यामुळे मॉर्गेन्थॉ यांचे मते, प्रत्येक राष्ट्राने आपली राष्ट्रीय सत्ता राष्ट्रहिताच्या दृष्टीने परिभाषेत करावी. यात प्रत्येक राष्ट्राने आपल्या कार्याचे नैतिकतेच्या दृष्टीने योग्य कसे आहे याचे विवेचन करावे. पण यामुळे जगात इतर राष्ट्रांच्या राष्ट्रीय हितावर आघात झाले आहेत. त्यामुळे या नैतिकतेबाबत जगात संभ्रम अवस्था आहे. मॉर्गेन्थॉ म्हणतो, जगातील प्रत्येक राष्ट्राने परस्पर विवेकाच्या आधारावर संतुलन प्रस्तावित केले. तर ती सर्वात मोठी नैतिकता होईल.

६. आंतरराष्ट्रीय राजकारणाची स्वायत्तता : मॉर्गेन्थॉ यांनी आंतरराष्ट्रीय राजकारण हा स्वतंत्रच विषय मांडला असून राजकीय क्षेत्रातील स्वायत्तता प्रतिपादित केलेली आहे. वास्तववादी सिध्दांत हा गैर राजकीय विषयापासून अभिज्ञ नाही. पण तो राजकीय नियमांच्या अभिज्ञ आहे. वास्तववादी विचार अशा विचारप्रणालीला विरोध करतात जे राजकीय विषयावर गैर राजकीय नियम लादण्याचा प्रयत्न करतात. मॉर्गेन्थॉ म्हणतात, राजकीय क्षेत्र हे अर्थशास्त्र किंवा समाजशास्त्राप्रमाणे स्वतंत्र क्षेत्र आहे. यात मानवी प्रवृत्तीचे स्वरूप आंतरराज्य संबंध, राष्ट्रहित, परराष्ट्र संबंध. अशा विविध घटकांचा समावेश होतो.

अशा प्रकारे मॉर्गेन्थॉ यांनी आंतरराष्ट्रीय सिध्दांताची तत्त्वे सांगितलेली आहेत. त्यांनी सत्ता हे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे केंद्र मानले आहे व सत्तेतच राष्ट्रीय हिताचे प्रतिबिंब स्पष्ट केले आहे. राष्ट्र हिताच्या कार्याला त्यांनी अनैतिक मानले नाही. सत्तेद्वारे राष्ट्रहिताची पूर्ती करणे हिच नैतिकता असे स्पष्ट केले आहे. त्यांच्या मते, आंतरराष्ट्रीय नैतिकता जागतिक जनमत आंतरराष्ट्रीय कायद्याद्वारे सत्ता संघर्ष प्रतिबाधित करता येऊ शकत नाही. शेवटी मॉर्गेन्थॉ म्हणतात. परस्पर सहयोग म्हणजेच धोरण कुशलतेच्या आधारावरच जागतिक शांतता निर्माण होऊ शकते.

## ❑ हेन्स मॉर्गेन्थॉच्या वास्तववादी सिध्दांताचे मूल्यांकन :-

मॉर्गेन्थॉ यांच्या वास्तववादी सिध्दांतावर स्टेनली एच हाफ मॅन यांनी खालीलप्रमाणे टिका केली आहे.

१. मॉर्गेन्थॉचा सत्तासंबंधी विचार हा वास्तववादी राजकारणाचे एक पक्षीय विवेचन करतो.

२. आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये शक्ति संघर्षच प्रमुख नसून आर्थिक, सांस्कृतिक व घटकही

तितकेच महत्त्वाचे आहेत. याकडे त्यांनी दुर्लक्ष केलेले आहे.

३. मॉर्गेन्थॉ याने शक्तीवर अधिक भर दिलेली असून राजकीय कार्य साध्य मानले, पण शक्ती हे साध्य नसून साधन आहे. याकडे दुर्लक्ष केले आहे.

४. मॉर्गेन्थॉ याचा राष्ट्रहिताचा विचार काल्पनिक व एकाकी आहे.

५. मॉर्गेन्थॉ यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात संघर्षाला अधिक महत्व देऊन शांतीच्या मार्गाला तिलांजली दिली आहे. या पध्दतीने मॉर्गेन्थॉच्या विचारावर हफमॅन यांनी टिका करून आलोचना केली आहे. त्यांच्या मते, मॉर्गेन्थॉचा सिध्दांत परस्परविरोधी तत्वांचा समावेश असल्याने ते जटिल बनले आहे.

❐ **महत्त्व :–**

मॉर्गेन्थॉच्या वास्तववादी विचारावर टिका होत असली तरी आंतरराष्ट्रीय राजकारणात त्यांनी मांडलेल्या सिध्दांताची उपेक्षा होऊ शकत नाही. ह्या सिध्दांताने सर्वप्रथम आंतरराष्ट्रीय राजकारणाचे व्यापक विश्लेषण केलेले आहे. आजचे युग शक्ती संघर्षाचे आहे व हे कोणीच नाकारू शकत नाही. प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रीय हितानुसार परराष्ट्र धोरणाचे संचलन करत असतो. यामुळे मॉर्गेन्थॉ सिध्दांताचे महत्व अधोरेखित होते.

## २.२.३ मार्क्सवादी सिध्दांत

आंतरराष्ट्रीय राजकारणातील मार्क्सवादी सिध्दांत हा राजकीय संघर्षाचा वास्तववादी सिध्दांत व शांतता आणि सहकार्याचा आदर्शवादी सिध्दांत नाकारून त्याऐवजी आंतरराष्ट्रीय राजकारणात भौतिक व आर्थिक गोष्टींवर लक्ष केंद्रीत करण्याचे विचार मांडतो. मार्क्सवादी सिध्दांताच्या विचाराचे प्रतिमान हे आंतरराष्ट्रीय राजकारणात आर्थिक व भौतिकतेबरोबरच अर्थव्यवस्थेचाही समावेश करून वर्ग उन्नतीकडे लक्ष देतो.

आंतरराष्ट्रीय राजकारणातील संघर्ष हा प्रामुख्याने भांडवलशाही व्यवस्थेतून झाला आहे, असे प्रतिपादन कार्ल मार्क्स व फ्रेडरिक एँगेल्स यांनी केले आहे. त्यांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाची प्रक्रिया समजून घेण्यासाठी ऐतिहासिक भौतिकवाद मांडला आहे. ज्यात वर्गसंघर्षाचे विवेचन केलेले आहे. त्यांच्या मते, मानवी इतिहासाला भौतिक गरजा पूर्ण करण्यासाठी वर्गवर्चस्वाचा संघर्ष दिसून येतो व यात शोषण करणारा वर्ग आपल्या फायद्यासाठी व वर्चस्वासाठी शोषित वर्गाला अविकसीत ठेवतो. यामध्ये मार्क्स उत्पादन साधने बदलली की व्यवस्था परिवर्तन व राज्य सहसंबंधही बदलतो. मार्क्स म्हणतो, ही उत्पादन साधने भांडवलशाही व्यवस्थेकडे असून ही व्यवस्था अन्यायकारक राजकीय

संस्था व राज्यसंबंध निर्माण करणे. यातूनच वैचारिक वर्चस्व तयार होते. या वर्चस्ववादी व्यवस्थेतूनच अभिजनवादी वर्ग निर्माण होतो जो राजकीय व आर्थिक संस्थांच्या माध्यमातून जागतिक संस्था निर्माण करतात व या संस्था अविकसित देशांवर दबाव आणतात.

मार्क्सवादी दृष्टिकोनाच्या मते, एका राज्यातील राजकारणात दोन प्रतिस्पर्धी वर्गात सतत श्रीमंत-गरीब संघर्ष चालू असतो. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय राजकारणातही भांडवलशाही राजकारणातून गरीब देशांचे शोषण होत असते. आंतरराष्ट्रीय राजकारणात साम्राज्यवाद व युध्द यांच्या माध्यमातून श्रीमंत देश गरीब देशांचे शोषण करतात. या शोषणाचा अंत समाजवादाने होऊ शकतो असे मार्क्सवाद म्हणतो. कामगारांच्या क्रांतीने देश हे समाजवादी बनतील आणि त्यानंतर समाजवाद्यांची शक्ती जागतिक पातळीवर भांडवलशाहीचा त्याग करेल व शेवटी सर्व आंतरराष्ट्रीय संबंध समाजवादी बंधुत्वाच्या आधारे निर्माण होईल.

## ❑ आंतरराष्ट्रीय राजकारणातील मार्क्सवादी सिध्दांताची वैशिष्ट्ये :-

१. **श्रीमंत व गरीब राज्यामध्ये वर्ग संघर्ष :** वर्ग संघर्ष हा दोन आर्थिक वर्गात होत असतो. प्रत्येक समाज शोषित व शोषक ह्या वर्गात विभागलेला असून यात उत्पादनाची सर्व सत्ता शोषित म्हणजेच श्रीमंत वर्गाच्या हाती असते. त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय समाज ही भांडवलशाही प्रणित श्रीमंत विकसित शक्तीशाली राज्य व गरीब अविकसित शोषित राज्य यात विभालेला आहे व या दोघांच्यातील संघर्ष नेहमी चालू असतो.

२. **आंतरराष्ट्रीय राजकारणात साम्राज्यवाद समाप्त करणे गरजेचे आहे :** आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये मार्क्सवादी विचारवंत साम्राज्यवादाला भांडवलशाहीचे साधन मानतात. यातून गरीब व विकसनशील राष्ट्रे परावलंबी होतात व ही साम्राज्यवाद साधने नष्ट करणे आवश्यक आहे. यासाठी निवडणूकीसारख्या माध्यमातून नष्ट करणे अशक्य आहे. यासाठी क्रांती झाली पाहिजे.

३. **आंतरराष्ट्रीय राजकारणात नवसाम्राज्यवादाची वास्तविकता :** मार्क्सवादी सिध्दांताच्या मते समकालीन आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या मते, साम्राज्यवादी होत असले तरी त्यातून नवीन साम्राज्यवाद निर्माण होतो. त्याच्या माध्यमातून तिसऱ्या जगावर नियंत्रण निर्माण करतात.

## ❑ आंतरराष्ट्रीय राजकारणात मार्क्सवादी सिध्दांताचे मूलभूत घटक :-

१. **सर्वस्ववादी आंतरराष्ट्रीयत्व :** आंतरराष्ट्रीय राजकारणात मार्क्सवादी सिध्दांत सर्वस्ववादी, आंतरराष्ट्रीयतेच्या संकल्पनेवर आधारलेला असून यात आंतरराष्ट्रीय स्तरावर कामगार वर्गाच्या एकतेचे धोरण अवलंबली आहे.

२. **साम्राज्यवादाला विरोध :** आंतरराष्ट्रीय राजकारणात मार्क्सवाद साम्राज्यवादाला विरोध

करून साम्राज्यवाद नष्ट करणे अपरिहार्य मानले आहे.

३. **स्वनिर्धारण :** मार्क्सवादी सिध्दांत आंतरराष्ट्रीय समाजात स्वनिर्धारण तत्त्व स्वीकारत असून त्यातून राष्ट्रांत आत्मनिर्भरता निर्माण करून साम्राज्यवाद प्रणाली नष्ट करून एक स्थायी मजबूत प्रणाली निर्माण करण्याकडे कल आहे.

४. **शांतता व सहअस्तित्व :** मार्क्सवादाच्या मते, शांतता व सहअस्तित्व हे समाजवादामध्ये शक्य आहे. पण याचा अर्थ असा नाही की, भांडवलशाहीशी संघर्ष करायचा नाही. त्या संघर्षातूनच समाजात शांतता व सहअस्तित्व निर्माण करणे.

अशा पध्दतीने मार्क्सवादी सिध्दांत साम्राज्यवाद नष्ट करून भांडवलशाही व्यवस्थेच्या शोषण प्रणालीवर टीका करून समाजवाद्याची स्थापना जगात केली पाहिजे, असे प्रतिपादन करतात.

## २.२.४ परावलंबन व परस्परावलंबन सिद्धांत

- **परावलंबनाचा सिद्धांत (DEPENDENCY THEORY)**

परावलंबनाचा सिद्धांत मुलतः अविकसित राष्ट्रे अपेक्षित आर्थिक विकास व प्रगती का साध्य करु शकली नाहीत. याच्या कारणांचा शोध घेतो. अविकसित राष्ट्रांच्या प्रगतीमध्ये कोणत्या अडचणी आहेत याची कारणमीमांसा परावलंबनाचा सिद्धांतमध्ये स्पष्ट करण्यात आली आहे.

सध्याच्या जागतिक व्यवस्थेमध्ये प्रत्येक राष्ट्र स्वतःचे हित जोपासण्यासाठी एकमेकांवर अवलंबून असल्याचे दिसते. परंतु याच अवलंबित्वामुळे विकसित राष्ट्रे अविकसित राष्ट्रांचे शोषण करतात असे या परावलंबन सिद्धांतामध्ये मांडण्यात आले आहे. अविकसित राष्ट्रे त्यांच्या विकासासाठी विकसित राष्ट्रांवर अवलंबून असल्यामुळे त्यांना अपेक्षित आर्थिक प्रगती साध्य करता येत नाही कारण विकसित राष्ट्रे फक्त त्यांच्या फायदयासाठी आवश्यक घटकांची देवाणघेवाण करतात आणि गरीब राष्ट्रांच्या गरजांकडे दुर्लक्ष करतात असे या सिद्धांतामध्ये प्रतिपादन करण्यात आले आहे.

परावलंबनाचा सिद्धांत हा आधुनिकीकरण सिद्धांताची चिकित्सा व त्यानुसार मांडण्यात आलेल्या दाव्यांना खोडून काढतो. आधुनिकीकरण सिद्धांतामध्ये युरोपीय जीवनप्रणाली, भांडवली अर्थव्यवस्था, उत्पादन पध्दती या आर्थिक प्रगती साध्य करण्यात यशस्वी झाल्यामुळे इतर राष्ट्रे ही युरोपीय व्यवस्थेचे अनुकरण करण्याचा प्रयत्न करतात व परस्पर सहकार्यातून आपली आर्थिक प्रगती साध्य करतात. काही राष्ट्रे त्यांच्या अंतर्गत कारणामुळे आर्थिक प्रगती साध्य करू शकत नाहीत. त्या देशांमधील प्रशासकीय व्यवस्था कमकुवत असणे, जागतिक आर्थिक व्यवस्थेशी त्या देशांची बाजारपेठ संलग्न नसणे ही कारणे त्यांच्या आर्थिक अधोगतीसाठी कारणीभूत ठरतात असे आधुनिकीकरणाच्या सिद्धांतामध्ये मांडले आहे.

परंतु परावलंबनाचा सिद्धांत आधुनिकीकरणाच्या सिद्धांतातील मांडणीला आक्षेप घेत युरोपीय जीवनप्रणाली ही भांडवलवादी असून नफा कमावणे हेच त्यांचे अंतिम ध्येय असल्याचे मत व्यक्त करतो. त्यामुळेच अप्रगत, गरीब राष्ट्रांची प्रगती होऊ शकत नाही.

जागतिक भांडवलवादी व्यवस्था ही एका श्रेणीबद्ध पद्धतीने कार्य करते ज्याच्या केंद्रस्थानी विकसित राष्ट्रे आहेत ज्यांना केंद्रीय राष्ट्रे (Core Countries) मानले जाते तर जे राष्ट्रे अविकसित आहेत ती परिघावरच राहतील त्यांना परिघावरील देश (Periphery) असे मानले गेले.

परावलंबनाचा सिद्धांताप्रमाणे परिघावरील देश कधीही केंद्र स्थानी पोहचू शकणार नाहीत म्हणजेच विकसित राष्ट्र बनू शकणार नाहीत कारण विकसित राष्ट्रे व भांडवली अर्थव्यवस्था ते घडू देत नाहीत. परिघावरील म्हणजेच अविकसित राष्ट्रांतून प्राथमिक उत्पादने (Primary Goods), कच्चा माल (Raw Materials) यांची निर्यात केली जाते व विकसित राष्ट्रांकडून अंतिम उत्पादने (Finished Goods) यांची आयात केली जाते. त्यामुळे अशा व्यवस्थेच्या शेवटी फायदा हा विकसित राष्ट्रांनाच होतो असे परावलंबनाच्या सिद्धांतामध्ये मांडले आहे. परावलंबनाचा सिद्धांत १९६० च्या दशकात प्रामुख्याने लॅटिन अमेरिकेत मांडला गेला आणि नंतर आफ्रिका व आशिया खंडाच्या अनुषंगाने तिसऱ्या जगातील देशांचे मागासलेपण हे विकसित कृत्यावर आधारित असल्याचे मत मांडले.

परावलंबनाचा सिद्धांत प्रामुख्याने ए.जी. फ्रांक, रॉल प्रेबिश, डॉन संटोस, इम्यानुयल वॉलरस्टाईन, समीर अमीन या विचारवंतांनी मांडला.

परावलंबनाचा सिद्धांत हा मार्क्सच्या आर्थिक व्यवस्थेमधील असमानतेच्या विश्लेषणावर आधारित असल्यामुळे परावलंबनाचा सिद्धांताने आर्थिक नववसाहतवादाला एक सैद्धांतिक आधार दिला असे म्हणता येईल.

- **परावलंबनाच्या सिद्धांतांची काही ठळक वैशिष्ट्ये**

- जागतिक आर्थिक व्यवस्थेमध्ये विकसित देश हे केंद्रस्थानी असून अविकसित देश हे परिघावर आहेत. म्हणजे विकसित देशांच्या विकासाकरता लागणारा कच्चा माल, प्राथमिक उत्पादने, स्वस्त श्रमिक यांचा पुरवठा अविकसित देशांमधून केला जातो.
- अविकसित देश दुर्बळ असल्यामुळे त्यांच्या अर्थकारणात व राजकारणात विकसित देश हस्तक्षेप करतात.
- अविकसित देश त्यांच्या प्रगतीसाठी विकसित देशांवर अवलंबून असतात त्यामुळे त्यांची प्रगती होण्याऐवजी शोषण होते व आर्थिक प्रगती होत नाही.

इम्यानुयल वालस्टाईन यांनी परावलंबित्व स्पष्ट करताना जागतिक व्यवस्था सिद्धांत मांडला. त्यांच्या मते तिसऱ्या जगातील देशांतर्गत व देशां-देशांमधील संघर्ष, गरीब राष्ट्रांचे शोषण हे फक्त भांडवलवादी अर्थव्यवस्थेमुळेच आहेत.

हे मांडत असताना त्यांनी जगातील देशांची विभागणी तीन गटांत केली.

१) **केंद्रीय देश** (Core Countries)

यामध्ये विकसित राष्ट्रांचा समावेश केला आहे. आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी व आर्थिक शक्ती म्हणून उदयास आलेल्या देशांचा समावेश करण्यात आला आहे.

उदा. - अमेरिकेचे संयुक्त राष्ट्र (USA), फ्रान्स इ.

२) **परिघावरील देश** (Periphery)

यामध्ये अविकसित राष्ट्रांचे समावेश करण्यात आहे. याच राष्ट्रातून विकसित राष्ट्रांना कच्चा माल, स्वस्त श्रमिक पुरवले जातात. हे देश आर्थिकदृष्ट्या मागास व दुर्बळ समजले जातात. उदा. युगांडा, माली इ.

३) **अर्ध परिघावरील** (Semi Periphery)

यामध्ये जागतिक भांडवली अर्थव्यवस्थेत आपला फायदा करुन आर्थिक प्रगती साध्य करण्याचा प्रयत्न करणारी राष्ट्रे समाविष्ट केली आहेत. हे देश विकसित देशांचे हितसंबंध सांभाळण्याचे काम करतात कारण जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा फायदा या देशांना होतो म्हणून हे देश आघात शोषक (Shock absorber) म्हणून कार्य करतात. उदा. - भारत, ब्राझील इ.

परावलंबनाच्या सिद्धांतामुळे जागतिक व्यवस्थेमध्ये असणारी विदारक आर्थिक विषमता अधोरेखित केली आहे. या सिद्धांताने तिसऱ्या जगातील अविकसित देशांच्या आर्थिक शोषणाची जबाबदारी ही विकसित देशांवर निश्चित केल्यामुळे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला मानवीय दृष्टिकोनातून आव्हान तयार झाले.

परावलंबनाची अवस्था ही भांडवली अर्थव्यवस्थेमुळे अधिकाधिक प्रबळ होत जाते. त्यामुळे भांडवली अर्थव्यवस्थेचा अंत करुन समाजवादी अर्थव्यवस्थेची पुनर्स्थापना जागतिक व्यवस्था म्हणून करणे हाच पर्याय असल्याचे मत इमॅनुयल वॉलरस्टाईन यांनी आपल्या जागतिक व्यवस्था सिद्धांतामध्ये व्यक्त केले आहे.

- परावलंबनाच्या सिद्धांताची चिकित्सा

- परावलंबनाच्या सिद्धांत एकाच परिप्रेक्षातून जागतिक व्यवस्था पाहतो. त्यामुळे वास्तव आर्थिक परिस्थितीचे आकलन पूर्णपणे करता येत नाही.
- परावलंबनाच्या सिद्धांतामध्ये विकसित व अविकसित राष्ट्रामध्ये परस्पर सहकारातून झालेल्या प्रगतीचा विचार केला जात नाही.
- भांडवली अर्थव्यवस्था हीच दोषपूर्ण असल्यामुळे संपूर्ण व्यवस्थाच संपवून नवी व्यवस्था स्थापण्याचे अंतिम ध्येय परावलंबनाच्या सिद्धांतात सांगितले असल्यामुळे भांडवली व्यवस्थेमुळे मानवजातीला झालेल्या वैज्ञानिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक फायद्याकडे दुर्लक्ष केले आहे.

- **परस्परावलंबन सिद्धांत (Theory of Interdependence)**

जगातील प्रत्येक देश कोणत्या ना कोणत्या कारणासाठी परस्परांवर अवलंबून असतात. राष्ट्र कितीही मोठे, समृद्ध आणि विकसित असो ते कधीच सर्वच बाबतीत स्वयंपूर्ण असू शकत नाही. विशाल, समृद्ध, मोठया राष्ट्रांनाही अन्य मोठ्या विकसित आणि छोट्या अविकसित राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागते. तसेच राष्ट्रांच्या प्रगतीसाठी फक्त राष्ट्रा-राष्ट्रांचे एकमेकांवरील अवलंबीत्व पुरेसे नाही तर अराजकीय संस्था, बहुराष्ट्रीय कंपन्या, अशासकीय संघटना यांचे ही राष्ट्रांना परस्पर सहकार्य आवश्यक असते म्हणून परस्परावलंबन हे आजच्या आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे एक महत्वाचे वैशिष्ट आहे.

आजच्या जागतिक परिस्थितीत राष्ट्रांचे परस्परावलंबन वाढल्याचे दिसते. प्रत्येक राष्ट्रांसमोर असणाऱ्या काही समस्या या जागतिक स्वरुपाच्या आहेत. उदा. - वातावरणीय बदल, तापमान वाढ, दहशतवाद, इत्यादी. या समस्यांचा सामना करण्यासाठी राष्ट्रांना परस्पर सहकार्य निकडीचे आहे अन्यथा कोणताही देश एकट्याने या समस्यांचे निराकरण करु शकणार नाही. त्यामुळे अशा गंभीर समस्यांची सोडवणूक करण्यासाठी व त्यातून आपल्या राष्ट्रांचे हित साध्य करुन घेण्यासाठी प्रत्येक राष्ट्र परस्परांवर अवलंबून असल्याचे दिसते. परस्परावलंबनामुळे प्रत्येक राष्ट्राची आर्थिक-सामाजिक स्थिती सुधारण्यास तसेच आजच्या जागतिक व्यवस्थेला स्थिरता प्राप्त करुन देण्यासाठी मदत होते असे प्रतिपादन परस्परावलंबनाच्या सिद्धांतामध्ये करण्यात आले आहे.

सन १९७७ साली राजकीय अभ्यासक रॉबर्ट कोहेन व जोसेफ नाय यांनी त्यांच्या ''पॉवर अँड इंटरडीपेंडेन्स'' या पुस्तकात परस्परावलंबनाच्या सिद्धांताची मांडणी केली आहे. रिचर्ड रोस्क्रान्स,

थॉमस फ्रीडमन यांनीही त्यामध्ये भर घातली. त्यांच्या मते राष्ट्रे जितके जास्त परस्परावलंबन वाढवतील तितके त्यांच्यातील संबंध वाढीस चालना मिळेल व एकमेकांच्या आर्थिक विकासात वाढ होण्यास मदत होईल.

राजकीय अभ्यासक थॉमस फ्रीडमन यांनी परस्परावलंबनाचा सिद्धांत स्पष्ट करताना ङ्गगोल्डन आर्चेसफ ची सकंल्पना सांगितली ज्यामध्ये त्यांनी 'मॅकडोनाल्ड' या बर्गर विकणाऱ्या उपहारगृहाचे उदाहरण देवून असे सांगितले की ज्या राष्ट्रांनी 'मॅकडोनाल्ड' ची साखळी परस्परात निर्माण केली आहे. त्या राष्ट्रातील नागरिक हे युद्धासाठी उभे राहण्यासाठी 'बर्गर' साठी रांगेत उभे राहणे पसंत करतील. याचाच अर्थ परस्पर सहकार्यामुळे एकमेकांबददलची द्वेषभावना कमी होऊन राष्ट्रे आपल्या समोरील मूलभूत समस्यांकडे लक्ष देतील.

रिचर्ड रोस्क्रांस यांनी 'व्यापारी राष्ट्रे' ही संकल्पना सुचवली. त्यांच्या मते लष्करी संबंधापेक्षा व्यापारावर आधारित संबंध प्रस्थापित व्हावेत ज्यामुळे राष्ट्रांच्या प्रगतीला खीळ बसणार नाही. उदा.- दुसऱ्या महायुदधानंतर जर्मनी व जपान ह्या राष्ट्रांनी व्यापारावर आधारित संबंध प्रस्थापित करण्यावर भर दिल्यामुळे दोन्हीही राष्ट्रे प्रगत व विकसित बनली. म्हणजेच परस्परावलंबनाचा सिद्धांत आर्थिक परस्परावलंबनाचा आग्रह धरतो व राष्ट्रातील संबंधाचे 'आर्थिक भुमिका' ही प्रमुख घटक असावा असे प्रतिपादन करतो.

परस्परावलंबाचे मूळ जागतिकीकरण, उदारीकरण व खासगीकरणाच्या प्रक्रियेला सैद्धांतिक अधिष्ठान तयार करणे हे आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला सैद्धांतिक व वैचारिक आधार मिळवून देणे व जागतिकीकरणाच्या प्रक्रियेला समर्थन देण्याची भुमिका परस्परावलंबनाच्या सिद्धांतामध्ये व्यक्त होते. या सिद्धांतानुसार दोन राष्ट्रांमधील परस्परावलंबन वृध्दींगत झाल्यास त्या राष्ट्रामध्ये शांतता प्रस्थापित होईल व कोणत्याही प्रकारचा संघर्ष निर्माण होणार नाही. थोडक्यात परस्परावलंबीत्त्व राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्षाची व लढायांची संभाव्यता कमी करते आणि समरसतेची हमी देते.

**परस्परावलंबनाचा सिद्धांताची चिकित्सा**

- परस्परावलंबनाचा सिद्धांत हा भांडवली अर्थव्यवस्थेचे समर्थन करणारा असल्यामुळे मार्क्सवादी विचारवंताच्या मते अविकसित राष्ट्रांच्या शोषणाबद्दल कोणतेही भाष्य करत नाही.
- आंतरराष्ट्रीय राजकारणात लष्करी शक्ती व राष्ट्रीय सुरक्षा अत्यंत महत्वाची असल्याचे मत वास्तववादी विचारवंत व्यक्त करतात व राष्ट्रांनी लष्करी शक्ती पेक्षा व्यापारी राष्ट्र बनावे या मांडणीला खोडून काढतात.

- स्त्रीवादी विचारवंतांनी भांडवली जागतिक व्यवस्थेवर स्त्रीयांच्या अधिकारावर गदा आणणारी व्यवस्था म्हणून टीका केली. त्यामुळे परस्परावलंबनाचा सिद्धांत जागतिक व्यवस्थेत स्त्रीयांच्या सहभागाविषयी कोणतीही भुमिका व्यक्त करत नसल्याचे मत स्त्रीवादी विचारवंत व्यक्त करतात.

## २.२.५ खेळ सिध्दांत

खेळ सिध्दांत हा आंतरराष्ट्रीय राजकारणात असे प्रतिमान देण्याचा प्रयत्न करते, ज्यावेळी आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये प्रतिस्पर्धा परिस्थितीमध्ये निर्णय घेणे अशक्य असते. आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्पर्धात्मक परिस्थितीमध्ये एखादा निर्णय घेताना तत्कालीन परिस्थितीचे आकलन होणे आवश्यक असते व यासाठी खेळ सिध्दांत काही विचारवंतांनी मांडला आहे. १७१० मध्ये लिबलीस याने गणितात तो प्रथम मांडला.

खेळ सिध्दांताविषयी विचार सर्वप्रथम 'थेअरी ऑफ गेम्स ॲन्ड इकॉनॉमीक बिहेवीयर' या पुस्तकात प्रकाशित झाला होता. हा सिध्दांत जॉन वॉन ल्यूपैन या गणित तज्ज्ञ व ओश्कार मॉर्गेन्थॉ या अर्थशास्त्रज्ञाने प्रतिपादित केला. या सिध्दांताला कार्ल ड्यूश्च व मार्टिन शुबीक या विचारवंतांनी विस्तारित स्वरूप दिले व हा सिध्दांत अर्थशास्त्राकडून राज्यशास्त्राकडे स्विकृत करण्यात आला.

खेळ सिध्दांत प्रामुख्याने पाच संकल्पनावर भर देतो.

१) रणनीती ठरवताना आजूबाजूच्या परिस्थितीचा विचार केला जातो.

२) खेळ सिध्दांतात विरोध असणे आवश्यक आहे.

३) खेळ सिध्दांतात शेवटी फायदा-तोट्याचे मूल्यमापन विचारात घेतात.

४) खेळ सिध्दांतात मूलभूत नियम असणे आवश्यक असते.

५) खेळामधील खेळाडूच्या माहितीवर भर दिला जातो.

या पध्दतीने खेळ सिध्दांत आकारास येतो व या खेळ सिध्दांताचे पुढील प्रकार पडतात.

### १. शून्य योग खेळ :-

खेळ सिध्दांताचे हे प्रतिमान आंतरराष्ट्रीय राजकारणात दंड प्रतियोग्यतेमध्ये वापरले जाते. यात एका पक्षाकडून दुसऱ्या पक्षाची पूर्णपणे हानी केली जाते. यात एकतर फायदा तरी होता नाहीतर तोटा तरी होतो. आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये शून्य योग खेळाचे प्रतिमान अवलंबताना पूर्णपणे प्रतिस्पर्धी देशाला पूर्णपणे नष्ट करण्याचे धोरण आखले जाते.

## २. स्थिर शून्यतर योग खेळ :-

आंतरराष्ट्रीय राजकारणात बहुपक्षीय शून्यतर योग खेळामध्ये सहभागी देशांमध्ये संघर्ष असतो. पण हा खेळ या खेळाच्या प्रतिमानात परस्पर विरोधी देशांच्या संघर्षातून पूर्णपणे हानी किंवा पूर्णपणे लाभाचे धोरण नसून परस्पर प्रतिस्पर्धी देशाचा संघर्ष सोडवण्यावर अधिक भर असतो. ज्यावेळी यातील सहभागी देशाला कोणताही तोटा होणार नाही. तसेच यामध्ये जय व पराजय याला स्थान नसते. त्या खेळाचे प्रतिमान आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये अधिक प्रभावी असलेले दिसून येते. जगातील विविध राष्ट्र तसेच परस्परावलंबी राष्ट्र या प्रतिमानाचा वापर संघर्ष सोडण्यासाठी करतात.

## ३. अशून्य योग खेळ :-

यामध्ये दोन व दोनपेक्षा अधिक खेळाडूंचा सहभाग असतो, त्यात प्रतिस्पर्धी दोन्ही देशांमध्ये संघर्ष ना संयोग दिसून येतो. यात संघर्ष व संयोग हे या खेळाची वैशिष्ट्ये असून यात एखाद्या देशाचा लाभ हा दुसऱ्या देशाचा तोटा असतो.

## ४. चिकन गेम :-

या खेळाचे प्रतिमान संघर्षमय परिस्थितीतूनच अवलंबले जाते. उदा. १९६२ ला क्युबा मिसाईल संकटाच्यावेळी चिकन गेम मध्ये एखादे राष्ट्र आपल्या विरोधी राष्ट्राचा हेतू पूर्णपणे न समजला तरी आपल्या राष्ट्र हिताच्या दृष्टीने तो विचार करतो, यावेळी प्रतिस्पर्धी राष्ट्राला लाभ झाला तरी ते धोरण चालू ठेवतो.

## ५. प्रिसनर्स डायलेमा खेळ :-

ज्यावेळी सौदाबाजीची वेळ होते, त्यावेळी हा खेळ वापरला जातो. नि:शस्त्रीकरणामध्ये या सिध्दांताचा वापर केला जातो.

अशा पध्दतीने खेळ सिध्तांतात हा आंतरराष्ट्रीय स्तरावर युध्द संघर्ष परिस्थितीत अवलंबला जातो. आंतरराष्ट्रीय राजकारणातील विविध देशामध्ये कोणत्या-ना-कोणत्या प्रकारचा खेळ सिध्दांत चालू असतो आणि प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्रहिताच्या दृष्टीकोनातून या सिध्दांतानुसार वागत असतो.

आंतरराष्ट्रीय राजकारणात खेळ सिध्दांत दिसून येतो हा खेळ सिध्दांत सर्वप्रथम गणितीय पध्दतीने मांडला असला तरी नंतर याचे आंतरराष्ट्रीय राजकारणात वापर केला जाऊ लागला. खेळ सिध्दांत हे एक साधन म्हणून त्याचा वापर परराष्ट्र धोरणात केला जातो. या सिध्दांतात प्रतिस्पर्धी विरोधक माहित असल्याने त्या विरोधात डावपेच आखणे सोपे जाते. तसेच नैतिक नियमांनाही यात स्थान दिलेले आहे.

## २.३ सारांश

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या विकासाबरोबरच त्याचे अध्ययन क्षेत्र ही विस्तारले गेले ज्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात विविध सिध्दांताचा उदय झाला. आंतरराष्ट्रीय राजकारण अभ्यासण्यासाठी वेळोवेळी विचारवंतांनी वेगवेगळ्या गोष्टींचा अवलंब केला. ज्यामध्ये पारंपारिक दृष्टीकोन व व्यवहारवादी दृष्टीकोन असे दोन भाग पडतात. ज्यातील आदर्शवाद व वास्तववादी सिध्दांत हे पारंपारिक दृष्टिकोनावर अवलंबून असून एक विश्वशांती व नैतिकतेचा पुरस्कार करतो तर दुसरा सिध्दांत सत्ता संघर्षाला आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्व प्राप्त करून देतो. दुसऱ्या महायुध्दानंतर व्यवहारावादी दृष्टीकोनाचा उदय झाला असून यामध्ये व्यवस्थावादीय खेळ सिध्दांत महत्त्वाचा आहे. यात आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रतिमाने स्पष्ट केले आहेत.

## २.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **आंतरराष्ट्रीय राजकारण :** राष्ट्रांमधील राजकारण.
- **आदर्शवादी :** असा व्यक्ती जो आंतरराष्ट्रीय राजकारणाचे संचलन हे आदर्श युक्त व नैतिक मूल्य प्रमाणे झाले पाहिजे असा आग्रह धरतो.

## २.५ स्वयं-अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

♦ **अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या.**

१. वास्तववादी सिध्दांत सांगा.

२. आदर्शवादी सिध्दांताने कशावर भर दिलेला आहे.

३. मार्टन काप्लानच्या व्यवस्थावादी सिध्दांताचे सहा प्रतिमाने सांगा.

४. खेळ सिध्दांत हा आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणी मांडला.

♦ **आ) रिकाम्या जागा भरा.**

१. .............. हे पुस्तक हेन्स मॉर्गेन्थॉ यांनी लिहिलेले आहे.

२. मार्क्सवादी सिध्दांत ................ विचारधारेचे समर्थन करतात.

३. सत्ता संतुलन व्यवस्था .............. शतकात युरोपमध्ये अस्तित्वात होती.

४. वुड्रो विल्सन यांनी .............. सिध्दांताचे समर्थन केलेले आहे.

❑ **उत्तरे :-**

♦ **अ)** १. वास्तववादी सिध्दांत हा आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये सत्तेला महत्त्व देत असून प्रत्येक राष्ट्राने आपल्या राष्ट्रीय हिताचा विचार केला पाहिजे असे प्रतिपादन केले अून राजकारण हे सत्ता संघर्ष आहे असे म्हटले आहे.

२. आदर्शवादी सिध्दांतामध्ये प्रामुख्याने नैतिकता व आदर्श मूल्यांना भार देतो.

३. आंतरराष्ट्रीय राजकारणात मार्टन काप्लन याने सत्ता संतुलन व्यवस्था शिथील द्विध्रुवीय व्यवस्था दृढ द्विध्रुवीय व्यवस्था सार्वभौम नियुक्त व्यवस्था श्रृंखलाबध्द व्यवस्था आणि एकलविटो व्यवस्था असे सहा व्यवस्थांचे प्रतिमान सांगितले आहे.

४. आंतरराष्ट्रीय राजकारणात मार्टीन शुबिकने खेळ सिध्दांत मांडला आहे.

♦ **आ)** १. पॉलिटिकल अमंग नेशन.

२. साम्यवाद.

३. १८ वे व १९ वे

४. आदर्शवाद.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

♦ **अ) टिपा लिहा.**

१. मार्क्सवादी सिध्दांत.

२. खेळ सिध्दांत.

♦ **आ) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. आदर्शवादी सिध्दांत व वास्तववादी सिध्दांत यांच्यातील फरक स्पष्ट करा.

२. हेन्स मार्गेन्थॉच्या वास्तववादी सिध्दांताचे मूल्यांकन करा.

३. आंतरराष्ट्रीय राजकारणातील मार्क्सवादी सिध्दांत स्पष्ट करा.

४. अवलंबीत्व व परस्परावलंबीत्वाचा सिद्धांत स्पष्ट करा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. बाबूलाल फडिया : ‘आंतरराष्ट्रीय राजकारण’.

२. महेंद्रकुमार : ‘आंतरराष्ट्रीय राजनितीतील सैध्दांतिक पक्ष’.

३. प्रकाशचंद्र : ‘इंटरनॅशनल पॉलिटीक्स’.

४. रायपूरकर : ‘आंतरराष्ट्रीय संबंध’.

५. तोडकर बी. डी. : आंतरराष्ट्रीय संबंध


❑❑❑

# राष्ट्रीय सत्ता आणि नि:शस्त्रीकरण

अनुक्रमणिका


३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ राष्ट्रीय सत्ता व राष्ट्रीय सत्तेचे घटक

  ३.२.२ सत्ता समतोल

  ३.२.३ शस्त्रनियंत्रण व नि:शस्त्रीकरण

  ३.२.४ सामूहिक सुरक्षितता

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ सरावासाठी स्वाध्याय

३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ३.० उद्दिष्ट्ये

आधुनिक जग हे अत्यंत जवळ आले आहे. तरीही जग हे अत्यंत गुंतागुंतीचे बनले आहे. जगातील प्रत्येक देश परराष्ट्र धोरण ठरवित असते. प्रत्येक देशामध्ये अनेक क्रिया-प्रतिक्रिया घडत असतात, त्याचा अभ्यास आंतरराष्ट्रीय राजकारणात अभ्यास केला जातो. प्रामुख्याने राष्ट्रीय सत्ता ही प्रत्येक देशाला महत्वाची वाटते, त्याचबरोबर आधुनिक काळात शस्त्रास्त्र स्पर्धा वाढलेली आहे, त्यामुळे त्याच्यावर नियंत्रण ठेवणे किंवा नि:शस्त्रीकरण करणे आवश्यक आहे असे वाटते, त्यामुळे या दोन्ही गोष्टींचा अभ्यास प्रस्तुत प्रकरणात करणार आहोत. त्याचबरोबर राष्ट्रीय सत्ता, सत्ता समतोल व सामूहिक सुरक्षितता याचा ही विचार करणार आहोत, त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राष्ट्रीय सत्तेला महत्वाचे स्थान आहे. कारण मॉर्गेन्थॉ या विचारवंताने आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजेच सत्तेसाठी चाललेला संघर्ष असे म्हटले आहे, म्हणून

सत्ता हे राष्ट्रीय सुरक्षा व देशाचे हितसंबंध जोपासण्याचे महत्त्वाचे साधन आहे. राष्ट्रीय सत्तेद्वारे राष्ट्राचे उद्दिष्ट्ये साध्य करण्यात येते. देशाच्या परराष्ट्र धोरणातील सत्ता हा महत्त्वाचा घटक आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये कोणत्याही राष्ट्राचा दर्जा हा त्या देशाच्या सामर्थ्यावर व सत्तेवर अवलंबून असतो, त्यामुळेच प्रत्येक राष्ट्र हे आपली सत्ता, सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्नात असते, म्हणून सत्ता हे सर्व राजकीय घडामोडींचा केंद्रबिंदू आहे. सत्ता प्राप्तीसाठी राष्ट्राराष्ट्रामध्ये स्पर्धा असते. त्यावर राष्ट्राचे अस्तित्व त्याचे सार्वभौमत्वाचे संरक्षण, त्याच्या हितसंबंधाची जपवणूक इत्यादी गोष्टी अवलंबून असते. म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारण हे राष्ट्रीय सत्तेभोवती फिरत असते. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय संबंध व राजकारणामध्ये राष्ट्रीय सत्तेला महत्त्वाचे स्थान आहे.

## ३.२ विषय विवेचन

राष्ट्रीय सत्तेचा अभ्यास प्राचीन काळापासून केला जातो. प्रामुख्याने भारत आणि चीनमधल्या अनेक विचारवंतानी सत्तेला आपल्या विचारामध्ये केंद्रस्थान दिले होते. शांतीपर्व, मनुस्मृती, कौटिल्याचा अर्थशास्त्रामध्ये सत्तेसंदर्भात परराष्ट्र धोरणासंबंधी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. राष्ट्रीय हितसंबंधाचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे. तर चीनमधील सन त्स्यू या विचारवंताने 'आर्ट ऑफ वॉर' या प्रसिध्द ग्रंथामध्ये सत्तेविषयी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. त्याने साम्राज्यविस्तारावर भर दिलेला असून, शत्रूच्या क्षमतेचे सूक्ष्म निरीक्षण करून साम्राज्यविस्ताराची योजना आखावी अशी सूचना केली आहे.

मध्ययुगीन काळातील इटलीचा राजकीय विचारवंत व सत्तेविषयीचा वास्तववादी विचार मांडणारा विचारवंत मॅकियाव्हेली यांनी १५१३ मध्ये 'द प्रिन्स' नावाचा एक ग्रंथ लिहिला, त्यामध्ये त्यानी राजास युध्द, साम्राज्यविस्ताराविषयी अनेक सूचना दिल्या आहेत. इंग्लंडमधील थॉमस हॉब्ज या विचारवंताने सुद्धा राष्ट्रीय सत्तेला प्राधान्य दिले. युरोपमध्ये वेस्टफालिया करारापासून राष्ट्रराज्याची कल्पना उदयास आली. यामध्ये प्रामुख्याने सार्वभौमत्वाची कल्पना विकसित झाली, त्यानुसार प्रत्येक राष्ट्राने कोणत्याही बाह्य किंवा परकीय दबावाला बळी न पडता राष्ट्रातील उपलब्ध साधनसंपत्तीच्या आधारावर सत्ताविस्तार करणे हा राष्ट्राचा अधिकार आहे. हा विचार प्रसिद्ध झाला एकूणच राष्ट्रीय सत्ता हे राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला संरक्षण देण्यात महत्त्वाचे स्थान आहे.

### ३.२.१ राष्ट्रीय सत्ता

सत्ता ही एक गुंतागुंतीची संकल्पना आहे. अनेक विचारवंतानी सत्तेच्या व्याख्या केल्या आहेत. सर्वसाधारणपणे राजकीय सत्ता हे आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाच्या संरक्षणासाठी व साम्राज्य विस्तारासाठी वापरण्याचे साधन आहे. राष्ट्राचा विकास हा राष्ट्रीय सत्तेवरच अवलंबून आहे. सत्ता म्हणजे दुसऱ्याच्या वर्तनात अथवा धोरणात बदल घडवून आणण्याची क्षमता होय. प्रत्यक्षात असा बदल घडवून आणल्यास त्याला त्या देशाचा प्रभाव आहे असे म्हटले जाते. अनेक मोठी राष्ट्रे लहान

राष्ट्राच्या धोरणात बदल घडवून आणण्यास प्रयत्न करीत असतात. तर कधी लहान देशही मोठ्या देशाचे धोरण बदलवत असतात त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रभाव हा नेहमीच दुहेरी असतो. म्हणून राष्ट्रीय सत्तेचा अर्थ खालील व्याख्येवरून स्पष्ट करता येईल.

**हन्स मॉर्गेन्थॉ** याच्या मते, सत्ता म्हणजे सत्ता प्रस्थापित करणारा आणि या सत्तेला अधिमान्यता देणारा यांच्यातील मानसिक संबंध आहे. एखाद्या व्यक्तीने इतरांच्या मनावर नियंत्रण ठेवणे म्हणजेच राष्ट्रीय सत्ता होय. **जॉर्ज श्वेतबर्जर** यांच्या मते, 'आपली इच्छा दुसऱ्यावर लादण्यासाठी आणि इतरांनी विरोध केला, तर तो विरोध मोडून इच्छा लादण्याची परिणामकारक शक्ती म्हणजेच सत्ता होय.'

**रॉबर्ट डहाल** यांच्या मते, सत्ता म्हणजे प्रभाव पाडण्याची क्षमता होय. अशाप्रकारे सत्ता ही इतरावर लादणे, प्रभाव पाडणे, त्यासाठी विरोध मोडून टाकण्यासाठी सत्तेचा वापर केला जातो. त्याच्या माध्यमातून प्रत्येक देशाकडून आपल्या राष्ट्राचे ध्येय आणि उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी सत्तेचा वापर केला जातो. त्यामुळे सत्ता हे देशाचे हितसंबंध आणि त्यांची राष्ट्रीय सुरक्षितता टिकविण्यासाठीचे महत्त्वाचे साधन आहे.

## ❑ राष्ट्रीय सत्तेचे घटक

सामान्यपणे एखाद्या राष्ट्राची सत्ता म्हणजे त्याचे लष्करी सामर्थ्य अशी एक धारणा असते. लष्करी सामर्थ्य हा सत्तेचा महत्वाचा घटक असला तरी त्याबरोबर अनेक घटक परिणाम करत असतात. राष्ट्रीय सत्तेची विभागणी स्थायी आणि अस्थायी घटक किंवा त्यांचे परिणामीकरण करता येणारे घटक आणि ज्यांचे परिणामीकरण करता येत नाही. अशा दोन घटकात विभागणी करता येते. हे घटक परस्परावलंबी व परिवर्तनीय आहेत. स्थायी घटकामध्ये भौगोलिक स्थान, लोकसंख्या, नैसर्गिक साधने, तंत्रज्ञान. या घटकांचा समावेश होतो. अस्थायी घटकामध्ये विचारसरणी, नेतृत्व जनतेचे मनोबल, शासनप्रणाली इत्यादी घटकाचा समावेश होतो. या सर्व गोष्टीची चर्चा करणार आहोत.

### १. भौगोलिक घटक :–

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये भौगोलिकघटकांना महत्त्वाचे स्थान आहे. एखाद्या देशाचे सामर्थ्य हे त्या देशाच्या भौगोलिक घटकावरच अवलंबून असते. प्रत्येक देशाचे अंतर्गत व बाह्य धोरण हे त्याच्या भौगोलिक घटकाच्या आधारावर ठरत असते. त्यामध्ये प्रामुख्याने भौगोलिक स्थान विस्तार, हवामान, सीमारेषा इत्यादी गोष्टीचा समावेश होतो.

### अ) नकाशा :–

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये एखाद्या देशाचे धोरण काय आहे हे समजून घेण्यासाठी त्या देशाचा नकाशा अभ्यासणे आवश्यक असते. कारण त्यानुसार त्या देशातील राष्ट्रीय सत्ता निर्माण

होणाऱ्या घटकाची तुलना करता येतो. काही देशाकडून नकाशा तयार करताना शेजारील देशाचा भूभाग आपल्या देशाचे आहे असे दाखविले जाते, यातून सीमा संघर्ष निर्माण होतो, त्यामुळे सत्ता विस्तार करण्यासाठी नकाशाचा वापर केला जातो.

**ब) क्षेत्रफळ/आकार :-**

भौगोलिक घटकाचा विचार करताना क्षेत्रफळाचा मुद्दा महत्त्वाचा ठरतो. कारण देश जितका मोठा तिते त्याचे सामर्थ्य अधिक असते, त्याचे उदा. भारत आणि चीन हे २१ व्या शतकातील उगवत्या महासत्तावादी देश आहेत. परंतु केवळ आकारमानाने मोठे असून चालत नाही तर तेथील शेतीची उत्पादन क्षमता, पर्जन्य, हवामान या गोष्टीदेखील तेवढ्याच महत्त्वाच्या असतात. त्यामुळे आकारमान छोट्या असलेल्या जपानने रशियाचा केलेला पराभव व चीन वर केलेले आक्रमण हे उदा. महत्वाचे आहे, त्यामुळे सर्वसाधारणपणे आकाराने लहान असलेल्या देशांना अनेकवेळा पराभव पत्करावा लागला. अपवाद जपान, इंग्लंड हे देश आकाराने लहान असूनही त्यांनी पराभव स्विकारलेले दिसत नाही, त्यामुळे राष्ट्रीय सत्ता ही देशाच्या आकारमानावरून ठरते.

**क) हवामान :-**

भौगोलिक स्थानामध्ये हवामान हा घटकदेखील राष्ट्रीय सामर्थ्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. अति थंड किंवा अतिउष्ण, खूप पाऊस किंवा वाळवंट अशामुळे राष्ट्रीय सामर्थ्यावर नकारात्मक परिणाम होतो. मध्यम हवामान असलेली राष्ट्रे सामर्थ्यवान बनलेले आहेत. तेच देश प्रगती करू शकतात. हवामानावरून देशाची नैसर्गिक साधनसंपत्ती विकसित होऊ शकते. पर्जन्याचे प्रमाण व्यवस्थित असले तर अन्नधान्य उत्पादनातून स्वयंपूर्णता साधून लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करता येते. एकूणच प्रत्येक देशाच्या हवामानामुळे परराष्ट्र धोरणावर, लष्करी शक्तीवर औद्योगिकीकरणावर व शेतीवर पडतो. त्यामुळे जगातील अनेक देश हवामानावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न करीत आहेत.

**ड) स्थिती किंवा स्थान :-**

राष्ट्रीय सत्तेमध्ये भौगोलिक स्थान महत्त्वाचे आहे. राष्ट्राच्या भौगोलिक स्थानावर त्या राष्ट्राच्या परराष्ट्र धोरण, राजनय, युध्दनीती इत्यादी गोष्टी अवलंबून असतात. खनीज संपत्ती, शेती, व्यापार, उत्पादने इत्यादी गोष्टी भौगोलिक स्थानावरून ठरत असतात. भारताच्या शेजारी पाकिस्तान हे शत्रूराष्ट्र आहे. तर अमेरिकेच्या शेजारी एकही शत्रूराष्ट्र नसणे आणि इंग्लंडला चारही बाजूने समुद्र असणे हे त्या-त्या देशाच्या सामर्थ्यावर निश्चित परिणाम करू शकते. त्यामुळे राष्ट्रीय सत्ता ही त्यांच्या भौगोलिक स्थानावरून ठरते.

**इ) सीमा :-**

काही देशांना नैसर्गिक सीमा प्राप्त झालेले असतात, तर काहींना कृत्रिम सीमा असते. सीमारेषा

आणि सत्तेचा जवळचा संबंध आहे. कारण राष्ट्रांच्या सीमा सुस्पष्ट व व्यवस्थित अधोरेखित केलेल्या असतील तर शेजारील देशाबरोबर शांतता प्रस्थापित करण्यासाठी संरक्षणावरील खर्च कमी होतो, पण जर सीमारेषेवरून संघर्ष होत असेल तर असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होते, त्यामुळे राष्ट्रीय सत्ता प्रस्थापित होण्यासाठी सीमारेषा महत्त्वाचे आहे. या सीमारेषा, पर्वत, नद्या समुद्रकिनारा यामुळे नैसर्गिकरित्या सीमा निर्माण होते. भारताला हिमालय, अरबी समुद्र, हिंदी महासागर, बंगालचा उपसागर यामुळे नैसर्गिक सीमा मिळाली आहे.

अशाप्रकारे भौगोलिक घटक हे राष्ट्रीय सत्ता निर्माण करण्यात महत्त्वाचे घटक आहे असे दिसून येते.

## २. नैसर्गिक साधनसंपत्ती :-

राष्ट्रीय सत्ता निर्माण करण्यामध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती हा एक महत्त्वाचा घटक आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती नैसर्गिकपणे राष्ट्रांच्या वाट्याला आलेली संपत्ती आहे. त्यामध्ये प्रामुख्याने अन्नधान्य व खनिजद्रव्याच्या समावेश होतो. जर राष्ट्रामध्ये नैसर्गिक साधनसंपत्ती उपलब्ध असतील तर राष्ट्र आर्थिक व औद्योगिक विकास करू शकतो. कच्चा मालाचे उत्पादन उपलब्ध नैसर्गिक साधनांच्या आधारांवर केले जाते. तर नैसर्गिक साधनाचा उपयोग करण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ, भांडवलाची आवश्यकता आहे. नैसर्गिक साधनसंपत्ती खालीलप्रमाणे आहेत.

### अ) अन्नधान्य :-

अन्नधान्य संपन्नता असणे हे देशाची गरज आहे, त्यामुळे राष्ट्रीय सत्ता बळकट होते. कारण जो देश अन्नधान्याची स्वयंपूर्ण असतो, तो देश प्रगती करू शकतो. मॉर्गेन्था यांच्या म्हणण्याप्रमाणे जर देश अन्नधान्यासाठी परावलंबी असेल तर परराष्ट्र धोरणात तो देश कायम दुबळा असतो. म्हणून अन्नधान्याबाबत स्वयंपूर्ण असणे गरजेचे आहे. जर अन्नधान्याची तुटवडा भासत असेल तर देशातील जनता उपासमारीमुळे उद्रेक करत करीत असे. सैन्य उपाशीपोटी लढू शकत नाही. सैन्याला रसद मिळाली नाही तर पराभव स्वीकारावा लागतो. अन्नधान्यासाठी अमेरिका व रशिया स्वयंपूर्ण आहेत. भारतात काही प्रमाणात स्वयंपूर्ण असले तरी बऱ्याच गोष्टी आयात कराव्या लागतात, त्यामुळे अन्नधान्य हा घटकसुध्दा राष्ट्रशक्तीला प्रभावित करतो.

### ब) खनिज द्रव्ये :-

खनिजद्रव्ये हे ही एक महत्त्वाचे संसाधन आहे, तेलासारख्या खनिजाच्या उपलब्धतेवर पश्चिम आशियातील अनेक देशाचे सामर्थ्य उभे राहिले आहे. युरेनियम, पोलाद, पेट्रोल, कोळसा इत्यादी महत्त्वाची खनिज द्रव्ये जगातील वेगवेगळ्या ठिकाणी आढळतात. ज्या देशात खनिज संपत्ती जास्त असते त्या देशाची अर्थव्यवस्था भक्कम असते. तसेच युरेनियम आणि प्लुटेनियमचा उपयोग

अणुशक्ती निर्माण करण्यासाठी होतो. त्यामुळे त्याच्या उपलब्धतेवर त्या देशाचे परराष्ट्र धोरण ठरते. एकूणच नैसर्गिक साधनसंपत्ती ज्या देशामध्ये जास्त आहे. अन्नधान्य मुबलक प्रमाणात आहे. खनिजद्रव्ये मोठ्या प्रमाणात आहेत तो देश प्रगती करू शकतो. तसेच त्याची राष्ट्रीय सत्ता ही इतर देशावर प्रभावित करते.

### ३. लोकसंख्या/मनुष्यबळ :–

राष्ट्राचे मनुष्यबळ हे राष्ट्रीय सत्तेच्या दृष्टीने मोलाचे आहे. ज्या देशाची लोकसंख्या अधिक आहे त्या देशाचे राष्ट्रीय सामर्थ्य जास्त आहे असे समीकरण असले तरी ते मनुष्यबळ तर उपलब्ध साधनसंपत्तीचा उपयोग राष्ट्रविकासासाठी योग्य पद्धतीने करत असेल तर अधिक लोकसंख्या राष्ट्रीय सत्तेसाठी महत्त्वाचे घटक ठरू शकतो, म्हणून संख्येइतकेच महत्त्व मनुष्यबळाच्या गुणवत्तेसाठी आहे. विकसित राष्ट्रांच्या तुलनेत विकसनशील राष्ट्रामधील अधिक लोकसंख्या असणाऱ्या राष्ट्रांना आजही आर्थिक विकासासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे. त्यामुळे जास्त लोकसंख्या असेल आणि गुणवत्तापूर्ण नसेल तर देशामध्ये दारिद्र्य, विषमता वाढते. राहणीमानाचा दर्जा खालावतो. अन्नधान्याचा तुटवडा भासते. त्यामुळे लोकसंख्या जास्त असले तरी आर्थिक व कृषी विकास करणे आवश्यक आहे.

### ४. तंत्रज्ञान :–

तंत्रज्ञान ही आधुनिक आणि व्यापक संकल्पना आहे. साधारणपणे तंत्रज्ञान म्हणजे कृषी उद्योग, आरोग्य, प्रशासन शिकताना दळणवळण, आर्थिक व्यवहार अशा अनेक क्षेत्रांच्या विकासासाठी वापरण्यात आलेले संघटित वैज्ञानिक ज्ञान होय. तंत्रज्ञानामुळे राष्ट्राची औद्योगिक व आर्थिक प्रगती होते. कृषी, उद्योगधंदे, युध्द दळणवळण, अवकाश, संगणक इत्यादी क्षेत्रामध्ये आमूलाग्र बदल झालेला आहे. यामध्ये झालेल्या प्रगतीवरून त्या राष्ट्राची सत्ता ठरविली जाते. दळणवळणाच्या बदलामुळे व संगणक इंटरनेट सुविधांमुळे जग अधिकच जवळ आले आहे. त्याला जागतिक खेडे असे म्हटले आहे, परंतु ज्या देशांनी तंत्रज्ञानात प्रगती केली आहे त्या राष्ट्राला साम्राज्य विस्तार वेगाने घडवून आणता येतो. इंग्लंडमध्ये उत्पादनासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची निर्मिती झाली त्यातून औद्योगिक क्रांतीचा उदय झाला. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धामध्ये अमेरिका, इंग्लंड, रशिया, फ्रान्स यांनी आधुनिक शस्त्रास्त्रे वापरली त्यामुळे ते विजयी झाले. जपाननंतर सन १९४५ मध्ये अमेरिकेचे अणुबॉम्बचा वापर केला त्यामुळे जपानने तत्काळ शरणागती स्वीकारली. आज आधुनिक तंत्रज्ञानामुळे शस्त्रास्त्रे, क्षेपणास्त्रे, बॉम्ब, लढाऊ वेगवान विमाने, युध्दनौका, पाणबुड्या यांची मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली आहे. त्यामुळे राष्ट्रीय सत्ता, कोणाची मोठी आहे, यात स्पर्धा सुरू झाली आहे. एकूणच तंत्रज्ञानामुळे राष्ट्रीय सत्ता निर्माण होते.

## ५. विचारधारा :-

राष्ट्रीय सत्ता ही राष्ट्राच्या विचारधारेवरही अवलंबून असते. विचारधारा ही नागरिकांच्या कार्यावर आणि विचारांवर प्रभाव टाकीत असतो. विचारधारेमध्ये क्रांती करण्याची क्षमता असते. शुध्द आणि संघर्षसुध्दा विचारधारेतील विरोधामुळे होते. प्रत्येक देश हा कोणत्यातरी विचारधारेवर चालत असतो. देशातील विविध राजकीय पक्षाची निर्मिती ही विचारधारेवर झालेले असते, त्यामुळे त्याच्या परराष्ट्र धोरणविषयक कार्यक्रम, जागतिक राजकारणासंबंधीचे दृष्टीकोन यांच्यावरही विचारधारेचा प्रभाव पडतो. भारत हे धर्मनिरपेक्षतेच्या विचारधारेवर उभा राहिला आहे त्यामुळे विविध जाती धर्म व भाषा असलेल्या तरी भारत हा एकसंघ राहिलेला दिसून येतो. चीन हा साम्यवादी विचारधारेचा आहे. तर सोव्हिएत युनियनमध्ये मार्क्सच्या विचारधारेवर क्रांती घडून आली. अमेरिका हे भांडवलवादी विचारधारेवर आधारलेली आहे. विचारधारा ही आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची असल्यामुळे हॅन्थ मॉर्गेन्थॉ यांनी विचारधारेची वर्गीकरण केले आहे. त्याच्यामध्ये यथास्थिती विचारधारा, साम्राज्यवादी विचारधारा, संदिग्ध किंवा अनिश्चित विचारधारा समावेश केला आहे. एकूणच विचारधारेवर लोकांमध्ये राष्ट्रप्रेम व बलीदान देण्याची भावना निर्माण होते व राष्ट्रीय सत्ता निर्माण होण्यास उपयुक्त ठरते.

## ६. राजकीय नेतृत्व :-

राष्ट्रीय सत्तेच्या निर्मितीसाठी राजकीय नेतृत्वाला महत्त्वाचे स्थान आहे. कारण साधनसंपत्तीचा उपयोग, विज्ञान तंत्रज्ञानाची प्रगती आणि चांगली शासनव्यवस्था या सर्व गोष्टी राजकीय नेतृत्वावर अवलंबून असतात. चांगले नेतृत्व जनतेचे मनोबल उंचावण्यात महत्वाची भूमिका पार पाडते. राष्ट्राची प्रगती साधणे, प्रगतीला दिशा देणे, सामाजिक, आर्थिक व औद्योगिक विकास इत्यादी गोष्टी या राजकीय नेतृत्वाच्या कार्यावरूनच होतात. युध्दकाळात राष्ट्रीय एकात्मता टिकवून जनशक्ती उभारण्यात आणि शांततेच्या काळात देशातील मानवी साधनसंपत्तीचा व नैसर्गिक साधनसंपत्तीचा गुणवत्तापूर्ण उपयोग करून घेण्यासाठी राजकीय नेतृत्वाची भूमिका महत्त्वाची आहे. इंग्लंडला दुसऱ्या महायुद्धात जिंकून देणारा विन्स्टन चर्चिल, अमेरीकेला आर्थिक मंदीतून बाहेर काढणारा फ्रॅन्कलिन डी रूझवेल्ट, जाणीवपूर्वक अलिप्त राहणारे नासर आणि नेहरू अशा नेतृत्वाचा राष्ट्रीय सत्ता वाढीसाठी हातभार लागतो, तर तुर्कस्थानचे मुस्तफा केमालपाशा, चीनचे माओ, युगोस्लोलियाचे मार्शल टिटो इ. लोकांचे नेतृत्व ही राष्ट्राच्या सत्तेला कारणीभूत ठरले आहेत. एकूणच राजकीय नेतृत्व हे राष्ट्रीय सत्तेचे महत्त्वाचे घटक आहे.

## ७. राष्ट्रीय चारित्र्य :-

मॉर्गेन्थासारखे विचारवंत राष्ट्रीय चरित्राला सत्तेचा एक महत्त्वाचे घटक मानले आहे. राष्ट्रीय सत्तेचा राष्ट्रीय चरित्र हा घटक नैतिक, ऐतिहासिक, समाजशास्त्रीय व मानसिक स्वरूपाचा आहे.

राष्ट्रीय चरित्र जनतेच्या मनोबलाचा महत्त्वाचा घटक आहे. कारण मनोबल हे राष्ट्रीय चारित्र्यावर बऱ्याच अंशी अवलंबून असते. हेच मनोबल राष्ट्रीय सत्तेच्या प्रगतीस कारणीभूत ठरत असते. राष्ट्रीय चारित्र्याच्या आधारावर काही देशातील लोकांना विविध विशेषण वापरले जाते. जर्मन माणूस कणखर शिस्तप्रिय कार्यकुशल, अमेरीकेतील व्यक्ती प्रयोगशील व रशियन चिवट, चिनी व्यक्ती अपरिवर्तनीय अशी विशेषणे लावले जाते, परंतु राष्ट्रीय चरित्र हा घटक परिवर्तनीय आहे. विशिष्ट परिस्थितीमध्ये जनतेने दिलेल्या प्रतिसादाचा राष्ट्रीय चारित्र्यामध्ये समावेश केला जातो. त्यामुळे परिस्थितीनुरूप प्रतिसादात बदल होऊ शकतो. म्हणूनच राष्ट्रीय चारित्र्य राष्ट्रीय सत्तेचे महत्त्वाचे घटक आहे.

### ८. जनतेचे मनोबल :–

राष्ट्रातील जनतेचे मनोबल हा राष्ट्रीय सत्तेच्या दृष्टीने महत्त्वाचा घटक आहे. जनतेचे मनोबल म्हणजे राष्ट्राविषयी नागरिकांना वाटणारे नितांत प्रेम, राष्ट्रावरील त्यांची श्रद्धा, राष्ट्रासाठी स्वार्थत्याग करण्याची, राष्ट्रासाठी परिश्रम घेण्याची त्यांची तयारी, प्रसंगी राष्ट्रासाठी प्राणाची बाजी लावण्याची मानसिक तयारी होय. जनतेचे मनोबल चांगले असेल तर युद्धाच्या किंवा संकटकालीन परिस्थितीमध्ये एक संघटित शक्ती बनून राज्यव्यव्यवस्थेच्या पाठीशी उभी राहते. धर्म, जात, भाषा प्रदेश इत्यादीची बंधने तोडून जनता राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडवते. त्यामुळे राष्ट्राच्या सत्तेमध्ये जनतेचे मनोबल महत्त्वाचे असते. जनतेचे मनोबल हे राष्ट्रीय नेतृत्वाकडून वृध्दिंगत करण्याचा सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी विचारसरणी प्रचारतंत्र यांचा वापर करणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे राष्ट्रीय सत्तेचे घटक आहेत. त्या सर्व घटकाचा राष्ट्रीय सत्ता प्रस्थापित करण्यासाठी एकत्रित परिणाम असतो. त्यातील कोणत्याही एका घटकाची परिस्थिती बदलल्यास देशाच्या सामर्थ्यावर कमीअधिक परिणाम होत असतो, त्यामुळे राष्ट्रीय सत्ता प्रभावशाली बनण्यासाठी वरील घटकाची गरज महत्त्वाची आहे.

### ❑ सत्तेचे प्रकार :–

राष्ट्रीय सत्तेचे खालीलप्रमाणे प्रकार पडतात त्याची चर्चा करता येईल.

### १. भौतिक सामर्थ्य किंवा सत्ता :–

सत्तेचा हा प्रकार राष्ट्राच्या लष्करी सामर्थ्यावर आधारित आहे. लष्करीदृष्ट्या प्रबळ राष्ट्रांची प्रभाव पाडण्याची क्षमता नेहमीच अधिक असते. शीतयुध्दाच्या काळात अमेरिका व रशिया यासारख्या देशांनी आंतरराष्ट्रीय राजकारणात आपले वर्चस्व वाढविण्यासाठी लष्करी सामर्थ्याचा वापर केला होता. लष्करी सामर्थ्य वाढविण्याच्या प्रयत्नातून शस्त्रास्त्र स्पर्धा वाढली आणि हजारो अण्वस्त्राची निर्मिती करण्यात आली. आजही भौतिक सत्तेचा वापर प्रभाव पाडण्यासाठी अनेक राष्ट्राकडून होत आहे. आधुनिक काळात लष्कराचे विकेंद्रीकरण घडून आल्यामुळे लष्कराची हुकूमशाही निर्माण होण्याचा धोका नाही.

## २. मानसशास्त्रीय सत्ता :–

मानसशास्त्रीय सामर्थ्याचा वापर हा देशांतर्गत तसेच देशाबाहेरील लोकमताला प्रभावित करण्यासाठी केला जातो. आपल्या परराष्ट्र धोरणासाठी आणि आंतरराष्ट्रीय निर्णयासाठी राज्यकर्ते जनतेची अधिमान्यता मिळविण्याचा प्रयत्न करतात. ही अधिमान्यता मिळविण्यासाठी मानसशास्त्रीय सत्तेचा वापर केला जातो. अनेकदा देशाच्या लष्करी सामर्थ्याचे प्रदर्शन करून जनतेमध्ये राष्ट्राभिमान, राष्ट्रप्रेम जागृत केले जाते. तर काहीवेळा प्रसारमाध्यमाद्वारे लोकमत निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो. प्रामुख्याने अमेरिकेमध्ये, भारतामध्ये, पाकिस्तानमध्ये अशाप्रकारची मानसशास्त्रीय सत्ता निर्माण करण्याचा प्रयत्न होताना दिसून येतो.

## ३. आर्थिक सत्ता :–

आर्थिक विकासाच्या आणि औद्योगिक विकासाच्या माध्यमातून श्रीमंत राष्ट्रे इतर गरीब राष्ट्रांवर प्रभाव पाडण्याचा किंवा त्यांची धोरणे नियंत्रित करण्याचा प्रयत्न करतात तेव्हा तो आर्थिक सत्तेचा प्रकार असतो. आर्थिक सत्ता निर्माण करण्यासाठी कर्ज देणे, आर्थिक मदत करणे, विकासनिधी देणे, करांमध्ये सवलत देणे, याद्वारे आर्थिक संबंध प्रस्थापित केले जातात. याच साधनांद्वारे अमेरिका, इंग्लंड यासारख्या विकसित राष्ट्रांनी आपल्या इच्छा विकसनशील आणि अविकसित राष्ट्रावर लादण्याचा प्रयत्न केला आहे. राष्ट्रीय सत्ता वापरण्याची साधने म्हणून आर्थिक विकासाकडे पाहिले जाते. शीतयुध्दाच्या काळात भौतिक सामर्थ्य किंवा सत्तेला महत्त्व होते, पण १९९० च्या नंतर बहुतांश राष्ट्रांनी आर्थिक उदारीकरण आणि जागतिकीकरणाचा मार्ग आर्थिक विकासासाठी अवलंबला, त्यामुळे आर्थिक सत्तेला महत्त्व प्राप्त झाले. आर्थिक व औद्योगिक विकासासाठी राष्ट्रांनी विभागीय पातळीवर आशियान, सार्क, युरोपियन महासंघ, साफ्टा यासारख्या व्यापारसंघाद्वारे राष्ट्रे आपला आर्थिक विकास आणि पर्यायाने आर्थिक सत्ता वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

## ❑ राष्ट्रीय सत्ता वापरण्याची साधने :–

सत्तेचा वापर करून दुसऱ्या एका किंवा अनेक देशांच्या धोरणात इच्छित बदल घडवून आणण्यासाठी विविध साधने वापरली जातात, ती साधने किंवा पध्दती खालीलप्रमाणे आहेत.

## १. मताचा आग्रह किंवा मन वळविणे :–

सत्तेद्वारे प्रभाव पाडण्याचे हे एक महत्त्वाचे साधन असून, याचा वापर विविध विभागीय आणि आंतरराष्ट्रीय संघटनाच्या व्यासपीठावर होणाऱ्या चर्चेच्या प्रसंगी केला जातो. संयुक्त राष्ट्र संघटनेमध्ये आपले मत मांडताना किंवा इतरांना त्या मताची योग्यता पटवून देवून त्याचे मन वळविणे असे युक्तीवाद अनेक देश करीत असतात. उदा. आमसभेत भारत आणि पाकिस्तानच्या नेत्यांनी काश्मीरच्या प्रश्नावर आपली बाजू योग्य कशी आहे हे आंतरराष्ट्रीय समुदायाला पटवून देण्याचा प्रयत्न करतात.

## २. बक्षीस किंवा आर्थिक विकास :-

आर्थिक घटक हे सत्तेचे दुसरे साधन आहे. या साधनात आर्थिक मदत, कर्ज, निधी, लष्करी मदत, राजकीय पाठिंबा अशा विविध स्वरूपात ते दिले जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणात अशा स्वरूपाची बक्षीसे देऊन प्रभाव पाडण्याचा प्रयोग पूर्वीपासून होत आहे. बक्षीस हे तीन प्रकारचे असून त्यामध्ये आर्थिक लष्करी व राजकीय यांचा समावेश होतो. आर्थिक प्रकारात कर्ज, निधी, आर्थिक मदत, विज्ञान-तंत्रज्ञान क्षेत्रात मदत इ. समावेश होतो तर लष्करास शस्त्रास्त्राचा पुरवठा, शस्त्रास्त्र खरेदीसाठी आर्थिक मदत, शस्त्रास्त्र निर्मितीचे तंत्रज्ञान पुरवणे, लष्करी प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देणे इ. गोष्टीचा समावेश होतो. तर राजकीय प्रकारामध्ये राजकीय मुद्यावर समर्थन किंवा पाठिंबा दिला जातो. शीतयुध्दाच्या काळात तिसऱ्या जगातील राष्ट्रांची सहानुभूती आपल्याकडे वळवून घेण्यासाठी सोविएत संघाने गरीब देशांना आर्थिक मदत केली होती.

## ३. शिक्षा :-

शिक्षेद्वारे किंवा शिक्षेचा धाक दाखवून प्रभाव लादण्याचा प्रयत्न हे सत्तेचे प्रसिध्द साधन आहे अशी शिक्षा बक्षीस नाकारून, आर्थिक बंधने लादून कर्जाचा हप्ता रोखून आंतरराष्ट्रीय राजकारणात एकटे पाडून लष्करी करार अमान्य करून दिली जाते. शिक्षा देण्याचा किंवा शिक्षेचा धाक दाखवण्याचा अधिकार जरी आंतरराष्ट्रीय कायद्याद्वारे संयुक्त राष्ट्र संघटनेला दिला गेलेला असला तरी अमेरिकेसारखी मोठी राष्ट्रे त्याचा गैरवापर करताना दिसतात.

## ४. सक्ती किंवा बळाचा वापर :-

राष्ट्रीय सत्तेचे साधन म्हणजे बळाचा वापर करणे, अलीकडच्या काळात शिक्षेची पुढची पायरी म्हणून सक्ती वा बळाचा वापर केला जातो, त्याद्वारे अनेकदा शिक्षेची धमकी दिली जाते, पण ज्यावेळी शिक्षेच्या अंमलबजावणीचा प्रसंग येतो. तेव्हा तो सक्तीचा प्रकार बनतो. अमेरिकेने अफगाणिस्तान आणि इराकमध्ये केलेली दहशतशवादविरोधी युध्द हे बळाचा वापर करण्याची उदाहरणे आहेत.

अशाप्रकारे वरील साधनांचा वापर करून राष्ट्रीय सत्ता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न होतो.

## ❑ राष्ट्रीय सत्तेचा वापर किंवा उपयोग :-

आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेचा वापर राष्ट्रे आपल्या उद्दिष्टाच्या प्राप्तीसाठी करीत असतात, यापैकी काही प्रमुख उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

## १. राष्ट्रीय सुरक्षा :-

राष्ट्र राज्याच्या निर्मितीपासून राष्ट्रीय सुरक्षेला प्राधान्य दिले गेले आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि

सार्वभौमत्वाचे रक्षण करणे हे प्रत्येक राष्ट्रासाठी महत्त्वाचे काम आहे, त्यामुळे राष्ट्रीय सत्तेचा वापर हा राष्ट्रीय सुरक्षा करण्यासाठी केला जातो.

**२. प्रस्थापित व्यवस्थेच्या संरक्षणासाठी :–**

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसाठी प्रस्थापित सत्ता विभागणीची आणि सत्तासमतोलाची व्यवस्था टिकवून ठेवणे आवश्यक असते. ही व्यवस्था कोलमडते म्हणजे युध्दाची सुरूवात होते. सत्ता विभागणी किंवा सत्ता समतोल व्यवस्था ही बहुपक्षीय पातळीवर होणाऱ्या आंतरराष्ट्रीय करारामधून निर्माण होते. या व्यवस्थेच्या संरक्षणासाठी सत्तेचा वापर केला जातो.

**३. प्रस्थापित व्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी :–**

सत्तेचा वापर जसा प्रस्थापित व्यवस्था व सत्तासमतोल टिकविण्यासाठी केला जातो, त्याचप्रमाणे काही राष्ट्रे व्यवस्थेत बदल घडवून आणण्यासाठी वापर करतात. दोन परस्परविरोधी उद्दिष्टये असणाऱ्या गटामधील संघर्षातूनच युध्दे घडून येतात.

**४. आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा :–**

सत्तेचा वापर अनेक राष्ट्राकडून आपली आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा वाढविण्यासाठी एक साधन म्हणून होत असतो. आर्थिक लष्करी सत्तेचे प्रदर्शन करून राष्ट्रे इतर राष्ट्रांना प्रभावित करण्याचा प्रयत्न करतात. दुसऱ्या महायुद्धानंतर अण्वस्त्र संपन्नता प्राप्त करणे हे प्रतिष्ठेचे लक्षण होते.

अशाप्रकारे राष्ट्रीय सत्ता ही सुरक्षा आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा प्रस्थापित व्यवस्था टिकविण्यासाठी व बदलण्यासाठी वापर केला जातो.

## ३.२.२ सत्ता समतोल

सत्ता समतोल ही आंतरराष्ट्रीय संबंधातील एक जुनी आणि संदिग्ध संकल्पना आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्र आपली सत्ता वाढविण्याचा आणि त्याद्वारे आपले हितसंबंध जोपासण्यासाठी प्रयत्नशील असते. तसेच ते हितसंबंध साध्य करण्यासाठी व त्याचे संरक्षण करण्यासाठी आवश्यकतेनुसार सत्तेचा वापर केला जातो. त्यावेळी आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्ता संघर्ष किंवा स्पर्धा सुरू होते. तो संघर्ष किंवा ती स्पर्धा ही युध्दाला कारणीभूत होते, त्यामुळे त्याच्यावर नियंत्रित करण्यासाठी प्रभावी मार्ग म्हणून सत्तासमतोलाचा वापर केला जातो. सत्ता समतोलाचे तत्त्व हे नैसर्गिक तत्त्वाच्या आधारे आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रभावशाली राष्ट्राच्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरते. सत्तासमतोल हा राष्ट्राच्या राजकीय वर्तणुकीला नियंत्रित करणारा आणि सत्तेच्या वापरावर मर्यादा घालणारा वैश्विक कायदा आहे. सत्ता समतोलाची व्यवस्था संघटीत आणि सूत्रबध्द रूपात अस्तित्वात येण्यासाठी वेस्टफेलियाचा तह अतिशय महत्त्वाचा आहे. या या तहातूनच सत्ता समतोल संकल्पना विकसित झाली आहे.

१६४८ च्या वेस्टफेलिया करारात युरोपच्या जागतिक राजकारणातील शांतता व स्थिरता निर्माण करण्यासाठी एक व्यापक व्यवस्था बनवण्यात आली. त्यामध्ये 'सत्ता संतुलन' ही संकल्पना महत्त्वाची होती. १६४८ ते १८१५ पर्यंत युरोपीय राष्ट्रातील सत्ता संतुलनाचा महत्त्वाचा कालखंड मानला जातो. त्यानंतर सन १८१५ च्या व्हीएन्ना करारानुसार सत्तासमतोलाची नवीन व्यवस्था करण्यात आली. या सत्ता संतुलनाच्या नव्या व्यवस्थेमध्ये अधिमान्यता आणि जैसे थे परिस्थिती टिकवणे यावर भर देण्यात आला होता. सतराव्या शतकापासून ते एकोणिसाव्या शतकापर्यंत युरोपमधील सत्ता समतोलाची व्यवस्था टिकवून धरण्यात इंग्लंडची भूमिका महत्त्वाची होती, त्यांच्या जगभर पसरलेल्या साम्राज्यामुळे युरोपियन राजकारणात इंग्लंडची भूमिका ही सत्तासमतोलाची राहिली. पुढे १९व्या शतकात युरोपीय राष्ट्रापुरते मर्यादित असणारे सत्ता संतुलनाचे तत्त्व जगभर पसरले आणि प्रत्येक राष्ट्र राज्याला सत्तासंतुलनाची गरज भासली. त्यावेळेपासून ते आजपर्यंत अनेक राष्ट्रांनी उदा. इंग्लंड, फ्रान्स, रशिया, अमेरिका, ऑस्ट्रेलिया, चीन, भारत इत्यादी राष्ट्रांनी आपापसात करार करून जागतिक 'सत्ता समतोलाची' नवी व्यवस्था निर्माण केल्याचे दिसून येते.

### ❑ सत्ता समतोलाची व्याख्या :-

सत्ता समतोल ही संकल्पना संदिग्ध स्वरूपाचे असल्यामुळे त्याचा वापर विविध अर्थाने होत असतो, त्यामुळे सर्वसमावेशक अशी व्याख्या करणे अवघड आहे, तरीही खालील अभ्यासकांनी त्याची व्याख्या केल्या आहेत त्या पुढीलप्रमाणे :-

**पामर आणि पर्किन्स :** सत्ता समतोल अशी प्रक्रिया आहे कि परस्परविरोधाची अशी एक प्रक्रिया निर्माण केली जाते कि, ज्यामुळे कोणत्याही विशिष्ट राष्ट्राला किंवा राष्ट्राच्या गटाला इतरांच्या तुलनेत शक्तीशाली बनवण्यापासून परावृत्त केले जाते.

**जॉर्ज श्वेत्झर्नबर्जर** यांच्या मते, 'आंतरराष्ट्रीय संबंध स्थिर ठेवणे म्हणजे सत्ता संतुलन होय.'

**हार्टमन** यांच्या मते, 'सत्ता संतुलन म्हणजे गट-प्रतिगट निर्मितीची एक शृंखला तयार करणे की, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात स्थिरता निर्माण होवून युद्धाचा धोका टाळणे होय.

**प्रो सिडनी फाय :** सत्ता समतोल म्हणजे सत्तेचा असा न्याय समतोल कि, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय समुदायातील एखाद्या राष्ट्राला शक्तीशाली बनून इतरांवर आपली इच्छा लादण्यापासून परावृत्त करणे होय.

**क्विन्सी राईट :** सत्ता संतुलन अशी व्यवस्था की जी प्रत्येक राष्ट्राला जाणीव करून देते की, आपण दुसऱ्यावर आक्रमण करण्याचा प्रयत्न केल्यास इतर राष्ट्रे त्याचे समर्थपणे प्रतिकार करतील.

वरील सर्व व्याख्यांचा विचार करता सत्तासमतोल म्हणजे अशी परिस्थिती की, ज्यामध्ये

राष्ट्रामधील सत्तासंबंध सामान्यपणे समान असतात आणि कोणतेही एक राष्ट्र आपल्या इच्छा इतरावर लादण्याचा प्रयत्न करीत नाहीत. त्या अर्थाने सत्तासमतोल ही सत्तेच्या समान विभागणीची आणि सत्ता व शक्ती यामध्ये समतोल साधणारी व्यवस्था आहे.

## ❑ सत्ता समतोलाची वैशिष्ट्ये :-

सत्ता समतोलाची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

**१. परिवर्तनियता :** सत्ता समतोल ही कायमस्वरूपी व्यवस्था नसून ती परिवर्तनीय व्यवस्था आहे. संतुलनाकडून असंतुलनाकडे आणि पुन्हा असंतुलनाकडून संतुलनाकडे असे बदल या व्यवस्थेत होत असतात. सत्ता समतोल ही सत्तेच्या वाटपाशी निगडीत व्यवस्था असल्यामुळे सत्तचे समान वाटप करून सत्तेच्या अनियंत्रित वापरावर नियंत्रण ठेवले जाते, यासाठी अनेक बहुपक्षीय पातळीवर आंतरराष्ट्रीय करार होत असतात. त्याद्वारे सत्ता समतोलाची ही शृंखला संतुलन व असंतुलनाच्या माध्यमातून अखंडितपणे अलिप्त चालू असते. कारण अनेकवेळा सत्ता समतोलाला आव्हान देऊनही पुन्हा सत्ता समतोल प्रस्थापित झाल्याची उदाहरणे दिसून येतात.

**२. सत्तेचे समान वाटप :** सत्ता समतोलाची संकल्पना 'सत्तेचे समान वाटप' या तत्त्वावर आधारित आहे. जागतिक पातळीवर जेव्हा सत्तेचा समतोल ढासळतो, तेव्हा संघर्षास सुरुवात होते आणि त्याचे रूपांतर युद्धात होते आणि सत्ता संतुलन संपुष्टात येते. तेव्हा सत्ता समतोलाची व्यवस्था यशस्वी होण्यासाठी 'सत्ता समतोलकाची' आवश्यकता असते आणि सत्तेचे समान वाटप होणे आवश्यक असते.

**३. मानव निर्मित सत्ता संतुलन :** आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्ता संतुलन आपोआप निर्माण होत नाही किंवा ती दैवी देणगी नाही. तर ती मानवाच्या विकासासाठी, सुरक्षिततेसाठी आणि जागतिक शांततेसाठी जाणीवपूर्वक निर्माण केलेली संकल्पना आहे. सत्तासंतुलनासाठी राष्ट्रांना जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. जागतिक असमतोल थांबवण्यासाठी राष्ट्रांना त्वरित प्रयत्न करावे लागतात. थोडक्यात 'सत्ता संतुलन' मानव निर्मिती संकल्पना आहे.

**४. स्थितीवादी व्यवस्था :** सत्ता समतोल ही संकल्पना किंवा व्यवस्था समान सत्तेचे वाटप आणि मानवनिर्मित असली तरी ही व्यवस्था आंतरराष्ट्रीय राजकारणात 'जैसे थे स्थिती' किंवा 'स्थितीवादी व्यवस्था' टिकवण्याचा प्रयत्न करते. म्हणजे आंतरराष्ट्रीय राजकारणातील त्या त्या वेळची परिस्थिती आहे ती टिकवून ठेवण्याचा प्रयत्न सत्ता संतुलनातून होत असतो. तात्कालिक परिस्थिती टिकवून ठेवण्यास व बदल घडवून आणण्यास प्रतिकूल अशी त्यांची भूमिका असते आणि त्यांना इतर प्रभावी राष्ट्रे पाठिंबा देत असतात. उदा. इंग्लंडचा पहिल्या महायुद्धापूर्वीचा सत्ता समतोल तर अमेरिकेचा द्वितीय महायुद्धानंतरचा पश्चिम आशियातील सत्ता समतोल.

**५. सत्ता संतुलनाचे अस्तित्व कठीण :** ज्यावेळी आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेचा समतोल ढासळतो, त्यावेळी बड्या राष्ट्राकडून सत्ता संतुलनाची प्रक्रिया सुरू होते, पण खऱ्या स्वरूपाच्या सत्ता समतोलाची निर्मिती अवघड आहे. कारण जागतिक स्तरावर प्रत्येक राष्ट्रात सत्तेचे समान वाटप करणे अवघड आहे आणि बडी राष्ट्रे सत्ता समतोलाच्या नावाखाली स्वत:च्या राष्ट्राचे सामर्थ्य वाढविण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्यामध्ये प्रत्येक राष्ट्राचे हितसंबंध गुंतलेले असतात. त्यामुळे आजपर्यंतचा जागतिक राजकारणाचा इतिहास पाहिला असता सत्ता संतुलनाचे अस्तित्व कठीण आहे.

**६. मोठ्या राष्ट्रांची रणनीती :** सत्ता समतोलाची प्रक्रिया ही मोठ्या राष्ट्रांचा खेळ किंवा रणनीती म्हणूनच ओळखला जातो. या खेळात मोठी राष्ट्रेच महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडीत असतात. त्यांच्या दुहेरी भूमिका असतात. बडी राष्ट्रे एका बाजूने आंतरराष्ट्रीय शांतता स्थैर्य प्रस्थापित करण्याच्यादृष्टीने प्रयत्न म्हणून 'सत्ता समतोल' करण्याचा प्रयत्न करतात. तर दुसऱ्या बाजूला सत्ता समतोलाच्या माध्यमातून आपले राष्ट्रीय हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न करतात. त्यामुळे सत्ता समतोल प्रक्रियेत 'बड्या राष्ट्रांच्या भूमिका' महत्त्वाच्या असतात आणि छोटी राष्ट्रे प्रेक्षकांची भूमिका वटविण्याचे कार्य करीत असतात. थोडक्यात बडी राष्ट्रे सत्तासमतोलाचा जास्तीत जास्त वापर करीत असतात.

**७. संदिग्ध भूमिका :** आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये सत्ता समतोलाची भूमिका परस्परविरोधी व संदिग्ध स्वरूपाची दिसते. जागतिक शांतता, सुव्यवस्था आणि सार्वभौमत्वाचे रक्षण करणे, हे सत्ता संतुलनाचे प्राथमिक उद्दिष्ट मानले जाते. त्यासाठी सत्ता समतोलाचा केलेला प्रयोग यशस्वीही होतो. पण काहीवेळा आंतरराष्ट्रीय राजकारणातील तणाव वाढविण्याचा प्रयत्न करणे आणि युद्धास अनुकूल परिस्थिती निर्माण हे देखील सत्तासंतुलनाचे उद्दिष्ट असते. यामुळे सत्ता संतुलनाची भूमिका संदिग्ध वाटते.

**८. सत्ता संतुलनाचा व्यक्तीनिष्ठ व वस्तुनिष्ठ दृष्टिकोन :** आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तासंतुलनाकडे व्यक्तीनिष्ठ व वस्तुनिष्ठ दृष्टीकोनातून पाहता येते. सत्ता संतुलनासंबंधीचा इतिहास पाहिला असता असे दिसते की एक राष्ट्र म्हणून सत्ता समतोलात वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून शांतता व सुव्यवस्था अपेक्षित असते. दोन राष्ट्रे परस्परांत सत्ता समतोल साध्य करण्याचा प्रयत्न करताना दिसतात. पण दुसऱ्या बाजूला राष्ट्रीय नेते मात्र या दृष्टीकोनाकडे व्यक्तीनिष्ठ दृष्टिकोनातून पाहतात. त्यामध्ये स्वत:चे हितसंबंध, अतिरेकी राजकीय महत्त्वाकांक्षा, आणि जागतिक नेतृत्वाची हाव यामुळे सत्ता समतोलाचा सामान्य हेतू बाजूला होवून जागतिक राजकारणात असंतुलन दिसून येतो. त्यामुळे सत्ता संतुलन हे व्यक्तीनिष्ठ व वस्तुनिष्ठ असते.

**९. सद्यकालीन परिस्थितीत सत्ता संतुलन कालबाह्य :** काही राजकीय विचारवंतांच्या मते, सध्याच्या आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या दृष्टीने सत्ता संतुलनाची व्यवस्था कालबाह्य झाली आहे. राष्ट्र राज्याच्या निर्मितीमुळे कोणत्याही राष्ट्राला युध्दांची आवश्यकता वाटत नाही. प्रत्येक राष्ट्राने देशाच्या

आर्थिक व सामाजिक विकासावर भर दिल्यामुळे आंतरराष्ट्रीय पातळीवर हे देश शांततेचा पुरस्कार करताना दिसतात. त्यामुळे सत्ता समतोल गरजेचा वाटत नाही. विचारवंताच्या मते, सत्ता संतुलन युरोपातील राज्यव्यवस्थेपुरते मर्यादित होते, तोपर्यंत ठिक आहे. पण राष्ट्रराज्याच्या विकासामुळे विश्वराज्याच्या संकल्पनेमुळे सत्ता संतुलन कालबाह्य झाले आहे.

वरीलप्रकारे सत्ता समतोलाची वैशिष्ट्ये सांगता येतील.

## ❑ सत्ता समतोलाचा प्रकार :-

सत्ता समतोलाचे प्रकार खालीलप्रमाणे आहेत.

**१. सामान्य किंवा सर्वसाधारण सत्ता समतोल :** सामान्य किंवा सर्वसाधारण समतोल म्हणजे दोन परस्पर विरोधी राष्ट्रातील किंवा त्यांच्या गटातील सत्तेचा समतोल होय. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोव्हिएत रशिया दरम्यान शीतयुध्दाच्या राजकारणाअंतर्गत जो सत्ता समतोल निर्माण झाला तो सामान्य समतोलाचा प्रकार होय. सामान्य सत्ता समतोलात दोन परस्परविरोधी शक्तीशाली राष्ट्रे किंवा त्यांचे गट परस्परावर प्रभाव पाडण्याचा आणि आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नियंत्रण करण्याचा प्रयत्न असतो. हा सत्ता समतोल द्विध्रुवी स्वरूपाचा असतो.

**२. बहुविध किंवा अनेकविध सत्ता संतुलन :** बहुविध किंवा अनेकविध सत्ता समतोल म्हणजे अनेक राष्ट्रांनी सहभागी होवून निर्माण केलेला सत्ता समतोल होय. बहुविध सत्ता समतोलात परस्पर विरोधी गटात अनेक राष्ट्रे सहभागी असतात. त्यामध्ये कांही सामर्थ्यशाली व कांही राष्ट्रे दुर्बल असतात. अशा प्रकारचा समतोल शीतयुद्धाच्या काळात अमेरिका रशिया आणि त्यांना पर्यायी असा अलिप्ततावादी गट आणि चीन व जपान यांच्यातील समतोल दिसून येतो.

**३. लवचिक सत्ता समतोल :** लवचिक सत्ता समतोल म्हणजे सहजासहजी बदलणारा सत्ता समतोल होय. आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रे ज्यावेळी बदलत्या परिस्थितीनुसार आपल्या हितसंबंधांना सुसंगत अशी भूमिका घेवून समतोल रक्षणाचा प्रयत्न करतात, त्यावेळी लवचिक सत्ता समतोल घडतो. या सत्ता समतोलात विचारप्रणालीपेक्षा हितसंबंधांना अधिक महत्त्व असते. त्यांचे हितसंबंध कायमस्वरूपी शत्रू किंवा मित्रत्वाचे नसतात. त्यामध्ये बदल होवून युती प्रतियुती तयार होत असतात. त्यामुळे सहजासहजी बदल होत असतात. उदा. अमेरिका-चीन ही दोन राष्ट्रे परस्परविरोधी विचारसरणीचे असताना देखील सत्ता समतोल राखण्यासाठी एकत्र येताना दिसतात.

**४. परीदृढ सत्ता समतोल :** आंतरराष्ट्रीय राजकारणातील परीदृढ सत्ता समतोल म्हणजे जेव्हा दोन परस्परविरोधी राष्ट्रे आपल्या भूमिकेवर ठाम असतात आणि त्यांच्या भूमिकेत सहजासहजी बदल होत नाहीत असे. सत्ता समतोल होय. उदा. भारत-पाकिस्तान, इस्त्राईल-पॅलेस्टाईन, अमेरिका-रशिया यांच्यातील सत्ता समतोल परिदृढ स्वरूपाचा आहे. प्रत्येक राष्ट्र आपल्या भूमिकेबाबत ठाम असते.

**५. भौगोलिक सत्ता समतोल :** भौगोलिक सत्ता समतोल म्हणजे प्रदेशाप्रदेशातील सत्तेचा समतोल होय. भौगोलिक सत्ता समतोलाचे स्थानिक, विभागीय आणि वैश्विक असे तीन प्रकार पडतात. स्थानिक सत्ता समतोल म्हणजे जेव्हा दोन शेजारील राष्ट्रे परस्परांची सत्ता नियंत्रीत करण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा जो सत्ता समतोल होतो. त्याला स्थानिक सत्ता समतोल म्हटले जाते. जेव्हा विशिष्ट भौगोलिक क्षेत्रात किंवा उपखंडात सत्ता समतोलाचा प्रयत्न होतो तेव्हा त्याला विभागीय सत्ता समतोल म्हणून ओळखले जाते आणि संपूर्ण जगाचा विचार करून किंवा आंतरराष्ट्रीय समुदायातील बहुतांश राष्ट्रांचा जेव्हा सत्ता समतोलाचा प्रयत्न असतो. त्याला वैश्विक सत्ता समतोल असे म्हणतात. उदा. अनुक्रमे भारत-पाकिस्तान, भारत-चीन, जपान-इराक आणि इंग्लंड, फ्रान्स रशिया यांच्यातील सत्ता समतोल होय.

## ❑ सत्ता समतोलाचे मार्ग किंवा तंत्र :-

**१. युती-प्रतियुतीची निर्मिती :** सत्ता संतुलन स्थापन करण्याच्या मार्गातील पहिले तंत्र म्हणजे एखाद्या राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राशी जवळीक करून, आपल्या हितसंबंधाचा विचार करून आपापसात युती करून आपल्या राष्ट्राच्या सैनिकी आणि भौतिक शक्तीत वाढ करण्याचा प्रयत्न करीत असते. अशाच प्रकारे दुसरी राष्ट्रे त्यांच्या विरोधात एकत्र येवून युती करतात आणि आंतरराष्ट्रीय सत्ता समतोल साध्य केला जातो. म्हणजेच काही युती या आक्रमक भूमिकेतून होतात. त्याला प्रतिउत्तर म्हणून कांही राष्ट्रे बचावात्मक युती निर्माण करतात. युती व प्रतियुतीची निर्मिती करून सत्तासमतोल साध्य केला जातो. या युतीमध्ये आक्रमक आणि संरक्षणात्मक स्वरूपाच्या भूमिका असतात.

**२. मोबदला :** सत्ता समतोल राखण्यासाठी भरपाईच्या किंवा मोबदलाच्या मार्गाने वाटणी करून सत्ता समतोल टिकवला जातो. युद्धात पराभूत झालेल्या राष्ट्राच्या ताब्यातील काही भूप्रदेश विजयी राष्ट्रे वाटून घेतात. यामुळे पराभूत राष्ट्राचे खच्चीकरण होते. अशा प्रकारच्या सत्ता समतोलाचा वापर १८व्या व १९व्या शतकात युरोपीय राष्ट्रे करीत होती. मोबदला किंवा भरपाई याचा अर्थच असा होता कि सत्ता संतुलनाच्या माध्यमातून आक्रमक राष्ट्राच्या सत्तेवर मर्यादा घालणे किंवा दुर्बल बनविणे हा होता. मोबदला हा सत्ता संतुलनाचा जुना मार्ग आहे.

**३. हस्तक्षेप आणि तटस्थता :** हस्तक्षेप हे आंतरराष्ट्रीय राजकारणातील सत्ता संतुलन राखण्यासाठी उपयोगात आणले जाणारे आणखी एक साधन आहे. हस्तक्षेप म्हणजे एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राच्या अंतर्गत राज्यकारभारात किंवा व्यवहारात केलेला हस्तक्षेप होय. अशा प्रकारचा हस्तक्षेप मोठी राष्ट्रे लहान राष्ट्राच्या अंतर्गत आणि बाह्य प्रश्नात हस्तक्षेप करीत असतात. कारण बड्या राष्ट्रांना असे वाटते की, एखाद्या विभागातील राष्ट्रीय हितसंबंधामुळे जागतिक शांतता धोक्यात येण्याची शक्यता आहे असा समज होतो तेव्हा बडी राष्ट्रे त्यांच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप करतात. उदा. भारत-

पाक संबंधातील काश्मीर प्रश्नाबाबत अमेरिका व चीन हे देश भारत-पाकिस्तानच्या अंतर्गत व्यवहारात हस्तक्षेप करीत असतात. तर सत्ता संतुलनाचा दुसरा मार्ग म्हणजे तटस्थ राहणे होय. दोन राष्ट्रामध्ये संघर्ष सुरू असतो. त्यावेळी त्या राष्ट्रामध्ये परस्पर वाटाघाटीने संघर्ष निवारण्याचा प्रयत्न सुरू असतो. त्यावेळी शेजारील राष्ट्रे तटस्थ राहून निर्माण होणाऱ्या सत्ता समतोलाला पाठिंबा देतात.

**४. शस्त्रीकरण आणि नि:शस्त्रीकरण :** सत्ता समतोलासाठी शस्त्रीकरण आणि नि:शस्त्रीकरणाचा वापर केला जातो. प्रत्येक राष्ट्र आपल्या हितसंबंधाच्या सुरक्षिततेसाठी शस्त्रास्त्रे निर्माण करीत असतात तसेच ती बाळगत असतात. लष्करी सामर्थ्य वाढवून राष्ट्रीय सत्ता मजबूत करण्याचा प्रयत्न करीत असतात त्यातून प्रत्येक राष्ट्राला लष्करी सामर्थ्याचे शस्त्रीकरण होवून शस्त्रास्त्र स्पर्धेचा 'समतोल' साधला जातो तो सुध्दा शस्त्रीकरणाचा सत्ता समतोल म्हटला जातो. याउलट आंतरराष्ट्रीय राजकारणात शस्त्रास्त्र स्पर्धेला इतका ऊत येतो की, शेजारील राष्ट्रांना स्वत:च्या सार्वभौमत्वाची व शांततेची भीती वाटायला लागते. त्यावेळी नि:शस्त्रीकरण करणे आवश्यक ठरते. म्हणून सत्ता समतोलासाठी नि:शस्त्रीकरण उपयोगी ठरते. शस्त्रीकरण आणि नि:शस्त्रीकरण हे दोन्ही घटक सत्ता संतुलनाला पूरक आहेत.

**५. फोडा आणि राज्य करा :** सत्ता समतोल साधण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे फोडा आणि राज्य करा. कोणतेही राष्ट्र किंवा त्यांचा गट अधिक सामर्थ्यशाली होणार असेल व त्यामुळे आंतरराष्ट्रीय शांतता किंवा इतर राष्ट्रांची सुरक्षितता धोक्यात येत असेल तर त्या राष्ट्रात फूट पाडून विभाजन केले जाते आणि तेथे आपले हितचिंतक असणारे नेतृत्व किंवा राज्यकर्ते सत्तेवर बसवले जातात आणि सत्ता समतोल घडवून आणला जातो. उदा. अमेरिकेने अरब राष्ट्रे इराक, इराण, कुवैत बाबतीत हेच धोरण स्वीकारले होते.

**६. आघात प्रतिबंधक राज्याची निर्मिती :** आंतरराष्ट्रीय राजकारणात जेव्हा संघर्ष निर्माण होतो. युद्धसदृश्य परिस्थिती निर्माण होते. त्यावेळी दोन शक्तीशाली राष्ट्रे एखाद्या लहान राष्ट्राची संतुलन राखण्यासाठी निर्मिती करतात. त्यांनाच आघात प्रतिबंधक राष्ट्रे असे संबोधले जाते. ही लहान राष्ट्रे दोन्ही शक्तीशाली राष्ट्रांना ऐकमेकांवर आक्रमण करण्यापासून रोखत असतात. तसेच त्या लहान राष्ट्रावर शक्तीशाली राष्ट्रे आक्रमण करीत नाहीत. उलट ते राष्ट्र सुरक्षित राहावे यासाठी दोन्ही राष्ट्रे प्रयत्न करीत असतात. उदा. भारत-चीन संबंधातील तिबेट, नेपाळ राज्य, मध्यगत राष्ट्रे दोन मोठ्या राष्ट्रांना एकमेकापासून दूर ठेवण्याची तसेच त्या दोन राष्ट्रामध्ये प्रत्यक्ष संघर्ष होणार नाही याची काळजी घेतात.

अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्ता संतुलन निर्माण करण्यासाठी वरील सर्व प्रकारच्या मार्गाचा अवलंब केला जातो आणि आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्ता समतोल कायम टिकविण्याचा प्रयत्न केला जातो, त्यामुळे सत्ता समतोल संकल्पना महत्त्वाची आहे.

## ❑ सत्ता समतोलाचे फायदे व तोटे :-

सत्ता समतोलामुळे खालीलप्रमाणे फायदे होतात.

१. शांतता हे तत्त्व आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाचे असते त्यासाठी सत्ता समतोलामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात शांततेची हमी मिळते.

२. सत्ता समतोलाच्या व्यवस्थेचे महत्त्वाची उद्दिष्टे म्हणजे युद्ध किंवा संघर्ष कमी करणे त्यामुळे ही व्यवस्था युद्ध नियंत्रित करीत असते, त्यामुळे युद्धाचा धोका टळतो.

३. सत्ता समतोल ही व्यवस्था कोणतीही व्यवस्था, कोणत्याही राष्ट्राला किंवा राष्ट्राच्या गटाला मर्यादेपेक्षा अधिक सामर्थ्य वाढवू देत नाही, त्यामुळे एकाधिकारशाहीला आळा बसतो.

४. सत्ता समतोलाच्या व्यवस्थेमुळे आंतरराष्ट्रीय कायद्याचे संरक्षण होते.

५. सत्ता समतोलाच्या व्यवस्थेमुळे युद्ध टाळले जाते, त्यामुळे छोट्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे आणि सार्वभौमत्वाचे रक्षण होते, त्यामुळे ही व्यवस्था महत्त्वाची आहे.

## ❑ सत्ता समतोलाचे तोटे :-

१. सत्ता समतोलाची व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी प्रमुख राष्ट्रे व ज्या तंत्राचा वापर करतात, त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये तणाव, असुरक्षितता वाढण्याची शक्यता असते त्यातून युद्धाची शक्यता वाढते.

२. सत्ता समतोलाची व्यवस्था निर्माण करण्यासाठी अनेक राष्ट्रे तह व करार करतात, त्यामुळे प्रादेशिक, उपप्रादेशिक गट स्थापन करतात, त्यामुळे जग हे लहानमोठ्या गटात विभागले जाते आणि या गटामध्ये संघर्ष सुरू होण्याची शक्यता असते.

३. सत्ता समतोलामध्ये जे करार होतात त्यामध्ये मोठी राष्ट्रे हे आपले हितसंबंध साधण्याचा प्रयत्न करतात, त्यामुळे हे करार न्यायाच्या तत्वावर आधारित असतात असे नाही.

४. सत्ता समतोलाची व्यवस्था प्रस्थापित करताना मोठ्या राष्ट्रांचा सहभाग महत्त्वाचा असतो. लहान राष्ट्राची भूमिका विचारात घेतली जात नाही.

अशाप्रकारे सत्तासमतोलाची फायदे व तोटे असले तरी एकूणच जगाच्या शांततेसाठी सत्ता समतोलाची गरज आहे ते नाकारून चालणे शक्य नाही म्हणून सत्ता समतोल महत्त्वाचा आहे.

### ३.२.३ शस्त्रनियंत्रण व नि:शस्त्रीकरण

आंतरराष्ट्रीय राजकारणातील दोन्ही महायुद्धातील भयानक आणि विनाशकारी परिस्थितीमुळे नि:शस्त्रीकरण आणि शस्त्रास्त्र नियंत्रणाची गरज निर्माण झाली. पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाची बिजे प्रामुख्याने सत्ता संघर्ष आणि शस्त्रास्त्र स्पर्धेमध्ये होती. हे आज संपूर्ण जगाला माहिती आहे. शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे होणारा राष्ट्रांचा अतिरिक्त खर्च, त्यामुळे राष्ट्रांमध्ये अनेक समस्या निर्माण होतात. त्याचबरोबर शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे युद्धाची शक्यता वाढते आणि युद्धासाठी पोषक वातावरण निर्माण होते. या जाणीवेतून युद्ध टाळण्याचा एक उपाय म्हणून शस्त्रास्त्र नियंत्रण ही संकल्पना उदयास आली. शस्त्रास्त्र नियंत्रणाची संकल्पना १९ व्या शतकातील इ.स. १८९९ च्या 'हेग शांतता परिषदेपासून' रुजावयास लागली. त्यानंतर अनेक प्रकारचे शस्त्रास्त्र नियंत्रणाचे करार झाले, पण त्याला अपयश आले आणि दुसऱ्या महायुद्धाला सामोरे जावे लागले. दुसऱ्या महायुद्धामुळे जगाची दोन विचारसरणीत विभागणी होऊन अमेरिका व सोव्हियत रशिया यांच्यात शीतयुद्धाला सुरूवात झाली. त्याचा परिणाम असा झाला की, या दोन्ही देशामध्ये अण्वस्त्र स्पर्धा वाढली. महासत्तामधील अण्वस्त्राची स्पर्धा जगाचा समुळ नायनाट केल्याशिवाय राहणार नाही. याची जाणीव महासत्तांना झाली आणि त्यातूनच शस्त्रास्त्र नियंत्रणाची संकल्पना खऱ्या अर्थाने २० व्या शतकात विकसित झाली.

❑ **शस्त्रास्त्र नियंत्रणाचा अर्थ व व्याख्या :–**

शस्त्रास्त्र नियंत्रण ही संकल्पना बहुअंशी वापरत असून साधारणत: या संकल्पनेमध्ये शस्त्रास्त्र कपात करणे, शस्त्रास्त्र निर्मितीवर बंदी, शस्त्रास्त्र स्पर्धा थांबविण्यासाठी द्विपक्षीय अथवा बहुपक्षीय करार करणे इ. घटकांचा अंतर्भाव होतो. काही अभ्यासकांनी शस्त्रास्त्र नियंत्रणाची व्याख्या खालीलप्रमाणे स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रा. एडवर्ड** यांच्या मते, ''राष्ट्रामधील लष्कर किंवा सैनिकांची संख्या परस्पर सहकार्याच्या माध्यमातून नियंत्रित करण्यासाठी एकपक्षीय किंवा बहुपक्षीय पातळीवर करण्यात आलेले करार म्हणजे 'शस्त्रास्त्र नियंत्रण' होय.''

**प्रा. श्लैश्चर** यांच्या मते, ''राष्ट्रामधील संरक्षणाशी संबंधित सहकार्याचा असा कोणताही करार की ज्यामध्ये शस्त्रास्त्रस्पर्धा नियंत्रीत करण्याविषयी, हिंसाचार किंवा युद्धाची शक्यता आणि व्याप्ती कमी करण्याविषयी तरतुदी आहेत.''

**केगली अणि विटकॉक** यांच्या मते, ''राष्ट्रामधील सहकार्याचे असे करार की ज्याअंतर्गत शस्त्रास्त्रांच्या निर्मितीवर मर्यादा घालून किंवा त्यांच्या वापरावर बंधने घालून शस्त्रास्त्र स्पर्धा नियंत्रित केली जाते.''

वरील व्याख्यांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, ‘शस्त्रास्त्र नियंत्रण’ ही एक जागतिक प्रक्रिया आहे. यामध्ये शस्त्रास्त्र निर्मितीवर बंधने घातली जातात. तसेच उपलब्ध शस्त्रास्त्रांच्या संख्यात्मक गुणात्मक दृष्टीने कपात करण्याची भूमिका स्वीकारली जाते आणि शस्त्रास्त्र नियंत्रणात सहभागी राष्ट्रांनी आपल्या संरक्षण खर्चात, सैनिकामध्ये कपात करणे अपेक्षित असते. अशाप्रकारे शस्त्रास्त्र नियंत्रण ही संकल्पना द्विपक्षीय व बहुपक्षीय देखील असू शकते.

### ❑ शस्त्रास्त्र नियंत्रणाची आधारभूत तत्त्वे :-

शस्त्रास्त्र नियंत्रणाची कल्पना ही खालील दोन मूलभूत तत्त्वावर आधारलेली आहे. ही तत्त्वे आंतरराष्ट्रीय संबंधाबद्दलच्या वास्तववादी दृष्टीकोनाशी मिळतीजुळती आहेत.

### १. आंतरराष्ट्रीय संघर्षाची अपरिहार्यता :-

शस्त्रास्त्र नियंत्रणाची संकल्पना ही आंतरराष्ट्रीय संघर्षाची अपरिहार्यता मान्य करते. आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रत्येक राष्ट्र आपल्या हितसंबंधाच्या संरक्षणासाठी प्रयत्नशील असते. हितसंबंधाच्या संरक्षणासाठी चाललेल्या या स्पर्धेत संघर्ष अटळ आहे. या संघर्षाचे रूपांतर युध्दात होणार नाही, याची काळजी शस्त्रास्त्र नियंत्रण प्रक्रियेअंतर्गत घेतली जाते. संघर्ष, चर्चा आणि सहकार्याच्या मार्गाने सोडविण्यासाठी आवश्यक आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करते हे शस्त्रास्त्र नियंत्रणाचे उद्दिष्ट आहे.

### २. शस्त्रास्त्राचे अस्तित्व अटळ :-

राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाचे संरक्षण करणे हे प्रत्येक देशाचे पहिले कार्य आहे. राष्ट्रीय संरक्षणासाठी शस्त्रास्त्र बनविण्याचा अधिकार प्रत्येक देशाला आहे. संयुक्त राष्ट्रांनीसुद्धा राष्ट्रांच्या आत्मरक्षणाचा अधिकार मान्य केला आहे. त्यामुळे शस्त्रास्त्राचे अस्तित्व आणि त्याचा वापर अटळ आहे. शस्त्रास्त्राचा पूर्णपणे त्याग राष्ट्राकडून होणार नाही. म्हणून शस्त्रास्त्रमुक्त विश्व निर्माण होऊ शकत नाही. कारण राष्ट्रे आपली इच्छा दुसऱ्यावर लादण्यासाठी शस्त्रास्त्राचा गैरवापर करू शकतात, त्यामुळे त्याच्यावर नियंत्रण असणे आवश्यक आहे. म्हणून शस्त्रास्त्र नियंत्रण ही व्यवस्था असणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे शस्त्रास्त्र नियंत्रणाची कल्पना ही वरील दोन्ही तत्त्वावर आधारलेली आहे.

### ❑ शस्त्रास्त्र नियंत्रणाची उद्दिष्ट्ये :-

**१. आंतरराष्ट्रीय तणाव कमी करणे :** राष्ट्रा-राष्ट्रांमधील सत्तेच्या लालसेपोटी निर्माण झालेल्या शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे जागतिक राजकारणात संशयाचे, भीतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण होते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणातील तणाव, भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण कमी करण्याचे महत्त्वाचे कार्य ‘शस्त्रास्त्र नियंत्रण’ करार करीत असतात. शस्त्रास्त्र नियंत्रण करारामुळे प्रत्येक

राष्ट्रात मैत्री आणि सहकार्याचे वातावरण तयार होते.

**२. शस्त्रास्त्र स्पर्धा नियंत्रित करणे :** आंतरराष्ट्रीय राजकारणातील स्पर्धा जागतिक शांतता व सुरक्षिततेला धोका पोहचवते. त्यामुळे शस्त्रास्त्र नियंत्रणाच्या माध्यमातून 'शस्त्रास्त्र स्पर्धा' नियंत्रित करणे, अस्तित्वात असणाऱ्या विध्वंसक शस्त्रास्त्रामध्ये कपात करणे आणि त्याच्या वापरावर बंदी घालण्याचे काम केले जाते. थोडक्यात, शस्त्रास्त्र नियंत्रणामुळे शस्त्रास्त्र निर्मितीची स्पर्धा नियमित होते.

**३. आंतरराष्ट्रीय कायद्याचे संरक्षण :** आंतरराष्ट्रीय कायद्याच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षा आणि आंतरराष्ट्रीय राजकारणातील समतोल निर्माण करता येतो. शस्त्रास्त्र स्पर्धा निर्माण होऊन आंतरराष्ट्रीय शांतता भंग होवून आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन केले जाते. मात्र शस्त्रास्त्र नियंत्रणाच्या माध्यमातून प्रत्येक राष्ट्रावर आंतरराष्ट्रीय कायदे पाळण्याचे बंधन घातले जाते. त्यावेळी प्रत्येक राष्ट्राकडून आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन होते.

**४. आर्थिक प्रगती साधणे :** शस्त्रास्त्रांच्या स्पर्धेमुळे राष्ट्राचा बहुसंख्य खर्च संरक्षणावर किंवा शस्त्रास्त्र निर्मितीवर होतो. त्यामुळे राष्ट्राच्या इतर सामाजिक आर्थिक विकासासाठी पैसा पुरवता येत नाही. आंतरराष्ट्रीय पातळीवर व्यापारवृद्धी नसते. नवे उद्योग स्थापन करणे शक्य नसते, जर शस्त्रास्त्र नियंत्रणाच्या माध्यमातून ही स्पर्धा बंद झाली तर राष्ट्राची आर्थिक प्रगती घडवून येऊ शकते. 'शस्त्रास्त्र निर्मिती व्यवस्था' यावरील खर्च कमी होवून राष्ट्रांची प्रगती होते.

**५. लोकशाहीचे रक्षण :** राष्ट्राराष्ट्रामधील शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात भीतीचे व संशयाचे वातावरण तयार होते. ज्या राष्ट्राकडे अण्वस्त्रे आहेत किंवा संख्यात्मक व गुणात्मक अशा स्वरूपाची विध्वंसक शस्त्रास्त्रे आहेत ते राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रावर दबाव टाकण्याचा किंवा हुकूमशाहीवृत्तीने वागण्याचा प्रयत्न करते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात लोकशाही धोक्यात येते. म्हणून लोकशाहीच्या रक्षणासाठी 'शस्त्रास्त्र नियंत्रण' आवश्यक आहे.

**६. राष्ट्रीय प्रतिष्ठा वाढविणे :** राष्ट्राची आंतरराष्ट्रीय राजकारणातील प्रतिष्ठा वाढविणे हे शस्त्रास्त्र नियंत्रणाचे उद्दिष्ट आहे. जी राष्ट्रे शस्त्रास्त्र नियंत्रणाला आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये अग्रक्रम देतात त्यांची आंतरराष्ट्रीय प्रतिष्ठा आपोआपच वाढते.

**७. शांतता प्रस्थापित करणे :** शांतता हे शस्त्रास्त्र नियंत्रणाचे प्रमुख उद्दिष्ट असून आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेसाठी राष्ट्रामध्ये झालेल्या कराराचे पालन करण्यास त्यांना प्रवृत्त करणे तसेच शांतता करार करण्यासाठी प्रोत्साहीत करते हे शस्त्रास्त्रनियंत्रणाचे कार्य आहे.

अशाप्रकारे वरील सर्व उद्दिष्ट्ये शस्त्रास्त्र नियंत्रणाची व्यवस्था पार पाडते.

## ❑ शस्त्रास्त्र नियंत्रणाचे करार :-

दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक राष्ट्रांनी विशेषत: अमेरिका आणि सोव्हिएत रशिया या राष्ट्रानी शीत युद्धकालीन तणावामध्ये संघर्षाचे वातावरण निर्माण केले व त्यामाध्यमातून अनेक करार झाले आहेत ते पुढील प्रमाणे :-

**१. डावपेचात्मक शस्त्रास्त्र नियंत्रण वाटाघाटी :** दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या अण्वस्त्र स्पर्धेमुळे शीतयुध्दाला हिंसक स्वरूप येण्याची शक्यता निर्माण झाली. शस्त्रास्त्र स्पर्धेचे परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागणार याची जाणीवसुद्धा या दोन्ही महासत्ताना झाली. अण्वस्त्र स्पर्धेमुळे निर्माण होणाऱ्या सत्तेच्या असमतोलाला नष्ट करण्यासाठी म्हणून 'शस्त्रास्त्र नियंत्रणाची' गरज भासू लागली. त्यासाठी अमेरिका, सोव्हिएत रशिया आणि संयुक्त राष्ट्र यांच्यात शस्त्रास्त्र नियंत्रणासाठी वाटाघाटी सुरू झाल्या. त्यातून अण्वस्त्राची निर्मिती, वापर आणि त्यांचा प्रसार यासंबंधी नियमावली तयार करण्यात आली. यावर द्विपक्षीय पातळीवर चर्चा होवून 'डावपेचात्मक शस्त्रास्त्र नियंत्रण करार' करण्यात आला. या करारानुसार अण्वस्त्रांच्या संख्येची कमाल पातळी ठरविण्यात आली. यानंतर १९७९ साली वरील कराराचा दुसरा टप्पा पार पाडला. या कराराच्या माध्यमातून अणवस्त्र प्रसार व प्रचारावर बंदी घालण्यात आली.

**२. क्षेपणास्त्रविरोधी व्यवस्थेच्या निर्मिती बंदी करार :** इ.स. १९७२ मध्ये रशिया आणि अमेरिका यांच्या दरमयान क्षेपणास्त्राच्या हल्ल्यापासून बचावात्मक व्यवस्था निर्माण करण्यावर बंदी आणण्यासंबंधी जो करार झाला त्याला 'क्षेपणास्त्रविरोधी व्यवस्थेचा निर्मिती बंदी करार' म्हणतात. यामध्ये संरक्षणावरील खर्च कमी करण्याचे ठरविण्यात आले व नवीन शस्त्रास्त्र निर्मितीवर बंदी घालण्यात आली.

**३. मध्यम पल्ल्याची क्षेपणास्त्रे नष्ट करणे :** इ.स. १९७२ मध्ये जैविक शस्त्राचे उत्पादन, विकास आणि साठा यावर बंदी घालणारा जैविक शस्त्रास्त्रे बंदी करार झाल्यानंतर इ.स. १९८७ मध्ये क्षेपणास्त्र नष्ट करण्यासाठी महत्त्वाचा करार झाला. या करारामध्ये अमेरिका व रशियाने येत्या तीन वर्षाच्या काळात ५०० ते ५००० कि.मी. अंतरापर्यंत जमिनीवरून जमिनीवर मारा करणारी क्षेपणास्त्रे नष्ट करण्याचे मान्य केले. या करारानुसार अमेरिका व सोव्हिएत रशिया अनुक्रमे ८५९ क्षेपणास्त्रे आणि १७५२ क्षेपणास्त्रे नष्ट करणार होते. पण या कराराला फारसे यश आले नाही.

**४. डावपेचात्मक शस्त्रास्त्र कपात करार :** इ.स. १९८२ पासून अमेरिका व सोव्हिएत रशिया यांच्या दरम्यान अण्वस्त्र कपातीसंदर्भात चर्चा, वाटाघाटी सुरू होत्या. त्याचा परिणाम म्हणून इ.स. १९९१ मध्ये 'डावपेचात्मक शस्त्रास्त्रांच्या कपातीसंबंधीचा' करार केला. हा करार द्विपक्षीय होता म्हणजे अमेरिका व सोव्हिएत रशिया दरम्यान होता. या करारामुळे अवजड क्षेपणास्त्राची संख्या कमी

होवून त्याचा साठाही कमी होणार होता. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय स्तरावर शस्त्रास्त्र नियंत्रणासाठी महत्त्वाचे वेगवेगळे करार झाल्याचे दिसते.

**५. युरोपमधील पारंपारिक शस्त्रास्त्रसंबंधीचा करार :** सन १९८७ मध्ये पश्चिम आणि पूर्व युरोपमधील सैन्य आणि शस्त्रास्त्राच्या युद्धसामग्रीच्या संख्येत कपात करण्यासंबंधी एक महत्त्वपूर्ण करार संमत करण्यात आला. या करारात पश्चिम आणि पूर्व युरोपमधील बहुतांश राष्ट्रांनी भाग घेतला होता. या करारासंबंधीच्या वाटाघाटी १९७३ मध्ये झाल्या असून त्यात पश्चिम व पूर्व युरोपातील राष्ट्रादरम्यान परस्पर आणि समतोल सैन्य कपात वाटाघाटीना प्रारंभ झाला होता. सन १९८७ झालेल्या करारामध्ये दोन्ही गटांनी (पश्चिम आणि पूर्व युरोप) आपल्या सैन्यात ३०% कपात करण्याचे ठरविले तसेच लढावू विमाने, हेलिकॉप्टर्स, रणगाडे, तोफा यांच्या संख्येतही मोठी कपात करण्याचे मान्य केले.

अशाप्रकारे शस्त्रास्त्र नियंत्रण करण्यासाठीचे करार झाल्याचे दिसून येते. जेणेकरून स्पर्धा व युद्ध टाळणे शक्य होईल.

## ❑ नि:शस्त्रीकरण

आंतरराष्ट्रीय राजकारणात तणाव निर्माण होणे व शांतता भंग होण्यासाठी राष्ट्राराष्ट्रामधील शस्त्रस्पर्धा हे कारण आहे. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाची बीजे प्रामुख्याने या शस्त्रास्त्र स्पर्धेमध्ये आढळतात. विज्ञानामुळे मानवाची प्रगती झाली असली तरी त्याच्या अधोगतीलाही विज्ञानच कारणीभूत ठरले आहे. मानवजातीला सुरक्षित राहावयाचे असेल तर शस्त्राचा उपयोग आणि शस्त्रस्पर्धा याबाबत गंभीरपणे विचार करणे आवश्यक आहे. नि:शस्त्रीकरण आणि शस्त्र नियंत्रण ही आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्त्वाची समस्या बनली आहे. सुरक्षिततेची समस्या नि:शस्त्रीकरणाशी अत्यंत निगडीत आहे. शस्त्र नियंत्रण वा नि:शस्त्रीकरण झाल्याशिवाय शाश्वत सुरक्षितता व शांतता टिकणे शक्य होत नाही आणि ही नि:शस्त्रीकरण समस्या युद्ध टाळण्याचा एक प्रभावी मार्ग म्हणून जागतिक पातळीवर उदयास आली आहे.

नि:शस्त्रीकरणाची गरज वाढण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे अमेरिका आणि सोव्हिएत रशियामधील शीतयुध्दामधील अण्वस्त्र स्पर्धा होय. अणुबॉम्ब हायड्रोजन बॉम्ब, नायट्रोजन बॉम्ब, जैविक आणि रासायनिक शस्त्रामध्ये बनविण्यासाठी जी चढाओढ निर्माण झाली त्यामुळे तिसरे महायुद्ध झाले, तर पृथ्वीवरील मानवी जीवन संपुष्टात येईल अशी भिती निर्माण झाली आणि या भितीमधूनच नि:शस्त्रीकरणाची कल्पना पुढे आली. सतराव्या शतकात राष्ट्र-राज्य संकल्पनेचा उदय व विकासबरोबरच नि:शस्त्रीकरण उदय व विकास घडून आला, कारण सन १६४८ च्या प्रसिध्द वेस्टफोलिया करारामध्ये नि:शस्त्रीकरणासंबंधी काही महत्त्वाच्या तरतुदी करण्यात आल्या होत्या, त्यानंतर १८१७ चा इंग्लंड आणि अमेरिकेमधील रशबगॉट करार हा एक महत्त्वाचा नि:शस्त्रीकरणाचा करार होता. नि:शस्त्रीकरण करण्यासाठी बहुपक्षपातळीवरील प्रयत्न हे १९९८ मध्ये हेग येथे आयोजित केलेल्या शांतता परिषदेत

शस्त्रास्त्र नियंत्रण करण्यासंबंधी योजना तयार करण्यावर चर्चा करण्यात आली. तसेच १९०२ मध्ये दुसरी हेग शांतता परिषद झाली त्यामध्ये ४४ राष्ट्रांनी भाग घेतला होता. पुढे राष्ट्रसंघाकडून नि:शस्त्रीकरणासाठी जे प्रयत्न झाले त्यांचा पाया हेग शांतता परिषदांनी घातला होता.

## ❑ नि:शस्त्रीकरणाचा अर्थ :-

शस्त्रास्त्र स्पर्धा टाळण्यासाठी शस्त्रास्त्रावर नियंत्रण ठेवणे, शस्त्र कपात करणे, सैन्यदल मर्यादित ठेवणे, याला साधारणपणे नि:शस्त्रीकरण म्हटले जाते. आंतरराष्ट्रीय सत्तास्पर्धेत आणि युध्द यांचा दुष्परिणाम टाळण्यासाठी नि:शस्त्रीकरण गरजेचे असते. पहिल्या महायुद्धानंतर व्हर्सायच्या तहाने नि:शस्त्रीकरणावर भर दिला होता. नि:शस्त्रीकरण योजना यशस्वी झाली नाही तर मानवप्रणित धोका अटळ आहे. एका राष्ट्राने किंवा अनेक राष्ट्रांनी आपल्या लष्करी साहित्यात आणि शस्त्रास्त्र कपात करणे किंवा ती अंशत: नष्ट करणे किंवा पूर्णत: नष्ट करणे म्हणजे नि:शस्त्रीकरण होय. युध्दासाठी आवश्यक असलेल्या शस्त्रास्त्राचे उत्पादन थांबविण्यालासुद्धा नि:शस्त्रीकरण म्हणता येते. खालीलप्रमाणे अनेक विचारवंतांनी नि:शस्त्राकरणाचा अर्थ स्पष्ट केला आहे.

**मॉर्गेन्थॉ** यांच्या मते, ''जागतिक स्तरावरची शस्त्रास्त्र स्पर्धा नष्ट करण्यासाठी कांही अंशी किंवा सर्व प्रकारच्या शस्त्रास्त्रामध्ये कपात किंवा नष्ट करणे म्हणजे नि:शस्त्रीकरण होय.''

**व्ही. टी. हायेक** यांच्या मते, ''लष्करी सामर्थ्याशी निगडीत कोणतीही कपात किंवा नियंत्रण म्हणजे नि:शस्त्रीकरण होय.''

**श्लैश्चर** यांच्या मते, ''दोन किंवा दोनपेक्षा अधिक राष्ट्रामध्ये झालेल्या करारामध्ये शस्त्रास्त्रामध्ये कपात त्यांच्यावर नियंत्रण किंवा त्यांना पूर्ण नष्ट करणे होय.''

नि:शस्त्रीकरणाच्या प्रक्रियेत एका अशा जागतिक व्यवस्थेची कल्पना केली जाते की, ज्यामध्ये शस्त्रास्त्राचे अस्तित्व नसेल ही संकल्पना शस्त्रास्त्र संपूर्ण नष्ट करणे किंवा त्यावर पूर्णपणे नियंत्रण ठेवणे, कपात करणे आणि मर्यादा घालणे यावर आधारलेली आहे. कारण भविष्यात कपात करणे गरजेचे आहे. शस्त्रास्त्राच्या निर्मितीमध्ये प्रगती होत असते. तंत्रज्ञान आणि विज्ञान यात झालेली प्रगती आणि मानवाची संशोधक वृत्ती यातून नवनवीन प्रकारची शस्त्रास्त्रे निर्माण होत असतात, त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे.

## ❑ नि:शस्त्रीकरणाची वैशिष्ट्ये :-

नि:शस्त्रीकरणाच्या प्रक्रियेची काही प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. नि:शस्त्रीकरणाचा प्रक्रियेमध्ये युध्द टाळण्यासाठी अस्तित्वात असलेल्या शस्त्रास्त्रावर नियंत्रण ठेवले जाते, ती कमी केली जातात किंवा नष्ट केली जातात.

२. नि:शस्त्रीकरण ही संकल्पना शस्त्रास्त्रावर मर्यादा, नियंत्रण, शस्त्र कपात, संपूर्ण शस्त्रत्याग अशा विविध अर्थाने प्रतीबिंबीत होत असतो.

३. नि:शस्त्रीकरण सक्तीचे किंवा ऐच्छिक असते. सक्तीच्या नि:शस्त्रीकरणामध्ये शस्त्र कपात करण्यासाठी किंवा ते पूर्णपणे नष्ट करण्यासाठी दबाव आणला जातो. एखाद्या युध्दामध्ये विजयी झालेल्या देशाकडून पराभूत राष्ट्रावर नि:शस्त्रीकरणासाठी दबाव आणला जातो, तर दुसऱ्या महायुध्दानंतरची नि:शस्त्रीकरणाची प्रक्रिया ही ऐश्चिक स्वरूपाची बनली आहे. आज शस्त्रास्त्रामध्ये कपात करणे हा राष्ट्रीय इच्छाशक्तीचा भाग बनला आहे.

४. नि:शस्त्रीकरणाचे रूप काळानुसार बदलू शकतो. विध्वंसकारी शस्त्रास्त्राच्या संख्येत कपात करणे किंवा समूळ नष्ट करणे हे नि:शस्त्रीकरणाच्या प्रक्रियेचे प्रमुख उद्दिष्ट्चे असून अशा शस्त्रास्त्राचे स्वरूप बदलू शकते. त्यामुळे अण्वस्त्राच्या संख्येत कपात करणे किंवा त्यांचा नाश करणे या उद्दिष्टाला नि:शस्त्रीकरणात प्राधान्य देण्यात आले.

५. नि:शस्त्रीकराच्या प्रक्रियेचा संबंध भविष्यातील शस्त्रास्त्र स्पर्धा नियंत्रित करण्याशी नाही हे शस्त्रास्त्र नियंत्रण प्रक्रियेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. नि:शस्त्रीकरणात केवळ अस्तित्वात असणाऱ्या शस्त्रास्त्रामध्ये कपात किंवा त्यांना नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले जातात.

- **नि:शस्त्रीकरणाचे प्रकार :-**

नि:शस्त्रीकरणामध्ये अनेक प्रकारच्या शस्त्रावर नियंत्रण घालणे अभिप्रेत असते. त्यावर आधारित नि:शस्त्रीकरणाचे काही प्रकार पडतात. ते पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१. गुणात्मक नि:शस्त्रीकरण :** गुणात्मक शस्त्रीकरणात काही विशिष्ट प्रकारची शस्त्रास्त्रे व युध्द नष्ट करण्याचा आग्रह धरला जातो. त्यास गुणात्मक नि:शस्त्रीकरण असे म्हणतात.

**२. संख्यात्मक नि:शस्त्रीकरण :** संख्यात्मक नि:शस्त्रीकरणामध्ये सर्व राष्ट्रांनी सर्व प्रकारची शस्त्रे नष्ट करावीत असे सांगितले जाते. त्याला संख्यात्मक नि:शस्त्रीकरण असे म्हणतात.

**३. ऐच्छिक नि:शस्त्रीकरण :** एखाद्या देशाकडून युध्द टाळण्यासाठी स्वखुशीने जी शस्त्र कपात केली जाते. त्याला त्याला ऐच्छिक नि:शस्त्रीकरण म्हणतात. दुसऱ्या महायुद्धानंतर शस्त्र नि:शस्त्रीकरणाचे प्रयत्न ऐच्छिक स्वरूपाचे बनले, परंतु संयुक्त राष्ट्रातील नि:शस्त्रीकरणाचे प्रयत्न अमेरिका व सोव्हिएत रशियाने अनेकवेळा फेटाळून लावले आहेत.

**४. सक्तीचे नि:शस्त्रीकरण :** सक्तीच्या नि:शस्त्रीकरणात राष्ट्रावर शस्त्रास्त्रामध्ये कपात करण्यासाठी किंवा ते पूर्णपणे नष्ट करण्यासाठी बंधन घातले जाते किंवा दबाव आणला जातो. एखाद्या

युध्दातील विजयी झालेल्या राष्ट्राकडून पराभूत झालेल्या राष्ट्रावर शस्त्रास्त्र कपात करण्यासाठी दबाव आणला जातो. पहिल्या महायुध्दानंतर जर्मनीचे सक्तीचे नि:शस्त्रीकरण करण्याचा प्रयत्न इंग्लंड, अमेरिका, सोव्हिएत रशिया व फ्रान्स या देशानी केला.

**५. स्थानिक नि:शस्त्रीकरण :** नि:शस्त्रीकरणाची प्रक्रिया ही विशिष्ट एका देशाशी संबंधित असते, त्याला स्थानिक नि:शस्त्रीकरण असे म्हणतात. या नि:शस्त्रीकरणाच्या करारामध्ये दोन किंवा त्यापेक्षा अधिक राष्ट्रे भाग घेतात. करारामध्ये सहभागी झालेल्या राष्ट्रावर नि:शस्त्रीकरणाची प्रक्रिया बंधनकारक असते.

**६. सार्वत्रिक नि:शस्त्रीकरण :** सार्वत्रिक नि:शस्त्रीकरणाचे करार हे बहुपक्षीय पातळीवर होणारे करार असून यात सर्व लहान-मोठी राष्ट्रे सहभागी होतात. नि:शस्त्रीकरणाची ही प्रक्रिया सर्व राष्ट्रांवर बंधनकारक असतेच असे नाही. सार्वत्रिकरित्या नि:शस्त्रीकरणाची प्रक्रिया ही तत्त्वत: मान्य केली असली तरी शस्त्रास्त्रामध्ये कपात करावी यासाठी दबाव आणला जात नाही.

अशाप्रकारे वरील प्रकारे नि:शस्त्रीकरणाचे प्रकार पडतात.

**❑ नि:शस्त्रीकरणाची आवश्यकता :-**

नि:शस्त्रीकरण हे आज संयुक्त राष्ट्रसंघटनेचे प्रमुख उद्दिष्ट्ये आहे. या संकल्पनेला सार्वत्रिक रूप प्राप्त झाले असून युध्द टाळण्यासाठी व पृथ्वीवरील मानव जातीच्या अस्तित्वसाठी नि:शस्त्रीकरणाशिवाय पर्याय नाही. दुसऱ्या महायुद्धानंतर जगात साम्यवादी रशिया आणि भांडवलशाही अमेरिका या दोन महासत्तामध्ये वैचारिक संघर्ष निर्माण झाला व त्यातून असुरक्षितता वाढू लागली. या महासत्ताबरोबर इंग्लंड, फ्रान्स व चीन या राष्ट्रांनीही अणुशक्ती विकासावर भर देवून अण्वस्त्र निर्मितीकरणावर व स्वत:ला अधिकाधिक शक्तीशाली बनविण्यावर भर दिला. त्यामुळे नि:शस्त्रीकरणाची गरज भासू लागली. त्यासंबंधातील प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत.

**१. शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करणेसाठी :-**

आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी नि:शस्त्रीकरणासाठी आवश्यकता आहे. कारण लष्करीदृष्ट्या विचार केल्यास शस्त्रास्त्रे हे युध्दाचे कारण आहे. शस्त्रास्त्रामुळे राष्ट्रामध्ये तणाव आणि भिती निर्माण होऊन युद्धाला सुरूवात होते. वाढत्या शस्त्रस्पर्धेमुळे नेत्यांच्या मनावर ताण पडतो आणि लढाऊ वृत्तीचे शासनकर्ते युध्दाला प्रवृत्त होतात. तसेच राष्ट्राराष्ट्रात शत्रूत्वाची आणि संघर्षाची भावना वाढली आहे त्या प्रमाणात शस्त्रे निर्माण करण्याची स्पर्धाची वाढली आहे. यातून युध्द होण्याची शक्यता असते, त्यामुळे युद्धाचा धोका टाळून देशामध्ये शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी नि:शस्त्रीकरणाची आवश्यकता आहे.

२. **आर्थिक विकासाला प्रोत्साहन :-**

शस्त्रास्त्र स्पर्धेमुळे युध्दसाहित्य आणि लष्कर यावर प्रचंड मोठ्या प्रमाणात खर्च करावा लागतो. राष्ट्रीय उत्पन्नाचा बराचसा भाग या शस्त्रास्त्र निर्मितीवर खर्च होतो. नि:शस्त्रीकरणामुळे संरक्षणावर होणारा खर्च कमी होऊन जास्तीत जास्त पैसा आर्थिक विकासासाठी वापरता येतो त्यामुळे राष्ट्रातील सामाजिक व आर्थिक समस्या दूर करणे शक्य होते. तसेच नि:शस्त्रीकरण केले तर आर्थिक साधनांचा उपयोग लोककल्याणसाठी करता येईल. जगामध्ये शस्त्रास्त्र निर्मितीसाठी जो एकूण खर्च केला जातो. त्यापैकी निम्मा खर्च जरी कमी केला तरी उपासमार, रोगराई, अज्ञान, दुष्काळ या प्रश्नावर मात करता येईल, त्यामुळे नि:शस्त्रीकरण होणे गरजेचे आहे.

३. **नैतिक कारण :-**

युद्धामधून मोठ्या प्रमाणावर जीवित आणि वित्त हानी होते. त्यामुळे नैतिक आणि सामाजिक मूल्ये पायदळी तुडविली जातात. युध्द म्हणजे मानवतेविरुध्द केलेला अनैतिक अपराध आहे. शस्त्रास्त्रामुळे युध्द होऊन मनुष्यहानी होते ती अनैतिक आहे. टी.एच.ग्रीन यांच्या मते, राष्ट्राच्या नैतिक चुकामुळे युध्दाचे प्रसंग ओढवतात. पहिल्या व दुसऱ्या महायुध्दामध्ये झालेली मनुष्यहानी व वित्तहानी केवळ अमानवीय नाही तर मानव जातीला मिळालेले शाप आहे हे स्पष्ट झाले. त्यामुळे नि:शस्त्रीकरण आवश्यक आहे.

४. **संस्कृतीचे जतन आणि संवर्धन :-**

शस्त्रास्त्र स्पर्धेमध्ये युध्दाचा धोका असतो. युध्दामुळे जगाची संस्कृती विनाशाला जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. यामुळे मानवी संस्कृतीही नष्ट होण्याची भीती असते. संस्कृतीची उभारणी हजारो वर्षात झाली आहे. शस्त्रामुळे अण्वस्त्राच्या निर्मितीमुळे ही संस्कृती क्षणार्धात नष्ट होऊ शकते. युध्दामुळे सर्वनाश अटळ आहे. युध्द टाळण्यासाठी मानवी संस्कृतीचा विकास व संवर्धन होण्यासाठी नि:शस्त्रीकरण आवश्यक आहे.

५. **तिसरे महायुद्ध टाळण्यासाठी :-**

शस्त्रास्त्र स्पर्धेत कपात केला नाही तर तिसरे महायुद्ध होण्याची शक्यता आहे. हे महायुद्ध तर मानवी जातीला संकटात टारणारे ठरेल. विश्वातील मानवाचे अस्तित्व राहणार आहे. त्यामुळे महायुध्द टाळण्याची एकमेव मार्ग म्हणजे नि:शस्त्रीकरण आहे.

६. **लहान राष्ट्रांच्या कारभारात हस्तक्षेप :-**

शस्त्रस्पर्धेमुळे प्रत्येक राष्ट्र शस्त्रास्त्र निर्मितीवर मत देत आहे. परंतु प्रत्येक राष्ट्रालाच शस्त्र निर्मिती शक्य होते, कारण अण्वस्त्र निर्मितीसाठी लागणारा खर्च मोठ्या प्रमाणात असतो. तो खर्च

करण्याची शक्ती लहान राष्ट्राकडे नसते. तसेच अण्वस्त्राच्या निर्मितीसाठी लागणारे तांत्रिक ज्ञान ही बहुतांश राष्ट्रांकडे नसते. परिणामत: अशी राष्ट्रे दुसऱ्या विकसित राष्ट्राकडून मोठ्या प्रमाणात शस्त्रे खरेदी करून शस्त्र संपन्न होण्याचा प्रयत्न करीत असतात. लहान राष्ट्राचे मोठ्या राष्ट्राच्या दबावापासून संरक्षण करण्यासाठी नि:शस्त्रीकरणाची आवश्यकता आहे. एकूणच दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण करण्यात आलेल्या विश्वसंहारक अण्वस्त्रांमुळे सर्वांनाच भिती वाटत आहे. त्यामुळे जागतिक जनमताने नि:शस्त्रीकरणाची जोरदार मागणी केली आहे. कारण या संकटातून मार्ग काढून शांतता प्रस्थापित करण्यासाठी नि:शस्त्रीकरण हाच एकमेव उपाय आहे. म्हणून आधुनिक काळातील अणुयुध्दापासून मानवजातीला वाचविण्यासाठी नि:शस्त्रीकरण करणे आवश्यक आहे.

- **नि:शस्त्रीकरणाचे प्रयत्न :-**

नि:शस्त्रीकरणाच्या प्रक्रिया ही फार जुनी असली तरी त्यासाठी संघटित आणि सूत्रबध्द प्रयत्न विसाव्या शतकात सुरू झाले आहेत. युध्दामुळे निर्माण होणारी मोठी जिवित व वित्तहानी, अत्याधुनिक शस्त्रास्त्राची निर्मिती संरक्षणावरील वाढता खर्च इ. गोष्टीमुळे नि:शस्त्रीकरणाची मागणी वाढली आहे. त्यातून नि:शस्त्रीकरण करण्यासाठी अनेक देशांनी राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्र संघटना आणि जगातील प्रभावी राष्ट्रामध्ये अनेक करार झाले आहेत. त्यामधील काही करारांची चर्चा खालीलप्रमाणे करता येईल.

**१. राष्ट्रसंघाच्या निर्मितीपूर्वीचे प्रयत्न :-**

राष्ट्रसंघाच्या स्थापनेपूर्वी नि:शस्त्रीकरणाचा प्रयत्न हा १८९९ आणि १९०७ साली हेग येथे भरलेला शांतता परिषदामधून झाला. या परिषदेमध्ये २५ हून अधिक राष्ट्रांनी सहभाग घेतला व शस्त्रास्त्र कंपनीवर व्यापक चर्चा होऊन शस्त्रास्त्राच्या वापरावर बंदी घातली. दुसऱ्या हेग शांतता परिषदेमध्ये नि:शस्त्रीकरणासाठी एक विशेष समितीची स्थापना केली गेली. पहिल्या महायुद्धातील विध्वंसक रूपामुळे अनेक राष्ट्रांनी नि:शस्त्रीकरणाचा विचार केला आणि युध्दानंतर झालेल्या व्हर्सायच्या तहात नि:शस्त्रीकरणाला प्राधान्य दिले गेले.

**२. राष्ट्रसंघाकडून नि:शस्त्रीकरणासाठी झालेले प्रयत्न :-**

राष्ट्रसंघ स्थापनेनंतर नि:शस्त्रीकरणासाठी बहुपक्षीय पातळीवर संघटित प्रयत्न सुरू झाल्यामुळे नि:शस्त्रीकरणाच्या कार्याला वेग आला. सन १९२१ मध्ये राष्ट्रसंघाने एका तात्पुरत्या संमिश्र नि:शस्त्रीकरणाच्या आयोगाची स्थापना केली, त्याद्वारे विविध राष्ट्राच्या लष्कराची संख्या ठरविणे, शस्त्रास्त्र कपात करणे, आक्रमणाला बळी पडलेल्या नागरिकांसाठी आंतरराष्ट्रीय मदत देण्याचे प्रस्ताव मांडणे इत्यादी कार्य केले, परंतु त्याला अपयश आले, पुन्हा १९३२ साली विश्व नि:शस्त्रीकरण परिषद जिनेव्हा येथे भरविण्यात आली. या परिषदेला ६२ राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या

परिषदेत शस्त्रास्त्र निर्मितीवर नियंत्रण, शस्त्रास्त्राच्या व्यापारावर आंतरराष्ट्रीय पर्यवेक्षण आणि राष्ट्रांनी आपला संरक्षक खर्च प्रसिध्द करावा. हे तीन निर्णय घेण्यात आले परंतु ही परिषद आपले उद्दिष्ट साध्य करण्यात अपयशी ठरली.

**३. संयुक्त राष्ट्रासंघटनेचे नि:शस्त्रीकरणासाठीचे प्रयत्न :–**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटनेत नि:शस्त्रीकरणावर विशेष भर देण्यात आला होता. कलम ११(१), २६, ४७ (१) द्वारे विशेष नि:शस्त्रीकरण व शस्त्रास्त्र कपातीविषयीची नियमावली तयार करण्याची विशेष जबाबदारी आमसभेवर टाकण्यात आली. तर सुरक्षा समितीकडे शस्त्रास्त्रावर नियंत्रण घालणारी एक व्यापक योजना बनविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. शस्त्रास्त्र नियंत्रण आणि नि:शस्त्रीकरणाविषयी सुरक्षा समितीला मदत करण्यासाठीची जबाबदारी एका संरक्षण समितीच्या निर्मितीची तरतूदीतून करण्यात आली. दुसऱ्या महायुद्धामध्ये अमेरिकेकडून अणुबॉम्बचा वापर झाला. त्यांच्यामुळे मानवहानी आणि वित्तहानी झाल्यामुळे अणुशक्तीचा वापर हा विध्वंसक कार्यासाठी करण्यापेक्षा आर्थिक विकासासाठी केला जावा, यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर कडक उपाययोजना केली जावी अशी अनेक राष्ट्रांनी  मागणी केली. त्यानुसार २६ जानेवारी १९४६ रोजी आमसभेने अणुशक्ती आयोग स्थापण्याचा निर्णय घेतला. त्यामध्ये अमेरिका, सोविएत रशिया, इंग्लंड, फ्रान्स, चीन व कॅनडा हे आयोगाचे सदस्य बनले. अणुशक्तीच्या वापरावर नियंत्रण ठेवून अणुशक्तीचा वापर विधायक कार्यासाठी करावा. विज्ञान, तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्य, माहितीची देवाणघेवाण वाढावी यासाठी प्रयत्न करणे इत्यादी कार्ये अणुशक्ती आयोगाने करावी. त्याचबरोबर १९४७ साली पारंपारिक शस्त्रास्त्र नियमन व कपात  आयोगाची स्थापना करण्यात आली. परंतु या दोन्ही आयोग शस्त्रनियंत्रण करण्यास अपयशी झाले, त्यासाठी नि:शस्त्रीकरण आयोग नेमले व शीतयुध्दातील परिस्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी एक सर्वसमावेशक नियमावली तयार करण्याची जबाबदारी नि:शस्त्रीकरण आयोगावर टाकण्यात आली. सन १९५२ ते १९५७ या काळात पारंपारिक शस्त्रास्त्रे तसेच अण्वस्त्रांवरील नियंत्रणासंबंधी अमेरिका, रशिया, इंग्लंड आणि फ्रान्स यांच्याकडून विविध प्रस्ताव मांडण्यात आले. सन १९५५ मध्ये नि:शस्त्रीकरणाचा एक प्रस्ताव सोविएत रशियाकडूनदेखील मांडला गेला. जुलै १९५५ मध्ये जिनेव्हा येथे एक नि:शस्त्रीकरण परिषद आयोजित करण्यात आली. या परिषदेत अमेरिका, सोविएत रशिया, इंग्लंड आणि फ्रान्सने  सहभाग घेतला. नि:शस्त्रीकरण आणि शस्त्रास्त्र नियत्रणासंबंधी या सर्व प्रश्नावर आधारित एक व्यापक अहवाल आमसभेने सन १९५७ मध्ये तयार केला. अहवालातील प्रमुख मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

१) अण्वस्त्रांच्या चाचणीवर त्वरित बंदी घालावी.

२) अणुशक्तीचा विधायक कार्यासाठी वापर करण्यात यावा.

३) अण्वस्त्रांच्या संख्येत कपात करण्यात यावी.

४) अणुशक्तीच्या वापरावर नियंत्रणासाठी एका पर्यवेक्षण व्यवस्थेची निर्मिती करण्यात यावी.

५) नि:शस्त्रीकरण आयोगाचा विस्तार करण्यात यावा.

संयुक्त राष्ट्रसंघामध्ये १९५८ मध्ये सोविएत रशियाने अणुचाचण्यावर बंदी घालण्याचा प्रस्ताव मांडला. त्यामुळे जगाला आश्चर्याचा धक्का बसला. सोव्हिएत रशियाच्या प्रस्तावावर चर्चा करण्यासाठी अमेरिका, सोविएत रशिया आणि इंग्लंड यांच्यात चर्चा होवून सन १९६२ साली अंतराळात, भूमीवर अणुचाचण्या न करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावाच्या आधारावरच आमसभेमध्ये अणुचाचणीसंबंधी ठराव मांडण्यात येऊन तो मंजूर करण्यात आला. संयुक्त राष्ट्र संघटनेकडून अण्वस्त्र संपन्नता नसलेल्या राष्ट्रांची एक महत्त्वपूर्ण परिषद सन १९६८ मध्ये जिनेव्हा येथे आयोजित करण्यात आली. या परिषदेत ९६ राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यात खालील ठराव मंजूर करण्यात आले, त्यामध्ये अण्वस्त्रसंपन्नता नसलेल्या राष्ट्रांची सुरक्षा, अण्वस्त्रयुक्त क्षेत्रांची निर्मिती, अण्वस्त्रांच्या प्रसाराविरुध्द उपाययोजना आणि अणुशक्तीचा शांतता आणि विधायक कार्यासाठी वापर इत्यादी गोष्टींचा समावेश करण्यात आले. सन १९७० चे दशक नि:शस्त्रीकरण दशक म्हणून पाळण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने सन १९६९ मध्ये घेतला आणि शस्त्रास्त्रांच्या निर्मितीवर बंधने, अणुचाचण्यांवर बंदी घालून शस्त्रास्त्र स्पर्धा कमी करण्याचे आवाहन संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सदस्य राष्ट्रांना करण्यात आले. सन १९६२ साली क्युबामध्ये अमेरिका सोविएत रशियामधील अण्वस्त्र स्पर्धा वाढली होती. संरक्षणावरचा खर्च वाढला होता. या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवरच आमसभेने हा निर्णय घेतला. अशाप्रकारचे अनेक आयोग व परिषदाच्या माध्यमातून नि:शस्त्रीकरणाचा प्रयत्न केला आहे.

**४. वैयक्तिक अथवा संयुक्त राष्ट्र संघटनेच्या बाहेर नि:शस्त्रीकरणासाठी झालेले प्रयत्न :-**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या व्यतिरिक्त अनेक इतर राष्ट्रांनी नि:शस्त्रीकरणाचा प्रयत्न केला आहे. या प्रयत्नामध्ये अमेरिका, सोविएत रशिया, इंग्लंड आणि फ्रान्स इ. राष्ट्राचे योगदान महत्त्वाचे आहे.

**अ) आंशिक परीक्षण बंदी करार :-**

अमेरिका, सोविएत रशिया आणि इंग्लंड यांनी ५ ऑगस्ट १९६३ रोजी आंशिक परिक्षण बंदी करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या कराराद्वारे सदस्य राष्ट्रांनी आपल्या अधिकार क्षेत्रात आकाश आणि जमिनीमध्ये आणि समुद्रात अणुचाचणी न करण्याचा निर्णय घेतला. तसेच अण्वस्त्र चाचणीला प्रोत्साहन देऊ नये हेही मान्य करण्यात आले. परंतु या करारावर चीन व फ्रान्स यांनी स्वाक्षरी केली नाही.

**ब) बाह्य अंतरिक्ष करार :-**

सन १९६७ मध्ये अमेरिका, सोविएत रशिया आणि इंग्लंड दरम्यान बाह्य अंतरिक्ष करार झाला, त्याद्वारे अवकाशातील संशोधनावर नियंत्रण ठेवणे, अण्वस्त्रे न सोडणे व संरक्षण सेवक वर्गाचा वापर न करणे इत्यादी तत्त्वे मान्य करण्यात आली.

**क) समुद्र मुक्ती करार :-**

अमेरिका, सोव्हिएत रशिया व इंग्लंड दरम्यान समुद्र तळ अण्वस्त्रे व शस्त्रास्त्रापासून मुक्त ठेवण्याचा महत्त्वपूर्ण करार सन १९७१ साली झाला. याद्वारे समुद्रामध्ये अणुचाचणी करण्यास बंदी घालण्यात आली.

**ड) डावपेचात्मक शस्त्रास्त्राच्या नियंत्रणासाठी वाटाघाटी :-**

अमेरिका व रशिया दरम्यान १९६९ साली वाटाघाटी सुरू झाल्या या साल्ट कराराद्वारे अण्वस्त्राची निर्मिती वापर आणि त्याचा प्रसार यावर निर्बंध घालण्यासाठी सर्वसंमत नियमावली तयार करणे हे उद्दिष्ट ठरविले.

**इ) डावपेचात्मक शस्त्रास्त्र कपातीसंबंधीच्या वाटाघाटी :-**

हा करार साल्टच्या वाटाघाटीचा पुढचा टप्पा आहे, त्यामध्ये नियंत्रणावर भर दिला गेला तर यामध्ये शस्त्रास्त्र कपातीवर भर देण्यात आला. याची सुरूवात १९८२ मध्ये जिनेव्हा येथे झाली व १९९१ मध्ये यावर अमेरिका व रशियाने स्वाक्षरी केली.

अशाप्रकारे बाह्य राष्ट्रांनी शस्त्रास्त्र नियंत्रण व नि:शस्त्रीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे, त्यामध्ये अमेरिका व रशिया यांचा समावेश आहे.

## ३.२.४ सामूहिक सुरक्षितता

आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आंतरराष्ट्रीय शांतता, सुरक्षितता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याच्या प्रयत्नाला महत्त्वाचे स्थान राहिले आहे. त्या दृष्टीकोनातून जगातील प्रत्येक देश किंवा राष्ट्र सामूहिक सुरक्षितता प्रस्थापित करण्याचे परराष्ट्र धोरण ठरवीत असतो. विसाव्या शतकामध्ये आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता आणि राष्ट्रीय स्वातंत्र्य प्रस्थापित करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे सामूहिक सुरक्षितता होय. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राचे सार्वभौमत्व टिकविणे आणि स्वातंत्र्य अबाधित ठेवण्याचे उद्दिष्ट असते. म्हणून सामूहिक सुरक्षिततेची आवश्यकता आहे. राष्ट्रीय सुरक्षा ही परस्परांशी निगडीत असल्यामुळे तो आंतरराष्ट्रीय सुरक्षेचाच एक भाग बनला आहे आणि त्यासाठी सर्व राष्ट्रांचे सामूहिक प्रयत्न आवश्यक आहे. कारण पहिल्या व दुसऱ्या महायुद्धाची विध्वंसक हानी आणि त्याचा परिणाम यामुळे सुरक्षितता आवश्यक आहे. ही जाणीव आजच्या समुदायामध्ये झाली आहे. कोणत्याही

राष्ट्रावर आक्रमण झाले तर ते सर्व देशावरील आक्रमण आहे हे ग्रहीत धरून ते परतवून लावण्यासाठी आक्रमक राष्ट्राविरुध्द संघटित शक्ती उभी करणे या तत्त्वावर सामूहिक सुरक्षिततेची निर्मिती झाली आहे. अशाप्रकारे आंतरराष्ट्रीय सुरक्षिततताद्वारे राष्ट्राची सामूहिक बांधिलकी व्यक्त होते. राष्ट्रांना आपल्या स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाच्या रक्षणाची हमी हे सामूहिक सुरक्षिततताद्वारे निर्माण होते.

## ❑ सामूहिक सुरक्षिततेचा अर्थ :–

आधुनिक काळात आंतरराष्ट्रीय राजकारणामधील सत्ता व्यवस्थापनासाठी जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आलेली सामूहिक सुरक्षितता ही यंत्रणा आहे. यामध्ये प्रामुख्याने आक्रमण करणाऱ्या राष्ट्राविरुध्द सामूहिकरित्या कारवाई करण्यात येते. काही अभ्यासकांनी सामूहिक सुरक्षिततेच्या संकल्पनेची व्याख्या खालीलप्रमाणे केल्या आहेत.

**जॉर्ज श्वाझनबर्जर** यांच्या मते, ‘सामूहिक सुरक्षितता म्हणजे अशी यंत्रणा आहे की, प्रस्थापित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेविरुध्द होणाऱ्या कोणत्याही आक्रमणाला प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्या आक्रमणाचा प्रतिकार करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली यंत्रणा होय.’

**क्लाऊड** यांच्या मते, ‘या व्यवस्थेअंतर्गत एखाद्या राष्ट्रांकडून आक्रमक आणि बेकायदेशीरपणे सत्तेचा वापर करण्याच्या झालेल्या धाडसाचा सामूहिक प्रयत्नांद्वारे सामना केला जातो. यास सामूहिक सुरक्षितता असे म्हणतात.’

**श्लैश्चर** यांच्या मते, ‘सामूहिक सुरक्षितता ही एक अशी व्यवस्था आहे की, राष्ट्रांच्या संकटसमयी परस्परांच्या मदतीसाठी वचनबध्द असतात.’

**पामर आणि पार्कीन्स** यांच्या मते, ‘शांततेला धोका निर्माण झाल्यास त्यास प्रतिबंध करण्यासाठी करावयाची सामूहिक उपाययोजना म्हणजे सामूहिक सुरक्षितता होय.’

**जॅकोब आणि ॲथरटन** यांच्या मते, ‘राष्ट्रा–राष्ट्रामधील परस्पर संरक्षणासाठीचा करार म्हणजे सामूहिक सुरक्षितता होय. यात प्रत्येक राष्ट्र इतर राष्ट्रांच्या संरक्षणाची हमी घेऊन त्याच्या बदल्यात त्या राष्ट्रांचे सार्वभौमत्व आणि स्वातंत्र्य अबाधीत ठेवले जाते.’

वरील व व्याख्यांचा अभ्यास केल्यानंतर असे म्हणता येईल की, सामूहिक सुरक्षितता ही राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि सुरक्षितता स्थापन करणारी व्यवस्था किंवा तंत्र आहे. यामध्ये प्रामुख्याने आक्रमक राष्ट्रांविरुध्द किंवा युध्दाचा संघटितपणे प्रतिकार केला जातो. सर्व राष्ट्रे एकत्रित येऊन सामूहिकरित्या आक्रमण करणाऱ्या राष्ट्राविरुध्द सामूहिक शक्तीचा वापर करतात. आंतरराष्ट्रीय राजकारणातील राष्ट्रीय सत्तेच्या अनियंत्रित वापरावर मर्यादा किंवा बंधने घातली जातात आणि अशावेळी सत्तेचे नियंत्रण व व्यवस्था करणारी ‘सामूहिक सुरक्षितता’ ही यंत्रणा आहे असे म्हणता येईल.

## ❑ सामूहिक सुरक्षिततेची आधारभूत तत्त्वे :-

सामूहिक सुरक्षितता ही काही आधारभूत तत्त्वांवर आधारलेली आहेत, ती तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत.

### १. आंतरराष्ट्रीय संघर्ष :-

आंतरराष्ट्रीय राजकारणात संघर्ष किंवा युद्ध हे अटळ आहे. सामूहिक सुरक्षिततेची यंत्रणा युद्धाच्या परिकल्पनेवर आधारित आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये जेव्हा संघर्षमय परिस्थिती निर्माण झाली तर त्याचा सामना संघटितपणे कसा करावा याविषयीची उपाययोजना अंतर्भूत असणारी यंत्रणाही असते. युद्ध अटळ आहे, या कल्पनेवरच सामूहिक सुरक्षितता यंत्रणा उभी राहिली आहे.

### २. प्ररोधन :-

आंतरराष्ट्रीय राजकारणातील सामूहिक सुरक्षिततेची यंत्रणा प्ररोधनाच्या तत्त्वावर आधारलेली आहे. प्ररोधन तत्त्वामध्ये आक्रमक राष्ट्राविरुध्द दुसऱ्या राष्ट्रांना शक्ती प्रदर्शनाद्वारे युद्ध किंवा आक्रमणापासून परावृत्त केले जाते. सामूहिक सुरक्षितता देखील अशाच प्रकारचे प्ररोधन निर्माण करते. आक्रमण किंवा युध्दाचे धाडस केल्याने सर्व राष्ट्रांचा सामूहिक प्रतिकार किंवा लष्करी कारवाईचा सामना करावा लागेल, याची राष्ट्रांना कल्पना असल्यामुळे ते युध्द किंवा आक्रमणाचे धाडस करत नाहीत, या भितीमुळे कोणतेही राष्ट्र आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन करण्याचा प्रयत्न करीत नाही.

### ३. प्रबळ राजकीय इच्छाशक्ती :-

आंतरराष्ट्रीय राजकारणामधील आक्रमक असणाऱ्या राष्ट्राविरुध्द सामूहिक लष्करी कारवाई करण्याची राजकीय इच्छाशक्ती प्रबळ असली पाहिजे, ही राजकीय इच्छाशक्ती ही आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता व संकट काळामध्ये परस्पर सहकार्याविषयीची बांधिलकी दर्शविते. युध्द थांबविण्यासाठी सर्व राष्ट्रांनी तत्परतेने एकत्र येणे आवश्यक आहे.

### ४. सामूहिक एकमत :-

आंतरराष्ट्रीय राजकारणात कोणत्या राष्ट्राने आंतरराष्ट्रीय कायद्याचे उल्लंघन केले आहे आणि त्यामुळे एखाद्या राष्ट्राच्या स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाला धोका निर्माण झाला आहे, यावर इतर राष्ट्रामध्ये एकमत होणे आवश्यक आहे. सामूहिक सुरक्षितता यशस्वी होण्यासाठी एकमत असणे आवश्यक आहे. या एकमतामुळे आक्रमक राष्ट्राविरुध्द कारवाई करता येते.

### ५. प्रभावी संघटीत सामर्थ्य :-

सामूहिक सुरक्षिततेमधून निर्माण होणारे संघटीत सामर्थ्य हे जर आक्रमक राष्ट्राच्या सामर्थ्यापेक्षा

अधिक नसेल तर ही यंत्रणा अयशस्वी ठरेल. त्यामुळे आक्रमक राष्ट्राच्या विरोधात जर कारवाई करायची असेल तर त्याच्याकडे असलेल्या सामर्थ्यापेक्षा दुप्पट सामर्थ्य संघटीत राष्ट्राकडे असणे आवश्यक आहे. जर संघटीत राष्ट्राकडे सामर्थ्य नसेल तर आक्रमण करण्याची प्रवृत्ती बळावते. त्यामुळे संघटीत सामर्थ्य हे प्रभावी असणे आवश्यक आहे.

अशाप्रकारे वरील आंतरराष्ट्रीय संघर्ष, प्रोधन, प्रबळ राजकीय इच्छाशक्ती, सामूहिक एकमत आणि प्रभावी संघटित सामर्थ्य इत्यादी तत्वावर आधारलेली सामूहिक सुरक्षितता आंतरराष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची आहे.

- **सामूहिक सुरक्षिततेची वैशिष्ट्ये :–**

सामूहिक सुरक्षिततेच्या यंत्रणेची प्रमुख वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१. सत्ता व्यवस्थापनाचे साधन :–**

आंतरराष्ट्रीय राजकारणात सत्तेच्या व्यवस्थापनाचा प्रश्न महत्त्वाचा आहे. अनियंत्रित सत्तेमुळे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षिततेला धोका निर्माण होतो. त्यामुळे सत्तेवर नियंत्रण ठेवणे, त्याचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. सामूहिक सुरक्षितता ही त्यातीलच एक यंत्रणा आहे. या यंत्रणेद्वारे व संघटीत शक्तीमार्फत सत्ता व्यवस्थापन केले जाते.

**२. सामूहिक कृती :–**

सामूहिक सुरक्षितता व्यवस्थेमध्ये सामूहिक कृतीला महत्त्वाचे स्थान आहे. कारण या व्यवस्थामध्ये राष्ट्रे परस्परांच्या सुरक्षिततेसाठी बांधील असतात. त्यामुळे एखाद्या राष्ट्रावर आलेले संकट हे सर्वांचे संकट समजून सर्व राष्ट्रे सामूहिकरीत्या आपल्या शक्तीचा वापर करून आक्रमक राष्ट्राच्याविरुध्द कृती करतात, म्हणून सामूहिक सुरक्षितता ही एक सामूहिक कृती आहे.

**३. तटस्थतेला विरोध :–**

सामूहिक सुरक्षिततेची व्यवस्था ही तटस्थ वा अलिप्त राहण्याच्या तत्त्वाला विरोध करणारी आहे. कारण कोणत्याही राष्ट्रावर संकट निर्माण झाले तर त्याला प्रतिकार करण्याची जबाबदारी सर्व राष्ट्राची आहे, त्यामुळे कोणतेही राष्ट्र तटस्थ किंवा अलिप्त राहू शकत नाही.

**४. आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती :–**

सामूहिक सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती करण्याची कल्पना गृहीत धरली जाते. या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या माध्यमातून आक्रमक राष्ट्राचा सामूहिकरित्या प्रतिकार केला जातो. सर्व राष्ट्रांना एकत्रित करून एक आंतरराष्ट्रीय सामर्थ्य निर्माण करण्यामध्ये या संघटनेची भूमिका महत्त्वाची आहे.

### ५. कायमस्वरूपी विश्व शासनाला विरोध :-

सामूहिक सुरक्षिततेच्या व्यवस्थेमध्ये आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती करण्याची कल्पना जरी असली तरी कायमस्वरूपी विश्व शासनाला विरोध केला जातो, कारण सार्वभौम राष्ट्रे कायमस्वरूपी एखाद्या शासनाच्या अधिपत्याखाली फार काळ राहणे शक्य नसते. केवळ आणीबाणी परिस्थितीमध्ये सार्वभौम राष्ट्रे अधिपत्य मान्य करतात. म्हणून सामूहिक सुरक्षितता ही कायमस्वरूपी विश्व शासनाला विरोध करते.

### ६. आंतरराष्ट्रीय हितसंबंधाला प्राधान्य :-

सामूहिक सुरक्षिततेची व्यवस्था ही आंतरराष्ट्रीय हितसंबंधाना प्राधान्य देणारी आहे, कारण आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये राष्ट्रीय हितसंबंधाना गौण मानून आंतरराष्ट्रीय हितसंबंधाला प्राधान्य दिले जाते. जेव्हा आक्रमक राष्ट्राबद्दल सर्व राष्ट्राचे एकमत होते, तेव्हा जो निर्णय आंतरराष्ट्रीय संघटना घेईल त्याला सर्वांनी पाठिंबा देणे आवश्यक असते. अशाप्रकारे सामूहिक सुरक्षितता ही आंतरराष्ट्रीय हितसंबंधाना प्राधान्य देणारी यंत्रणा आहे.

### ७. विभागीय संशोधन कराराना विरोध :-

सामूहिक सुरक्षिततेची यंत्रणा ही सर्व राष्ट्राच्या सामूहिकतेवर आधारलेली आहे, त्यामुळे विभागीय पातळीवर दोन किंवा त्यापेक्षा अधिक राष्ट्रामधील करार करण्यास विरोध दर्शविला जातो, कारण या विभागीय करारामुळे सामूहिक सुरक्षिततेच्या व्यवस्थेत अनेक अडथळे निर्माण होतात व राष्ट्रामध्ये फूट पडते. शस्त्रास्त्र स्पर्धा वाढते, त्यामुळे या करारांना विरोध केला आहे.

अशा प्रकारे सामूहिक सुरक्षिततेची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येईल.

### ❑ राष्ट्रसंघातर्गत सामूहिक सुरक्षिततेचा प्रयोग :-

सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वावर आधारित राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. पहिल्या महायुद्धाच्या काळात आदर्शवादी विचारवंत वुड्रो विल्सन यानी १४ कलमी योजना घोषित केली, त्यामध्ये सत्तासमतोलाच्या यंत्रणेऐवजी आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता अणि राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व यांच्या रक्षणासाठी सामूहिक सुरक्षितता यंत्रणेला महत्त्व द्यावे, त्यामुळे विल्सनच्या चौदा कलमी योजनेमध्ये सामूहिक सुरक्षिततेचा पाया घातला गेला. वुड्रो विल्सन यांनी आंतरराष्ट्रीय संघटना स्थापण्याचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाच्या आधारावर राष्ट्रसंघाची निर्मिती झाली. त्याची निर्मिती आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता टिकविण्यासाठी करण्यात आली होती आणि ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सामूहिक सुरक्षिततेच्या यंत्रणेचा वापर केला जाणार होता, त्याचा उल्लेख राष्ट्रसंघाच्या घटनेत सापडतात. कलम १० मध्ये राष्ट्रसंघाच्या सर्व सदस्य राष्ट्रांचे प्रादेशिक ऐक्य कायम ठेवण्यासाठी त्यांच्या स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्वाच्या रक्षणासाठी सामूहिक प्रयत्न केले जातील.

परस्परांच्या संरक्षणासाठी सर्व राष्ट्रे सामूहिकरित्या बांधील असतील, म्हणून सदस्य राष्ट्रावर झालेल्या आक्रमणाचा प्रतिकार सघटीत शक्तीद्वारे करण्यात येईल. कलम ११ मध्ये राष्ट्रसंघाच्या सदस्यावर आक्रमण झाल्यास किंवा आक्रमणाची भीती वाटल्यास त्याचा विचार राष्ट्रसंघ करेल आणि परिस्थितीनुरूप संयुक्तिक कारवाई करण्यात येईल. त्याचबरोबर राष्ट्रसंघाचे सरचिटणीस परिषदेची बैठक बोलावतील. कलम १६ मध्ये राष्ट्रसंघाच्या कोणत्याही सदस्य राष्ट्राविरुध्द घोषित झालेले युध्द हे राष्ट्रसंघाच्या सर्व सदस्य राष्ट्राविरुध्द पुकारलेला युध्द आहे असे गृहित धरावे आणि त्यादृष्टीने सामूहिक कारवाई केली जाईल. त्याचबरोबर राष्ट्रसंघाची परिषद सदस्य राष्ट्रांना अशा आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये आर्थिक आणि लष्करी सहकार्याचे आवाहन करेल.

कलम १७ नुसार राष्ट्रातील संघर्ष किंवा तंटे सोडवून शांततापूर्ण मार्गाने त्यावर तोडगा काढण्यासाठी राष्ट्रसंघाची परिषद आवश्यक ती कारवाई करेल.

अशाप्रकारे राष्ट्रसंघाच्या घटनेतील १० ते १७ कलमामध्ये अनेक गोष्टीची सामूहिक सुरक्षिततेसाठी तरतूद केली आहे. तर राष्ट्रसंघाकडून सामूहिक सुरक्षिततेसाठी परस्पर सहकार्याचा करार (१९२१), जिनेव्हा करार, लोकार्नो करार (१९२५), पॅरिस करार इत्यादी करार करण्यात आले. परंतु यामध्ये ते अपयशी ठरले त्यामुळे दुसऱ्या महायुद्धाची निर्मिती झाली. प्रत्येक करारामध्ये आंतरराष्ट्रीय वाद प्रश्न सोडविण्यासाठी युद्धाच्या मार्गाचा अवलंब केला जाणार नाही. कोणत्याही देशातील संघर्ष, वाद, शांतता, सहकार्य आणि चर्चेच्या माध्यमातून सोडवले जाईल अशा अनेक गोष्टीचा समावेश करण्यात आले. अशाप्रकारे राष्ट्रसंघाकडून सामूहिक सुरक्षिततेची निर्मिती झाली.

### ❑ संयुक्त राष्ट्रसंघटनेकडून सामूहिक सुरक्षिततेचे प्रयोग :–

राष्ट्रसंघाने अनेक प्रयत्न करूनही सामूहिक सुरक्षितता प्रस्थापित झाली नाही आणि १९३९ ला दुसऱ्या महायुद्धाला सुरूवात झाली. त्यामध्ये जीवित व वित्त आणि मानवी हानी मोठ्या प्रमाणात झाली. त्यामुळे जागतिक शांततेस प्राधान्य देण्यात आले. त्यामुळे सन १९४५ मध्ये दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी सामूहिक सुरक्षिततेचा मार्ग महत्त्वाचा आहे. यावर सर्व संस्थापक सदस्यामध्ये एकमत होते. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या घटनेच्या पहिल्या कलमामध्ये असे स्पष्ट करण्यात आले आहे की, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविणे हे युनोचे सर्वश्रेष्ठ उद्दिष्ट आहे आणि आंतरराष्ट्रीय शांततेचा भंग करणाऱ्या राष्ट्राविरुध्द सामूहिक कारवाई करण्यात येईल. सामूहिक कारवाई करण्यासाठी युनोच्या घटनेमध्ये सातव्या प्रकरणात काही तरतूदी करण्यात आल्या आहेत. एकूण १३ कलमे आहेत त्या तरतुदी पुढीलप्रमाणे :–

कलम ३९ : आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्याची जबाबदारी सुरक्षा परिषदेवर असेल. संभाव्य

धोक्याची दखल घेऊन सुरक्षा परिषद त्यासंबंधी आवश्यक उपाययोजना करण्याविषयी निर्णय घेईल.

कलम-४० : संघर्ष वाढू नये म्हणून सुरक्षा परिषद काही तात्पुरत्या स्वरूपाच्या उपाययोजना करून संबंधित राष्ट्रांना त्या उपाययोजनाचे पालन करावे म्हणून प्रयत्न करेल.

कलम ४१ : लष्करी कारवाईशिवाय इतर उपाययोजनांविषयी सुरक्षा परिषद निर्णय घेऊन युनोच्या इतर सदस्य राष्ट्रांना त्याची अंमलबजावणी करण्याची सक्ती करू शकते.

कलम ४२ : आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता टिकविण्यासाठी लष्करी कारवाई संदर्भात सुरक्षा परिषदेला अधिकार देण्यात आला. कलम ४१ मधील उपाययोजना अयशस्वी होतील, तेव्हा लष्करी कारवाईचा निर्णय सुरक्षा परिषद घेऊ शकते.

कलम ४३ : सुरक्षा परिषदेने कलम ४१ अंतर्गत घेतलेला निर्णय अंमलात आणण्यासाठी युनोला इतर सदस्य राष्ट्रे आवश्यक ते सहकार्य करतील.

कलम ४४ ते ४७ अंतर्गत आक्रमक राष्ट्राविरुध्द, लष्करी कारवाईसाठी आवश्यक सैन्य, युध्द साहित्य, शस्त्रास्त्रे यांचा पुरवठा सदस्य राष्ट्रे करतील.

कलम ४८ नुसार सुरक्षा परिषदेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सर्व सदस्य राष्ट्रांवर बंधनकारक आहे.

कलम ४९ व ५१ नुसार सुरक्षा परिषदेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी राष्ट्रे एकमेकांच्या सहकार्यातून करू शकतात. तसेच संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सर्व सदस्य राष्ट्रांना आत्मरक्षणाचा अधिकार देण्यात आला.

अशाप्रकारे संयुक्त राष्ट्रसंघामध्ये सामूहिक सुरक्षिततेच्या संदर्भात तरतूदी करण्यात आल्या आहेत. या तरतुदी संदिग्ध नसून स्पष्ट आहेत. यानुसार सुरक्षा परिषदेवर सामूहिक सुरक्षितता प्रस्थापित करण्याची जबाबदारी देण्यात आली. आंतरराष्ट्रीय सुरक्षिततेसाठी, आंतरराष्ट्रीय संघर्ष सोडविण्यासाठी एक कायमस्वरूपी संस्थात्मक संरचना असावी हा विचार विसाव्या शतकात विशेषत: पहिल्या महायुद्धानंतर बळावत गेला. त्यानंतर संयुक्त राष्ट्र संघटना व राष्ट्र संघटना या संघटनांनी सामूहिक सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी अनेक प्रयत्न केले आहेत. संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सनदेकडे पाहिले असता असे लक्षात येते की, आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता यांचे संरक्षण करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने सामूकि सुरक्षिततेची प्रभावी यंत्रणा तयार केली आहे. आतापर्यंत संयुक्त राष्ट्रसंघाअंतर्गत सामूहिक सुरक्षिततेसाठी वेगवेगळ्या राष्ट्रावर कारवाई झाल्याचे दिसून येते.

## ३.३ सारांश

राष्ट्रीय सत्ता, सत्ता समतोल, शस्त्रनियंत्रण, नि:शस्त्रीकरण व सामूहिक सुरक्षितता या सर्व तत्त्वाची आजच्या जगामध्ये मोठ्या प्रमाणात गरज आहे. कारण राष्ट्राला आपल्या हितसंबंधाची जोपासना करण्यासाठी राष्ट्रीय सत्ता असणे आवश्यक आहे. राष्ट्रीय सत्तेमुळे एकमेकांमध्ये संघर्ष निर्माण होतो. त्यासाठी सत्ता समतोल राखणे आवश्यक आहे, त्याचबरोबर शस्त्रास्त्र नियंत्रण करणे, शस्त्रास्त्रे नष्ट करणे, नि:शस्त्रीकरण करणे आवश्यक असते, त्याचबरोबर सामूहिक सुरक्षितता ही आजच्या काळाची गरज बनली आहे. म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणात या संकल्पना महत्त्वाच्या आहेत, त्यामुळे त्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

- **शस्त्रास्त्र नियंत्रण :** शस्त्रास्त्रामध्ये कपात करणे.
- **नि:शस्त्रीकरण :** शस्त्रास्त्रे नष्ट करणे.
- **सामूहिक सुरक्षितता :** सर्व राष्ट्रांचे सर्वांनी एकत्र येऊन संरक्षण करणे.
- **राष्ट्रीय सत्ता :** राष्ट्राकडे असलेल्या साधनसंपत्ती नैसर्गिक साधने, राष्ट्रीय चारित्र्य इत्यादी घटकांनी निर्माण झालेले सामर्थ्य.
- **सत्ता समतोल :** दोन राष्ट्रांमधील सत्ता नियंत्रीत करणे.

## ३.५ सरावासाठी स्वाध्याय

१. राष्ट्रीय सत्ता व राष्ट्रीय सत्तेचे घटक स्पष्ट करा.

२. सत्ता समतोलाची चर्चा करा.

३. शस्त्रास्त्र नियंत्रणाची उद्दिष्ट्ये स्पष्ट करून शस्त्रास्त्र नियंत्रणाचे करार स्पष्ट करा.

४. नि:शस्त्रीकरण म्हणजे काय? नि:शस्त्रीकरणाचे प्रयत्न स्पष्ट करा.

५. सामूहिक सुरक्षिततेची वैशिष्ट्ये आधारभूत तत्वे स्पष्ट करा.

## ३.६ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

१. **पेंडसे आणि सहस्त्रबुध्दे** (२००८) : *'आंतरराष्ट्रीय संबंध'*, ओरिएंट लॉगमन, मुंबई.

२. **Ghai U. R.** (2004) : *'International Relations : Theory and Practice'*, New Academic Publishing, Jalandhar.

३. **Palmar & Perkins** (1985) : *'International Relations'*, CBS Publications, Delhi.

४. **देवळाणकर शैलेंद्र** (२०१०) : *‘आंतरराष्ट्रीय संबंध’*, विद्या बुक पब्लिशर्स. औरंगाबाद.

❑❑❑

सत्र–३ : घटक–४

# आंतरराष्ट्रीय संबंधाची प्रक्रिया

## अ) परराष्ट्र धोरण : अर्थ, स्वरूप, उद्दिष्ट्ये, निर्धारक घटक आणि भूमिका
## ब) राजनय : अर्थ, स्वरूप, उद्दिष्ट्ये, कार्ये, प्रकार आणि भूमिका

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ परराष्ट्र धोरणाचा अर्थ

४.२.२ परराष्ट्र धोरणाचे स्वरूप

४.२.३ पराराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे

४.२.४ पराराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक

४.२.५ परराष्ट्र धोरणाची भूमिका

४.२.६ राजनय अर्थ

४.२.७ राजनयाचे स्वरूप

४.२.८ राजनयाची उद्दिष्टे

४.२.९ राजनयाची कार्ये

४.२.१० राजनयाचे प्रकार

४.२.११ राजनयाची भूमिका

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं–अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे

१) परराष्ट्र धोरणांचे अर्थ व व्याख्यांचा अभ्यास करणार आहोत.

२) परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्टे स्वरुपाचा अभ्यास केला जाईल.

३) परराष्ट्र धोरणाच्या निर्धारक घटकांचा विवेचन करणार आहोत.

४) राजनय अर्थ व स्वरुपाचे विवेचन करणार आहोत.

५) राजनयाची उद्दिष्टे यांचे विवेचन करणार आहोत.

६) राजनयाची कार्ये व प्रकारांचा अभ्यास करणार आहोत.

## ४.१ प्रास्ताविक

मागील घटकात आपण राष्ट्रीय सत्तेच्या घटक यांचा अभ्यास केला आहे. या घटकांत परराष्ट्र धोरण व राजनय याचा अभ्यास करणार आहोत. २१ व्या शतकात आंतरराष्ट्रीय संबंधाच्या प्रक्रियेत परराष्ट्र धोरण व राजनय यांच्या अभ्यासाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे.

आधुनिक जगातील कोणतेही राज्य स्वावलंबी व स्वयंपूर्ण नाही. सर्व राष्ट्रांना आपल्या राष्ट्रांच्या विकासासाठी परस्परांशी संबंध निश्चित करावे लागतात. राज्य आपली उद्दिष्टे प्राप्त करण्यासाठी परस्पर संबंध परराष्ट्र धोरणाच्या आधारेच निश्चित करीत असतात. आणि परराष्ट्रीय धोरणांची अंमलबजावणी करण्याचे साधन म्हणजे राजनय होय. म्हणूनच आंतरराष्ट्रीय संबंधाची प्रक्रिया यामध्ये परराष्ट्र धोरण व राजनय याच्या अभ्यासाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे.

## ४.२.१ परराष्ट्र धोरणाचा अर्थ व व्याख्या

- **परराष्ट्र धोरणाचा अर्थ :-**

आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासामध्ये विविध राष्ट्रांच्या परराष्ट्र धोरणाचा अभ्यास केला जातो. विविध राष्ट्रांचे परराष्ट्र धोरण समजून घेतल्याशिवाय आंतरराष्ट्रीय राजकारणाचे आकलन होऊ शकत नाही त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासात परराष्ट्र धोरणाच्या अभ्यासाला महत्त्वाचे स्थान आहे. राज्याची इतर राज्याच्या संदर्भात ठरणारी वर्तणूक, राज्याच्या महत्त्वाच्या हितसंबंधांचे संरक्षण व संवर्धन करणारी तत्त्वे निश्चित करण्याची आणि त्यांच्या अंमलबजावणीची प्रक्रिया म्हणजे परराष्ट्र धोरण होय. प्रत्येक देशाचे परराष्ट्र धोरण हे राष्ट्रीय हितसंबंधावर आधारीत असते. जगातील इतर देशांशी संबंध ठेवताना आपल्या राष्ट्राचे हितसंबंध सांभाळणे, जोपासणे व त्याआधारे इतर देशाशी विविध प्रकारचे संबंध परराष्ट्र धोरणाद्वारे निर्माण व प्रस्थापित केले जातात.

आधुनिक काळात कोणतेच राष्ट्र स्वावलंबी नाही. आजच्या परस्परावलंबी जगात इतर देशाची

मदत, सहकार्य घेतल्याशिवाय देश आपला विकास करू शकत नाही. प्रत्येक देशाला कोणत्या-ना-कोणत्या बाबीत व प्रमाणात इतर देशांवर अवलंबून रहावे लागते, त्यातून जगातील इतर देशांशी वेगवेगळ्या प्रकारचे संबंध निर्माण होतात. त्या संबंधांना निश्चीत दिशा दिल्याशिवाय राष्ट्रांना आपली उद्दीष्ट्ये साध्य करता येत नाहीत, त्यामुळे राष्ट्रांना आपले राष्ट्रीय हितसंबंध साध्य करण्यासाठी दुसऱ्या किंवा परराष्ट्राशी कांही बाबतीत काही प्रमाणात संबंध ठेवावे लागतात किंवा संबंध न ठेवणारे धोरण स्विकारावे लागते, त्यातून परराष्ट्रीय धोरणाची निर्मिती होते.

- **परराष्ट्र धोरणाच्या व्याख्या :-**

**१. चार्ल्स बर्टन मार्शल :** 'राज्यसत्तेने आपल्या क्षेत्राबाहेरील परिस्थितीला प्रभावित करण्यासाठी केलेला कृतीचा क्रम म्हणजे परराष्ट्र धोरण होय.'

**२. राज्यशास्त्र कोष :** 'एका राष्ट्राने दुसऱ्या राष्ट्राबाबत स्वीकारलेले धोरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय.'

**३. हार्टमन :** 'राष्ट्रीय हित साध्य करण्यासाठी जाणून-बुजून, समजून-उमजून तयार केलेली सुसंबंध्द व्यवस्था म्हणजे परराष्ट्र धोरण होय.'

**४. जॉर्ज मॉडेल्स्की :** 'राज्याच्या व्यवहाराची अशी विकसित पद्धती की, ज्याद्वारे एक राष्ट्र दुसऱ्या राष्ट्रास आपल्या इच्छेनुसार व्यवहार करण्यास भाग पाडते. त्याला परराष्ट्र धोरण असे म्हणतात.'

## ४.२.२ परराष्ट्र धोरणाचे स्वरुप

**१ राष्ट्रहितास प्राधान्य :-**

परराष्ट्र धोरण ठरविताना प्रत्येक राष्ट्र आपल्या हिताचा विचार करीत असते. आपले हित बाजूला ठेऊन कोणत्याही प्रकारची तडजोड केली जात नाही. उदा. काश्मिरच्या प्रश्नांबाबत भारत कोणत्याही प्रकारची तडजोड स्वीकारत नाही.

**२. शक्ती किंवा कुवतीनुसार संबंध जोडले जातात :-**

कोणत्या राष्ट्रांशी कोणत्या प्रकारचे संबंध ठेवावेत हे परराष्ट्र धोरण ठरवित असतात. एखाद्या देशांशी लष्करी करार करावयाचा असेल तर त्या देशाची लष्करी शक्ती मजबुत असावी लागते. कमकुवत लष्करी शक्ती असलेल्या देशांशी लष्करी करार करून फार मोठा फायदा होणार नाही याची जाणीव ठेवून लष्करी करार करावा लागतो.

### ३. स्व:तत्त्वाचा पाठपुरावा :-

परराष्ट्र धोरण ठरविताना आपल्या राष्ट्रांची तत्त्वे विचारात घ्यावीच लागतात. दुसऱ्या राष्ट्राबरोबर संबंध प्रस्थापित करत असताना आपल्या राष्ट्राच्या तत्त्वाची पायमल्ली होणार नाही याची खबरदारी घ्यावी. उदा. अहिंसा, पंचशील तत्त्वे ही भारताची प्रमुख तत्त्वे आहेत. त्यामुळे परराष्ट्र धोरण प्रस्थापित करीत असताना या तत्त्वांना जर बाधा पोहचत असेल तर असा करार शक्यतो भारताकडून नाकारण्यात येतो.

## ४.२.३ परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे

राष्ट्रीय हित नजरेसमोर ठेऊन प्रत्येक राज्य परराष्ट्र धोरणाची आखणी करीत असते. आंतरराष्ट्रीय हितासाठी राष्ट्रीय हिताला तिलांजली देणे कोणत्याही राष्ट्राला परवडणारे नसते. म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये राष्ट्रीय हिताला जसे महत्त्व आहे तसे अनेक घटक महत्त्वाचे आहेत. परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे खालीलप्रमाणे आहेत.

### अ) परराष्ट्र धोरणाची प्राथमिक उद्दिष्टे :-

### १. यथास्थिती धोरण :-

आहे ती परिस्थिती तशीच ठेवणे म्हणजे यथास्थिती धोरण होय. म्हणजेच एखादया राष्ट्रांचे आहे ती परिस्थिती तशीच ठेवून तिचे संरक्षण करणे, इतर राष्ट्रांनी आपल्यावर आक्रमण केले तरच त्याला प्रतिकार करावयाचा अन्यथा शांततेचे धोरण स्वीकारायचे यालाच यथास्थिती धोरण असे म्हणतात.

### २. सुधारणावादी धोरण :-

सुधारणावादी धोरणाचा अर्थ असा की, आपल्या राष्ट्रांचे संरक्षण करीत असतानाच इतर राष्ट्रांचा भूप्रदेश मिळविण्याचा प्रयत्न करणे. उदा. जपानने १९१० साली कोरियावर व १९३२ साली चीनने सैनिकी आक्रमण करून त्यांचे प्रदेश मिळविण्याचा प्रयत्न केला.

### ३. आर्थिक विकास :-

आपल्या राष्ट्रातील नागरिकांचा विकास करणे हे प्रत्येक राष्ट्राचे किंवा तेथील शासनाचे कर्तव्य असते. परराष्ट्र धोरण ठरविताना आपल्या नागरिकांचा आर्थिक विकास कसा होईल हे पाहणे आवश्यक असते. नागरिकांच्या विकासाला खीळ बसेल अशा प्रकारचे धोरण शक्यतो टाळले जाते. म्हणून आर्थिक विकास करणे हे परराष्ट्र धोरणाचे उद्दिष्ट आहे.

### ४. राष्ट्रशक्तीत वाढ :–

परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून प्रत्येक राष्ट्राकडून आपल्या शक्तीत वाढ करण्याचा प्रयत्न केला जातो. इतर राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करून राष्ट्र शक्तीत वाढ केली जाते. उदा. लष्करी सामग्री, तंत्रज्ञान.

### ब) मध्यवर्ती उद्दिष्टे :–

### १. देशातील दबाव गटाचे हित :–

दबाव गट हे आपल्या हितासाठी शासनावर दबाव आणत असतात. त्यामुळे त्यांच्या मागणीकडे शासनाला दुर्लक्ष करता येत नाही. म्हणून परराष्ट्र धोरण ठरविताना आपला देशातील दबाव गटाचे हित जोपासण्याचे कार्य शासन करीत असते. उदा. उद्योजकांच्या दबाव गटाचे हित हे जागतिकीकरणामध्ये होत असते. म्हणून एखाद्या देशांशी संबंध प्रस्थापित करीत असताना संबंधित दबाव गटाचे हित लक्षात घेऊन धोरण ठरविले जाते.

### २. अराजनैतिक संबंध :–

परराष्ट्र धोरणात राजनैतिक संबंधाबरोबरच अराजनैतिक संबंध निर्माण केले जातात. प्रामुख्याने सांस्कृतिक देवाण–घेवाण यांचा उल्लेख करावा लागतो. उदा. स्त्रीया, लहान मुले यांचे प्रश्न, कला व क्रीडा क्षेत्रातील देवाण–घेवाण इ.

### ३. राष्ट्रप्रतिष्ठा :–

आपल्या राष्ट्राची प्रतिष्ठा वाढविणे हे परराष्ट्र धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. विविध प्रकारची संशोधने, तंत्रज्ञान विकसीत करून आपल्या राष्ट्राची प्रतिष्ठा वाढविली जाते. संशोधन करण्यासाठी काहीवेळा इतर राष्ट्रांची मदत घ्यावी लागते.

### ४. भूमिचा विस्तार :–

१९ व्या शतकात परराष्ट्र धोरणाचे एक महत्त्वाचे उद्दिष्ट भूप्रदेशाचा विस्तार करणे हा होता. आज भूप्रदेशाचा विस्तार हे परराष्ट्र धोरणाचे सर्वात महत्त्वाचे उद्दिष्ट नसले तरी काही राष्ट्रे परराष्ट्र धोरणातून आपल्या भूमिचा विस्तार करण्याचा प्रयत्न करतात. उदा. विस्तारवादी धोरण स्वीकारून चीने १९६२ साली भारतावर आक्रमण केले.

### क) जागतिक उद्दिष्टये :–

काही वेळा आपल्या राष्ट्राचे हित पाहता जगाच्या कल्याणासाठी जेव्हा एखादे धोरण ठरविले जाते. तेव्हा त्यास जागतिक उद्दिष्टे असे म्हणतात. अशी उद्दिष्टे शक्तिशाली राष्ट्रांकडून ठरविली जातात. उदा. राष्ट्रसंघ, संयुक्त राष्ट्र संघटना (युनो) स्थापन करण्यासाठी इंग्लंड, अमेरिका, फ्रान्स या

राष्ट्रांनी प्रयत्न केल्याचे दिसून येते. त्याचप्रमाणे भारताचे पंतप्रधान पंडित नेहरू यांनी जागतिक शांततेसाठी पंचशील तत्त्वे जगाला अर्पण केली. रशिया आणि अमेरिका यांच्यातील शीतयुद्ध थांबविण्यासाठी तिसऱ्या संघटनेची गारज होती म्हणून अलिप्ततासाठी देशाची संघटना स्थापन करण्यात आली याला जागतिक उद्दिष्टये असे म्हणतात.

## ४.२.४ परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक

अ) भौगोलिक तत्त्वे.

ब) नैसगिक साधने.

क) ऐतिकासिक तत्त्वे.

ड) विचारप्रणाली.

इ) औद्योगिक विकास.

ई) लष्करी शक्ती.

परराष्ट्र धोरण घडवून येण्यासाठी जे घटक कारणीभूत ठरतात. त्याला परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक असे म्हणतात. ते घटक खालीलप्रमाणे आहेत.

**१. भौगोलिक तत्त्वे :-**

कोणत्याही राष्ट्राचे परराष्ट्र धोरण निश्चित होत असताना त्या देशाचे भौगोलिक स्थान फार महत्त्वाचे ठरते. एखादया देशाचे परराष्ट्र धोरण हे असेच का? याचे उत्तर त्या राष्ट्राची भौगोलिक स्थिती आहे. उदा. अमेरिका पहिल्या व दुसऱ्या महायुद्धामध्ये सुरुवातीला सहभागी झाला नव्हता कारण अमेरिका युरोप खंडापासून दूरवर वसले आहे त्यामुळे युरोपीय देश व अमेरिका यांच्यामध्ये फार कमी संबंध निर्माण झाले होते. त्यामुळे कोणताही देश अमेरिकेचा शत्रु नव्हता. दोन्ही महायुद्धात अमेरिकेचे फारसे नुकसान न झाल्याने अमेरिका एक महासत्ता म्हणून उदयास आली.

**२. नैसगिक साधने :-**

कोणत्याही देशाचे परराष्ट्र धोरण हे जसे भौगोलिक स्थानावर अवलंबून असते. तसेच ते नैसगिक साधनावर अवलंबून असते. नैसगिक साधनसामग्रीमध्ये अन्नधान्य व खनिजसंपतीने समृद्ध असतो. त्यांचा फायदा घेऊन अशी राष्ट्रे आपले परराष्ट्र धोरण ठरवित असतात. उदा. खनिज तेलाने समृद्ध असणाऱ्या राष्ट्रांनी एकत्र येऊन 'ओपेक संघटना' निर्माण करून तेलाचे दर स्थिर ठेवण्याचा प्रयत्न होतो अशा संघटना एखाद्या राष्ट्राचे परराष्ट्र धोरणात बदल करण्यास भाग पाडतात.

### ३. ऐतिहासिक तत्त्वे :–

प्रत्येक देशाला एक ऐतिहासिक वारसा असतो. तो लक्षात घेऊन परराष्ट्र धोरण ठरवावे लागते. आपल्या देशाचा परराष्ट्र धोरणांबाबत असणारा इतिहास पूर्णपणे नाकारुन परराष्ट्र धोरण ठरविता येत नाही. उदा. सत्य व अहिंसा, पंचशील तत्त्वे, भारताच्या परराष्ट्र धोरणाची ऐतिहासिक तत्त्वे आहेत. ११ मे १९९८ रोजी भारताने घेतलेली अणुस्फोट आणि त्याचे समर्थन करताना पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी असे म्हटले की, आमची अण्वस्त्रे ही शांतता निर्माण करण्यासाठी आहेत. यावरून लक्षात येते की, भारताचे प्रत्येक धोरण सत्य व अहिंसा याला अनुसरुन आखले जाते.

### ४. विचारप्रणाली :–

दुसऱ्या महायुध्दानंतर जगाची विभागणी विचार प्रणालीच्या आधारेच झाली. रशियात साम्यवादी क्रांती झाल्यानंतर जगात साम्यवादाला प्रसार करणे हे रशियाच्या परराष्ट्र धोरणाचे एक धोरण होते. साम्यवादाच्या विस्ताराला पायबंद घालणे हे अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचे या काळातील सर्वात महत्त्वाचे तत्त्व होते.

### ५. औद्योगिक विकास :–

एखादया राष्ट्राचा औद्योगिक विकास झाला की, त्या राष्ट्राचे आंतरराष्ट्रीय राजकारणातील महत्त्व वाढते. त्या देशांकडून इतराना मदत करून सहानुभूती मिळविण्याचा प्रयत्न केला जातो. जर औद्योगिक विकास झाला नाही तर अशा राष्ट्रांना इतर राष्ट्रांच्या मदतीवर अवलंबून रहावे लागते. त्याचा परराष्ट्र धोरणावर परिणाम होतो. म्हणूनच विकसित राष्ट्रे गरीब, मागासलेले, अविकसित या राष्ट्रांना मदत करून त्यांच्या परराष्ट्र धोरणामध्ये बदल घडवून आणतात.

### ६. लष्करी शक्ती :–

एखादया राष्ट्रांची सत्ता ही खऱ्या अर्थाने लष्करी शक्तीवरच अवलंबून असते. जागतिक राजकारणात लष्करी शक्तीला विशेष स्थान आहे. ज्या राष्ट्राची लष्करी शक्ती मजबूत असते त्याच्याबरोबर इतर राष्ट्रे मैत्री करण्यास उत्सुकता दाखवितात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात लष्करीदृष्टया समर्थ राष्ट्रांचे महत्त्व वाढते. पण कोणत्याही राष्ट्रांची लष्करी शक्ती कायमस्वरुपी नसते. त्यामध्ये सातत्याने बदल होत असतो. उदा. दुसऱ्या महायुद्धापर्यंत इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी ही राष्ट्रे लष्करीदृष्टया प्रबळ होत्या पण दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका व रशिया लष्करीदृष्टया प्रबळ बनले व त्याचे महत्त्व आंतरराष्ट्रीय राजकारणात वाढले. यावरुन असे म्हणता येईल की, लष्करी शक्ती हा परराष्ट्र धोरणाचा एक महत्त्वाचा घटक आहे.

**७. लोकमत :–**

आज कोणत्याही प्रकारची शासनपद्धती असली तरी लोकमताचा आदर करणे आवश्यक असते. परराष्ट्र धोरण ठरवीत असताना लोकांच्या इच्छा आकांक्षा याचा विचार केला जातो. लोकमताच्या विरोधात जाऊन परराष्ट्र धोरण ठरविता येत नाही. उदा. भारतातील लोकमत भांडवलशाहीपेक्षा समाजवादास अधिक अनुकूल आहे. त्यामुळेच आतापर्यंत भारतात लोकशाही असूनही अमेरिकेपेक्षा रशिया अधिक जवळचा वाटतो.

**८. धोरण निर्धारक :–**

परराष्ट्र धोरण ठरविताना एखादया राष्ट्रातील धोरण निर्धारक यांचा परिणाम प्रकर्षाने जाणवतो. एखाद्या धोरण निर्धारकाचे व्यक्तिमत्व परराष्ट्र धोरण निश्चित होण्यास कारणीभूत ठरत असते. उदा. भारताचे अलिप्तता वादाचे धोरण यावर पंडित नेहरु यांचाच प्रभाव होता. तसेच काही राजदूत सुद्धा आपल्या कौशल्याने परराष्ट्र धोरणावर वेगळा ठसा उमटवितात. उदा. भारताचे माजी राष्ट्रपती राधाकृष्णन व के.आर. नारायणन यांनी राजदूत म्हणून आपला एक वेगळा ठसा उमटविला आहे.

**९. कायदेमंडळ :–**

परराष्ट्र धोरण ठरविण्याचे कार्य कार्यकारी मंडळाचे असते. मात्र कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवण्याचे कार्य कायदेमंडळ करीत असते. कार्यकारी मंडळाने घेतलेल्या निर्णयाला कायदेमंडळाने संमती देणे आवश्यक असते. जर विरोध केला तर कार्यकारी मंडळाला धोरणात बदल करावा लागतो. उदा. ११ सप्टेंबर २००१ रोजी अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटर वर अतिरेक्यांनी हल्ला केला. त्यानंतर तालिबान विरोधात कोणते धोरण अवलंबायचे यासाठी अमेरिकेच्या सिनेटमध्ये चर्चा करून संमती दिल्यानंतर अफगाणिस्तानमध्ये कारवाई करण्यात आली. तसेच सिनेटच्या मान्यतेअभावी अमेरीका राष्ट्रसंघामध्ये सहभागी होऊ शकली नाही.

**१०. लोकसंख्या :–**

पूर्वी जास्त लोकसंख्या असलेल्या राष्ट्रांना फार महत्व होते. कारण नेहमी कोठे ना कोठे युद्ध होत असे. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात सैनिक मारले जात म्हणून मोठ्या प्रमाणात सैनिकांची भरती करावी लागत असे. कोणत्याही राष्ट्राचा तंत्रज्ञानामध्ये फारसा विकास झाला नसल्याने अधिक सैनिक असतील त्या देशाला विजयाची खात्री होती. त्यामुळे अधिक सैन्य प्राप्त करण्यासाठी देशाची लोकसंख्या जास्त असणे गरजेचे होते. आज परिस्थिती बदलली आहे. अत्याधुनिक शस्त्रात्रे, वेगवेगळया संशोधनामुळे जास्त लोकसंख्येची गरज राहिलेली नाही. उलट जास्त लोकसंख्या आज अपायकारक आहे म्हणून लोकसंख्या हा परराष्ट्र धोरणावर परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे.

**११. आंतरराष्ट्रीय संस्था किंवा संघटना :–**

पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रसंघ व दुसऱ्या महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्र संघटना (णछज) या आंतरराष्ट्रीय संघटना निर्माण झाल्या. या संघटनानी आंतरराष्ट्रीय व्यवस्था व्यवस्थित होण्यासाठी काही नियम तयार केले. प्रत्येक राष्ट्राने या नियमाचे पालन करणेचे ठरविले. जर एखाद्या राष्ट्राचे धोरण या संघटनेच्या कायदयाच्या विरोधात असेल तर आंतरराष्ट्रीय संघटना प्रभाव मोठया प्रमाणात पडतो.

**१२. जागतिक लोकमत :–**

एखादया राष्ट्राच्या परराष्ट्र धोरणावर त्याच राष्ट्रांतील लोकमताचा प्रभाव असतो. त्याप्रमाणे जागतिक लोकमताचा प्रभाव ही परराष्ट्र धोरणावर पडत असतो. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राने परराष्ट्र धोरण ठरविताना जागतिक लोकमताचा विचार ही करावा लागतो. उदा. तालिबान आणि अमेरिका यांच्या दरम्यान निर्माण झालेला संघर्ष हे धोरण ठरविण्या अगोदर अमेरिकेचे राष्ट्राध्याक्ष जॉर्ज बुश यांनी जागतिक लोकमत आपल्या बाजूने करण्यासाठी अनेक देशांच्या प्रमुखांशी चर्चा केली. यावरुन जागतिक लोकमताचा परराष्ट्र धोरणावर असणारा प्रभाव दिसून येतो.

अशा प्रकारे परराष्ट्र धोरणांचे अनेक निर्धारक घटक आहेत.

## ४.२.५ परराष्ट्र धोरणाची भूमिका

आंतरराष्ट्रीय राजकारणात सहभागी झालेल्या प्रत्येक राष्ट्रास निश्चित भूमिका घेऊन आपले परराष्ट्र धोरण निर्धारीत करावेच लागते. आजच्या परस्परावलंबी जगात इतर देशाशी वेगवेगळ्या पातळीवर संबंध प्रत्येक राष्ट्रास ठेवावे लागतात. देशांतर्गत गरजा विचारात घेऊन एक देश दुसऱ्या देशांशी आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, तांत्रिक, लष्करी, व्यापारी इत्यादी प्रकारचे संबंध ठेवत असतो. देशातील राज्यकर्त्या व्यक्ती, पक्ष, दबावगट, लोकमत, कायदे मंडळ इत्यादीच्या प्रभावातून परराष्ट्र धोरण आकाराला येते. लोकांच्या इच्छा आकांक्षा विचारात घेऊन त्याची पूर्तता करण्यासाठी शासन विविध देशांशी विविध प्रकारचे संबंध निर्माण करत असते. आंतरराष्ट्रीय संस्था संघटनाशी नागरिक शांतता व सहकार्यासाठी संबंध ठेवले जातात. प्रत्येक देशाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडून देशाच्या परराष्ट्र धोरणाचे मुलाधार विचारात घेऊन तज्ञाच्या मार्गदर्शनाने हे संबंध ठेवले जातात. बदलत्या परिस्थितीनुसार त्यामध्ये बदल केले जातात, यावरच त्या देशाच्या परराष्ट्र धोरणाचे यशापयश अवलंबून असते. परराष्ट्र धोरणात निश्चित भूमिका घेणे, ती सातत्यपूर्ण वटवणे, देशाच्या हिताचे असते, त्यातून त्या राष्ट्राची आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रतिमा निर्माण करण्यास कारणीभूत ठरत असते, त्यातून त्या राष्ट्राची विश्वासार्हता वाढीस लागून प्रतिष्ठा प्राप्त होते.

### ४.२.६ राजनय

❑ **प्रस्तावना :-**

जगातील सर्व प्राचीन कलांपैकी राजनय ही एक कला म्हणून ओळखली जाते. आंतरराष्ट्रीय संबंध निर्धारीत करण्याचे परराष्ट्र धोरण एक माध्यम आहे. आणि ते साध्य करण्यासाठी वापरण्यात आलेले आधुनिक साधन म्हणून राजनयाकडे पाहिले जाते. राष्ट्राराष्ट्रात अनुकूल संबंध निर्माण करणे व ते कायम टिकविणे ही अत्यंत अवघड प्रक्रिया असते आणि राजनय ही प्रक्रिया पार पाडण्याचे प्रभावी साधन बनले आहे. म्हणून हॅन्स जे मॉर्गेन्थॉ यांनी असे म्हटले आहे की, आंतरराष्ट्रीय शांततेला अनुकूल वातावरण निर्माण करण्याचे राजनय हे एक अस्त्र आहे.

❑ **राजनयाचा अर्थ/व्याख्या :-**

राजनय याला इंग्रजीत Diplomacy असे म्हणतात. Diplor (डिप्लोर) या ग्रीक शब्दापासून बनला आहे. त्याचा अर्थ मोडणे किंवा घडी करणे असा आहे. आजच्या कालखंडात राजनय म्हणजे शांततापूर्ण सहअस्तित्व, सहकार्य, मैत्रीपूर्ण व्यवहार असा अर्थ लावला जातो. राजनय किंवा राजनीती म्हणजे वाटाघाटी करून आंतरराष्ट्रीय संबंधाचे व्यवस्थापन करणे किंवा अशी पद्धती की जिच्यामार्फत हे संबंध सोईस्कर करणे किंवा त्यांचे व्यवस्थापन करणे होय. राष्ट्रशक्तीच्या विकासात सर्वात मोठी भर घालणारे साधन म्हणजे राजनय होय. तो आंतरराष्ट्रीय संबंध स्थापन करण्याचा एक उत्तम मार्ग होय. राष्ट्राजवळ अन्न, खनिजे, सैन्यशक्ती आहे पण जर त्यांच्याजवळ चांगल्या प्रकारचे नेतृत्त्व करणारे राजनीतीचे कसब नसेल तर त्या राष्ट्राचा सर्व विकास खोळंबतो. म्हणूनच एच्. जे. मॉर्गेन्थॉ सुचवितात राजनयाचा प्राथमिक उद्देश शांततापूर्ण मार्गाद्वारे राष्ट्रहिताची वृद्धी करणे हा असतो. राजनयाचे अनेक प्रकार आहेत. जुना व नवा राजनय, हुकूमशाही व लोकशाही राजनय, परिषद राजनय, गुप्त व उघड राजनय, सांसदीय राजनय, व्यक्तिगत व शिखर राजनय, परिषद राजनय, गुप्त व उघड राजनय, सांसदीय राजनय, व्यक्तिगत व शिखर राजनय असे राजनयाचे विविध प्रकार सांगता येतील, त्या सर्वांचा उद्देश स्वदेशाचे परराष्ट्रीय धोरण कार्यक्षमतेने राबविणे हाच असतो. राजनय राबविणाऱ्या राजनीतिज्ञालाही या संदर्भात महत्वपूर्ण कामगिरी पार पाडावी लागते. अशा राजनीतिज्ञाला आपल्या देशाचे प्रतिनिधीत्व करणे, वाटाघाटी करणे, चांगले हितसंबंध स्थापन करणे इत्यादी कामे करावी लागतात. कोणत्याही राष्ट्रापुढे आंतरराष्ट्रीय राजकारणाबाबत प्रमुख तीन पर्याय असतात. १) युद्ध पुकारणे, २) राष्ट्रहितास तिलांजली देणे, ३) राजनीतीचा वापर करणे जशी परिस्थिती असेल त्यानुसार वरीलपैकी एका पर्यायाची निवड शासनप्रमुख करीत असतो. राजनीतीचा वापर करणे हा सर्वोत्तम पर्याय मानला जातो. परंतु जोपर्यंत शांततेच्या काळात राजनीती अधिक प्रभावी ठरु शकते. आजचे युग अणुयुग आहे. अनेक विध्वंसक शक्ती निर्माण करण्यात बडया राष्ट्रांना यश प्राप्त झाले

आहे. परंतु, जोपर्यंत शांतता स्थापन करण्याचा मार्ग त्यांना सापडलेला नाही तोपर्यंत कोणत्याही परराष्ट्रीय धोरणाच्या संदर्भात राजनयाचे महत्त्व कमी होणार नाही. किंबहुना परराष्ट्रीय धोरण कुशलतेने व कार्यक्षमतेने राबविणारी यंत्रणा म्हणजेच राजनय पद्धती होय. राजनैतिक संबंध बऱ्याचदा दुरावत पण ते तात्पुरते दुरावत असतात. कालांतराने त्यात सुधारणा होऊ शकते. उदा. भारत-पाक संबंध मध्यंतरी पूर्णपणे बिघडले होते. परंतु युद्धविरामानंतर ते सुधारण्यात उभय राष्ट्रांचे राजनैतिक प्रतिनिधी यशस्वी झाले आहेत. लोकांचा विश्वास, वाहतूक सुधारणा, बदलते राजकरण, सत्तासमतोलाचे महत्त्व इत्यादी कारणांनी राजनयावर जरी काही प्रमाणात मर्यादा येत असल्या तरी परराष्ट्रीय धोरणाच्या संदर्भात राजनयाचे महत्त्व अद्यापही कमी झालेले नाही. अयोग्य प्रचार, आंदोलने, दहशती, फसवणूके इत्यादी अडथळयांना समर्थपणे तोंड देऊन राजनीतिज्ञ आंतरराष्ट्रीय शांतता स्थापन करण्याच्या प्रक्रियेत विधायक कामगिरी पार पाडत आहेत.

**१. हॅन्स जे. मॉर्गेन्थॉ :** 'राजनयाचा प्राथमिक उद्देश, शांततापूर्ण मार्गाद्वारे राष्ट्रहिताशी वृद्धी करणे होय.'

**२. क्विन्सी राईट :** 'बुद्धी आणि चातुर्य यांच्या सहाय्याने बोलणी करून कमीत-कमी हानी स्वीकारून जास्तीत जास्त उद्दिष्ट पूर्ण करण्याची कला म्हणजेच राजनय होय.'

**३. सर अर्नेस्ट सांतो :** 'स्वतंत्र राज्याच्या शासनामध्ये किंवा अंकीत राज्याच्या अधिकृत संबंधाबाबत उपयोगात आणला जाणरा बुद्धी व चातुर्य यांचा प्रयोग म्हणजे राजनय होय.'

**४. ऑक्सफोर्ड इंग्लिश शब्दकोश :** 'राजनय म्हणजे वाटाघाटी करून आंतरराष्ट्रीय संबंधाचे व्यवस्थापन करणे.'

**५. आर्गेन्सकी :** 'दोन किंवा दोनपेक्षा अधिक देशांच्या प्रतिनिधीमध्ये होणारी समझोत्याची प्रक्रिया म्हणजे राजनय होय.'

## ४.२.७ राजनयाचे स्वरूप

राजसत्तेच्या काळात राज आपला खासगी दूत इतर राज्यांकडे पाठवत असे. परस्पर राज्यांत सद्भाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात होता. आधुनिक काळातील आंतरराष्ट्रीय संबंध हे अधिक गुंतागुंतीचे बनल्याने राजनयाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे. त्यामुळे त्याचे स्वरुप मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसते.

१) वाटाघाटीच्या मार्गाने आंतरराष्ट्रीय संबंध प्रस्थापित करण्याची राजनय एक पद्धत आहे.

२) परराष्ट्र धोरणाच्या अंमलबजावणीचे राजनय हे तंत्र व साधन होय.

३) आंतरराज्य संबंधाच्या व्यवस्थापनाची पद्धत म्हणजे राजनय होय.

४) राजनय म्हणजे राष्ट्राराष्ट्रांतील वाटाघाटीचे कौशल्य आहे.

५) दोन राष्ट्रांत सलोख्याचे संबंध जुळविण्याची राजनय ही कला आहे.

६) राजनय हा इतरांना न दाखविता राष्ट्रहित साध्य करण्याचा एक मार्ग आहे.

७) राजनय हे शांतता व युद्ध अशा दोन्ही परिस्थितीत उपयुक्त ठरणारे साधन होय.

८) शांततापूर्ण पद्धतीने राष्ट्रीय हितसंबंधाची वृद्धी करण्याचे साधन म्हणजे राजनय होय.

म्हणून आधुनिक काळात प्रशिक्षित व व्यावसायिक राजदूत ही गरजेची बाब झाली आहे.

## ४.२.८ राजनयाची उद्दिष्टे

१) आपल्या विरुद्ध अन्य राष्ट्रे एकत्र येऊन गट निर्माण करीत असतील तर तो प्रयत्न सफल होणार नाही याची काळजी घेणे.

२) युद्धकाळात आपल्या राष्ट्राने सुरु केलेले युद्ध हे न्यायावर आधारीत आहे हे जगातील इतर राष्ट्रांना पटवून देणे.

३) राजनयाचे सर्व प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतरच युद्धाची सुरुवात करणे.

४) मित्र राष्ट्रांबरोबर संबंध दृढ करणे.

५) ज्या राट्रांबरोबर मतभेद असतील त्या राष्ट्राबाबत अलिप्ततेच्या धोरणाचा स्वीकार करणे.

६) राष्ट्राच्या आर्थिक आणि व्यापार हिताची वाढ करणे, त्यासाठी नवीन बाजारपेठा शोधणे, तांत्रिक ज्ञान, नवीन तंत्र, यंत्र, संपत्ती इतर राज्याकडून मिळविणे.

## ४.२.९ राजनयाची कार्ये

राजदूताना दोन्ही शासनातर्फे प्रवक्ते म्हणून कार्य करावे लागते. काहीवेळा त्यांना 'टेलिफोन गर्ल' असे म्हटले जाते. वाटाघाटी करणे व आपल्या राष्ट्राचे हितसंबंध सुरक्षित ठेवणे हे प्रमुख कार्य असते. म्हणून राजदूत हे त्यांच्या शासनाचे कान व डोळे समजले जाते. प्रामुख्याने राजनयज्ञाना पुढील कार्ये करावी लागतात.

### १. प्रतिनिधीत्व करणे :-

आंतरराष्ट्रीय क्षेत्रात आपल्या देशाचे यशस्वी प्रतिनिधत्व करणे हे राजदुताचे प्रमुख कार्य आहे. त्याची नियुक्ती सरकारकडून होत असली तरी जनतेच्या इच्छा, आकांक्षा याचे प्रतिनिधित्व करावे लागते. राजदूत हा आंतरराष्ट्रीय राजकारणाचा जाणकार तज्ञ, संयमी, व्यासंगी व निर्णय क्षमता

असणारा असावा लागतो. कारण राजदूतांनी दिलेली माहिती हे परराष्ट्र धोरणाचे खरे गमक असते. राजनयज्ञाची माहिती अधिकृत मानूनच परराष्ट्र धोरणांची दिशा निश्चित केली जाते.

**२. वाटाघाटी करणे :-**

राजदूत हा दोन राष्ट्रांना साधणारा दुवा असतो. संबंध बिघडू नये किंवा बिघडलेले संबंध सुरळीत करण्यासाठी योग्य वाटाघाटी करण्याचे महत्त्वाचे कार्य राजदूताना करावे लागते. युद्ध, शांतता, दळणवळण, तांत्रिक मदत इ. क्षेत्राबाबत वाटाघाटी घडवून तह आणि करार करणे. पण आधुनिक काळात, परिषद व शीखर राजनयाचा वाढता वापर व प्रसार माध्यमांच्या प्रभावामुळे वाटाघाटी करण्याचे राजदूतांचे कार्य मर्यादित होऊ लागले आहे. सद्या राष्ट्रप्रमुख व परराष्ट्र मंत्री यांच्या मार्फतच तह, करार केले जात आहेत.

**३. अहवाल सादर करणे/निवेदन देणे :-**

आपल्या सरकारला अहवाल सादर करण्याची महत्त्वाची कामगिरी राजदूताला पार पाडावी लागते. राजदूताने पाठविलेला अहवाल किंवा निवेदन परराष्ट्र धोरणाचा कणा असतो. ज्या देशात राजदुताची नेमणूक झाली असेल त्या देशाच्या परिस्थितीचे सुक्ष्म व अचूक अवलोकन करून अहवाल तयार करावा लागतो. परिपूर्ण राजदूत हा आपल्या सरकारच्या परराष्ट्र धोरणांचा सल्लागार व मार्गदर्शक असतो. प्रसार माध्यमे, प्रत्यक्ष संपर्क, निरिक्षण या माध्यमातून राजदूत माहिती संकलित करीत असतो.

**४. संघर्षापासून परावृत्त करणे :-**

राजनय अपराधी ठरला तर संघर्ष अपरिहार्य होतो. कुशल राजदूत चातुर्याने, मुत्सदीपणे संघर्ष टाळण्याचा प्रयत्न करीत असतो. अन्यथा संघर्षाचा परिणाम युद्धात होऊ शकतो. याची जाणीव राजदूताला असते. म्हणजेच राजदूताला युद्धापासून एखाद्या देशाला परावृत्त करण्याचे कार्य करावे लागते.

**५. स्वदेशीयांची सुरक्षितता :-**

राजनयाचे सर्वात महत्त्वाचे कार्य म्हणजे आपल्या देशाचे नागरिक शिक्षण, नोकरी, उद्योग, व्यवसाय, पर्यटन इ. कारणासाठी बाहेरच्या देशात गेलेल्या स्वदेशीयांचे रक्षण करणे हा आहे. परंतु बऱ्याचवेळा वंशवाद, विषमता यामुळे त्यांच्यावर अन्याय होतो. नागरिकत्वापासून वंचित ठेवले जाते. अशावेळी स्वकीय नागरिकांचे प्रश्न सोडवून त्यांचे संरक्षण करणे हे राजदूताचे कार्य आहे.

**६. प्रादेशिक अखंडत्वाचे रक्षण करणे :-**

प्रत्येक देशाच्या अस्मितेचा प्रश्न त्या देशाच्या प्रादेशिक अखंडत्वाशी निगडित असतो. आपल्या देशाच्या सार्वभौमत्वाला कोणताही धोका निर्माण होणार असेल तर जागतिक लोकमत कसे

अनुकूल होईल याची काळजी राजनयज्ञाला घ्यावी लागते. उदा. काश्मिर प्रश्नांसंबंधी अनेकवेळा जागतिक लोकमत आपल्या बाजूने करण्याचा प्रयत्न राजनयज्ञानी केला आहे.

**७. इतर कार्ये :–**

वरील महत्त्वाच्या कार्याशिवाय राष्ट्रांच्या धोरणविषयक निर्णयप्रक्रियेत सहभागी होणे, दोन राष्ट्रांत सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करणे, दोन राष्ट्रात मैत्री व सहकार्य वृद्धींगत करण्यास प्रयत्न करणे, संघर्ष निवारण इ. काही कार्ये ही राजनयाला पार पाडावी लागतात.

## ४.२.१० राजनयाचे प्रकार

बदलत्या आंतरराष्ट्रीय परिस्थितीनुसार सामान्यत: राजनयाचे दोन प्रकार पडतात. १) जुना राजनय, २) नवा राजनय या दोन प्रकारामध्ये थोडा फरक आहे. तरी दोन्ही राजनयाचा उद्देश समान आहेत. त्यामुळे या दोन प्रकारांना राजतांत्रिक व लोकतांत्रिक राजनय असे म्हटले जाते.

**१. जुना राजनय :–**

या राजनयाला अतिशय जुना असा इतिहास आहे. जगात हुकुमशाही व राजेशाहीच्या काळात जुना राजनय पद्धती अस्तित्वात होती. राजाने वैयक्तिक हितसंबंध सुरक्षित राखणे हा जुन्या राजनयाचा मुख्य हेतू होता. पहिले महायुद्ध संपेपर्यंत जुना राजनय लोकप्रियतेच्या शिखरावर होता असे हेरॉल्ड निकोल्सन यांनी आपल्या 'डिप्लोमसी' या ग्रंथात नमूद केले आहे.

**❑ जुन्या राजनयाची वैशिष्टये :–**

जुना राजनय प्रसिद्धीच्या शिखरावर राहण्यास तत्कालिन राजकीय व्यवस्था कारणीभूत होती. सर्वत्र राजेशाही व्यवस्था प्रचलित होती. या शासन प्रकारात राजा हा सर्वश्रेष्ठ असून राजाची सत्ता अमर्याद व निरंकुश होती. जुना राजनय हा केवळ युरोप पुरताच मर्यादित होता. जुन्या राजनयाची काही वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

**१. श्रेष्ठजनशाही :–**

युरोपातील जो निरकुंश राजेशाहीचा कालखंड होता. तत्कालिन समाजव्यवस्थेत श्रेष्ठजनांचा एक वर्ग होता. यात राजघराण्यातील व्यक्ती, त्याचे नातलग, संरजामदार याचा समावेश होता. त्याकाळी त्यांना काही विशेषाधिकार होते. राजदरबारात पदावर हेच लोक असत. राजाबरोबर राजकीय सभेत या वर्गाचा सहभाग असल्यामुळे त्या व्यवस्थेला श्रेष्ठजनशाही म्हणत असत.

**२. गुप्तता :–**

युरोप हे जागतिक राजकारणाचे केंद्र होते. युरोपात त्यावेळी राजेशाही होती. राजेशाहीत राष्ट्रीय

व आंतरराष्ट्रीय धोरणांची माहिती जनतेला देणे हे राज्यकर्त्यावर बंधनकारक नव्हते. राजा हाच आंतरराष्ट्रीय धोरणाचा शिल्पकार असतो. राजनयाची संपूर्णत: जनतेपासून गुप्तता हेच जुन्या राजनयाचे स्वरुप होते.

**३. लवचिकता :–**

नव्या राजनयासारखा जुना राजनय ताठर स्वरूपाचा नव्हता. राजतंत्रातील राजनय फक्त राजा किंवा राजदुताच्या इच्छेवर अवलंबून असतो. तो राजदूत राजाच्या मर्जीतील व विश्वासातील असे म्हणून राजनयाला आपल्या सोयीनुसार वळसा देणे राजाला सहज शक्य होते. त्यामुळे लवचिकता हे जुन्या राजनयाचे महत्वाचे वैशिष्टय होते.

**४. स्वातंत्र्य/स्वायतता :–**

जुन्या राजनयात राजदूतास परराष्ट्र धोरणांच्या बाबतीत बरचे स्वातंत्र्य होते. संपूर्ण राजकारणाची जबाबदारी राजावर असल्यामुळे प्रत्येक प्रश्नाच्या तपशीलात जाण्याइतका वेळ त्यांना नव्हता. राजदूतांनी फक्त राजाची मर्जी व विश्वास संपादन केला की राजूदतांनी घेतलेल्या निर्णयास सहज संमती मिळत असे. पूर्वी दळणवळणाची साधणे आजच्या सारखी नव्हती, त्यामुळे रादूतास त्यांच्या कार्यामध्ये स्वतंत्रता प्राप्त झाली होती.

**❑ जुन्या राजनयाचा ऱ्हास :–**

पहिल्या महायुद्धानंतर जुन्या राजनयाची पिछेहाट सुरु झाली. आणि नवीन राजनय उदयास आला. पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर बहुतांश राष्ट्रातील राजेशाही नष्ट होऊन लोकशाही युगास प्रारंभ झाला. लोकशाही शासन व्यवस्था जनतेला जबाबदार असते. या नवीन शासनप्रणालीमुळे लोकमताचा प्रभाव दिवसेंदिवस वाढत गेला व जुन्या राजनयाच्या ऱ्हासाला सुरुवात झाली.

**२. नवा राजनय :–**

राजेशाही संपली आणि लोकशाही शासनपद्धतीचा उदय झाला. पहिल्या महायुद्धानंतर नवीन स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्रांचा उदय झाला. लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार बहुतांश राष्ट्रांनी केला. या शासनपद्धतीत लोकमताचा प्रभाव शासनावर पडू लागला साहजिकच राजनयाच्या पद्धतीत बदल झाला. त्यातुनच नवा राजनय उदयाला आला. नव्या राजनयाची वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

**१. खुला राजनय/प्रकट राजनय :–**

आधुनिक काळातील राजनय हा खुला किंवा उघड राजनय म्हणून ओळखला जातो. पहिल्या महायुद्धापूर्वी बडया राष्ट्रांनी अनेक गुप्त करार केले होते. त्यामुळे महायुद्ध झाले. म्हणून जुन्या

राजनयावर टिका होऊ लागली. लोकांच्या इच्छेनुसार राजनयिक व्यवहार व्हावेत, तसेच दोन देशातील चर्चा गुप्त न राहता इतर देशांनाही त्याची कल्पना असावी असा विचार होण्यास सुरुवात झाली.

**२. राजनयज्ञांच्या निर्णयावर मर्यादा :–**

नव्या राजनयात राजनयिक प्रतिनिधीच्या निर्णय स्वातंत्र्यावर बऱ्याच मर्यादा पडल्या आहेत. आधुनिक काळात दळणवळण व संपर्काची वाढती साधने यामुळे पूर्वीप्रमाणे स्वातंत्र्य राजनयज्ञांना उरलेले नाही. एवढेच नव्हे तर राजनयज्ञाने केलेल्या करारांना अंतिम संमती ही कायदेमंडळाची असल्याने आजचा राजनयज्ञ स्वतंत्र व्यवहार करू शकत नाही.

**३. प्रशिक्षित राजनय :–**

नवा राजनयामध्ये राजनयज्ञ हा शिकलेला, प्रशिक्षित, अनुभवी परराष्ट्रीय धोरणाचा अभ्यास करणारा असतो. राजनय ही कला असल्याने स्पर्धा परीक्षेमधून त्याची निवड केली जाते. आंतरराष्ट्रीय राजकारणाचे सध्याचे स्वरुप गुंतागुंतीचे असल्याने राजनयज्ञ हा प्रशिक्षित असणे आवश्यक आहे.

**४. कार्यबहुलता :–**

नव्या राजनयात राजनयज्ञाला राजकीय कार्याबरोबर आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, व्यापार, स्वकियांचे रक्षण इ. विविध कार्ये करावी लागतात. त्यामुळे त्यांच्यात कार्यबहुलता दिसून येते.

**५. लोकशाही राजनय :–**

नवा राजनय हा लोकशाही स्वरुपाचा आहे. नव्या राजनयात राजनयज्ञांना देशातील सामान्य जनतेच्या मतांची दखल घ्यावी लागते. त्यामुळे हा राजनय अधिक लोकाभिमुख बनला आहे.

## ❑ जुना व नवा राजनयांतील फरक :–

१. जुना राजनय फक्त युरोपीय राष्ट्रांपुरता मर्यादित होता. नवा राजनय आंतरराष्ट्रीय स्वरुपाचा बनला आहे.

२. जुन्या राजनयात गोपनीयतेवर भर होता. नवा राजनय हा मुक्त किंवा उघड राजनय आहे.

३. जुन्या राजनयात राजनयज्ञ हे समाजातील वरिष्ठ वर्गातून निवडला जात असे. तर नव्या राजनयात राजनयज्ञ हा स्पर्धा परीक्षातून निवडला जातो.

४. जुन्या राजनयात राजनयज्ञाला निर्णय स्वातंत्र्य होते. नव्या राजनयात राजनयज्ञाला निर्णय स्वातंत्र्यावर मर्यादा घातली गेली आहे.

### ३. लोकतांत्रिक राजनय :–

२० वे शतक हे 'लोकशाहीचे युग' म्हणून ओळखले जाते. त्यामुळे लोकशाही राजनय हा राजनयाचा आणखी एक महत्वाचा प्रकार आहे. ब्रिटन ही 'लोकशाहीची जननी' मानली जाते. हा राजनय अधिक मुक्त आणि अधिक लोकाभिमुख असतो.

### ❑ लोकतांत्रिक राजनयाची वैशिष्ट्ये :–

### १. तह/करारातील रचनांचे पालन :–

जुन्या राजनयात तह किंवा करार केले जात होते. त्या करारांचे पालन केले जाईलच असे नव्हते. त्यामुळे जुन्या राजनयातील करार हे भरवशाचे नव्हते. मात्र लोकतांत्रिक राजनयामध्ये घेतलेले निर्णय हे अनेक वर्षे टिकून राहताना दिसतात. लोकांच्या इच्छेनुसार राज्यकर्ते निर्णय घेत असल्यामुळे राज्यकर्ते यांना सहजासहजी एखादया देशाबरोबर केलेला करार मोडता येत नाही. कारण तो करार अप्रत्यक्षरित्या जनतेने केलेला असतो. म्हणून लोकतांत्रिक राजनयामध्ये तह/करारातील रचनाचे पालन केले जाते.

### २. विरोधी प्रचार :–

लोकतांत्रिक राजनयामध्ये जनतेला अधिक महत्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरांवर एखादा निर्णय घ्यावयाचा असेल त्याला जनतेची मान्यता मिळावावी लागते. एखादया राष्ट्राच्या विरोधी जाऊन दुसऱ्या राष्ट्रांशी करार करावयाचा असेल तर प्रथम जनमत अनुकूल करून घेतले पाहिजे. त्यासाठी एखादया राष्ट्रांच्या विरोधात प्रचार केला जातो. उदा. पाकिस्तानमधील राज्यकर्ते जनतेमध्ये भारताविरोधी तर भारतीय राज्यकर्ते पाकिस्तान विरोधी प्रचार करतात.

### ३. चर्चा व वाटाघाटीवर विश्वास :–

पूर्वी दोन देशांच्या विचारामध्ये तफावत निर्माण झाली तर युद्ध केले जात होते. मात्र आज विचारातील विरोधाभास दूर करण्यासाठी एकत्र बसून चर्चा, वाटाघाटीद्वारे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला जातो.

### ४. शिष्टाचार व नम्रता :–

दोन देशामध्ये ज्यावेळी एखादया प्रश्नासंबंधी चर्चा व वाटाघाटी चाललेल्या असतात. त्यावेळी राजदूतांनी शिष्टाचाराचे दर्शन घडविले पाहिजे अशी लोकतांत्रिक राजनयाची अपेक्षा आहे. एखादा प्रश्न सोडवित असताना मतभेद होण्याची शक्यता असे तरीही राजदूताला शिष्टाचार दाखवावाच लागतो. हे एक लोकतांत्रिक राजनयाचे वैशिष्ट्य आहे.

### ५. वाटाघाटी अयशस्वी होऊ शकतात :–

लोकतांत्रिक राजनयामुळे वाटाघाटी अयशस्वी होण्याची शक्यता असते. लोकतांत्रिक राजनयात जनमताचा विचार केला जातो. त्यामुळे एखाद्या प्रश्नावर दोन देशामध्ये एकवाक्यता होण्याची शक्यता असते, मात्र जनमताच्या दबावामुळे काहीवेळा वाटाघाटी अयशस्वी ठरतात तर काही वेळेस जाणीवपूर्वक अयशस्वी केल्या जातात. उदा. काश्मिरचा प्रश्न पाकिस्तान आणि भारतातील राज्यकर्त्यांना, विचारवंताना सुटला असे वाटते पण जनहिताच्या भितीमुळे दोन्ही राष्ट्रांना वाटाघाटी यशस्वी करता येत नाही हा एक महत्वाचा दोष या राजनयाचे आहे.

### ६. निर्णयास विलंब :–

लोकतांत्रिक राजनयामध्ये निर्णय घेताना लोकांच्या मताचा विचार करावा लागतो. शासनाला लोकांना डावलून कोणताही निर्णय घेत येत नाही. कारण शासनात प्रतिनिधी हे लोकांच्याकडून निवडून आलेले असतात. त्यामुळे साहजिकच निर्णय घेताना विलंब लागतो.

### ७. जनतेची दिशाभूल होण्याची शक्यता :–

या राजनयाच्या प्रकारात जनतेची दिशाभूल होण्याची शक्यता असते. कारण काही आंतरराष्ट्रीय निर्णय शासनाला जनमत नसले तरी घ्यावी लागतात. राष्ट्रहिताचा विचार करून जनतेच्या एखाद्या प्रश्नाबाबत संभ्रमात ठेऊन निर्णय घेतले जातात. उदा. भारताच्या परराष्ट्र धोरणात निशस्त्रीकरण झाले पाहिजे असे एक तत्व आहे. पण प्रत्यक्ष भारताची कार्यवाही यामध्ये विसंगती दिसते. हे जेव्हा भारताने NPT व CTBT कराराला विरोध केला तेव्हा दिसून आले आहे.

### ४. शिखर राजनय :–

राजनयातील शिखर राजनय हा एक महत्वाचा प्रकार आहे. त्याला व्यक्तिगत राजनय असेही म्हणतात. शिखर राजनय याचा अर्थ दोन किंवा अधिक राष्ट्रांच्या प्रमुखांचा सहभाग असलेली परिषद होय. ही पूर्णत: नवी पद्धत नाही पण अलिकडील काळात ती अधिक प्रमाणात अवलंबली जात असल्याचे दिसून येते. दुसऱ्या महायुद्धात आणि समाप्तीनंतर अमेरिकेचे अध्यक्ष आणि रशियाचे अध्यक्ष यांच्यात सात शिखर परिषदा झाल्या. तसेच पाकिस्तानचे लष्करशहा परवेझ मुशर्रफ व भारताचे पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्यातीलच आग्रा शिखर परिषद (२००१) आजपर्यंत अशा अनेक शिखर परिषदा झाल्या आहेत.

### ❑ शिखर राजनयातील दोष :–

### अ) राजनय हे राष्ट्रप्रमुखाचे कार्य नाही :–

काही विचारवंताचे मते शासनप्रमुखाचे महत्त्वाचे कार्य हे धोरण ठरविणे आहे. वाटाघाटी

करण्याचे नसते. वाटाघाटी करण्याची जबाबदारी व्यावसायिक राजनयावर सोपविणे योग्य आहे.

**ब) राष्ट्रप्रमुखांना तपशिलवार माहिती नसते :-**

एखादया प्रश्नांसंदर्भात वाटाघाटी व चर्चा करण्यासाठी त्या प्रश्नांची तपशीलवार माहिती असणे आवश्यक असते. पण तशी सविस्तर माहिती राष्ट्रप्रमुख किंवा परराष्ट्र मंत्री यांना असेलच असे सांगता येत नाही.

**क) वाटाघाटी फिस्कटल्यास युद्धाची शक्यता :-**

शिखर राजनय हा सर्वोच्च पातळीवर होत असतो. सर्वोच्च पातळीवर चर्चा अयशस्वी झाली तर त्यातून मार्ग काढणे कठीण होते. शासन प्रमुखांच्यामध्ये एकमत होत नसेल तर राजदूतांना मार्ग काढता येत नाही. त्यामुळे युद्ध होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**ड) विविध पैलूंवर चर्चा होत नाही :-**

शिखर परिषदा अल्पकाळ चालतात. त्यामुळे अल्प काळात अनेक विषयावर सविस्तर चर्चा होऊ शकत नाही. असे अनेक दोष शिखर राजनयात आढळून येतात. तरी आधुनिक काळात अनेक राष्ट्रांनी कमी-अधिक प्रमाणात या राजनयाचा स्वीकार केल्याचे दिसून येते.

**५. हुकूमशाही किंवा सर्वकष राजनय :-**

हुकूमशाही राजनयाची मुहूर्तमेढ १८व्या शतकात रोवली गेली. प्रामुख्याने पहिल्या महायुद्धानंतर जर्मनी व इटली या राष्ट्रांत हुकूमशाही राजनय प्रस्थापित झाले. केवळ विस्तारवादी धोरण हे या राजनयाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. तेथे विचारांचे अस्तित्व नसते. एक पक्ष, एक विचार, एक नेता या तत्त्वानुसार हुकूमशाही राजनय कार्य करीत असते.

- **हुकूमशाही राजनयाची वैशिष्टये :-**

**१. विस्तारवादी धोरण :-**

आपल्या राज्याचा प्रादेशिक विस्तार घडवून आणणे किंवा इतर राष्ट्रांना आपल्या नियंत्रणाखाली ठेवणे हे हुकूमशाहांचे उद्दिष्ट असते. ते उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कोणत्याही टोकाला जाण्याची तयारी असते.

**२. लोकमताची अपेक्षा :-**

सामान्य लोकांना आंतरराष्ट्रीय राजकारणातील काहीच कळत नाही असा राज्यकर्त्यांचा समज असतो. त्यामुळे या राजनयात लोकमताची नेहमीच उपेक्षा केली जाते.

### ३. लोकशाही तत्त्वांना विरोध :–

हुकूमशाही राजनय लोकशाहीतील स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता या तत्त्वांना विरोध करतो. लोकशाही मार्गाने देशापुढील प्रश्न सुटत नाहीत अशी त्यांची भूमिका असते म्हणून लोकशाही प्रक्रियांनाही विरोध केला जातो.

### ४. गोपनियता :–

हुकूमशाही राजनयात गुप्ततेला महत्त्व असते. या राजनयात गुप्त चर्चा, वाटाघाटी यांना महत्त्व असते. आपल्या देशातील जनतेपासून बऱ्याच गोष्टी लपवून ठेवण्याचा प्रयत्न या राजनयामध्ये होतो.

### ५. युद्धाचा पुरस्कार :–

युद्ध हे राज्याचे टॉनिक आहे. त्यामुळे या राजनय पद्धतीत युद्धाचा उघड पुरस्कार केला जातो. हुकूमशहाच्या विस्तारवादी धोरणामुळे युद्धासाठी कारणे किंवा निमित्त शोधण्यावर हुकूमशाही राजनयात भर दिला जातो.

### ६. संसदीय राजनय :–

दुसऱ्या महायुद्धानंतर स्वतंत्र संसदीय शासनपद्धती बरोबर संसदीय राजनयाचा स्वीकार केला आहे. संसदीय राजनय हे नाव अमेरिकेचे परराष्ट्र सचिव डीन रस्क यांनी दिले आहे. संसदीय राजनयामध्ये कायदेमंडळात चर्चा होऊन धोरण ठरविले जाते. त्याप्रमाणे संयुक्त राष्ट्रसंघात ही अशाच पद्धतीने कामकाज चालते. म्हणून या राजनयाला संसदीय राजनय असे म्हणतात.

### ❑ संसदीय राजनयाची वैशिष्ट्ये :–

१) जनमत जागृती आणि लोकशिक्षणाचे कार्य केले जाते.

२) निर्णय घेताना देशात कार्यरत राजकीय पक्ष, दबाव गट यांच्याशी विचारविनिमय केला जातो.

### ❑ संसदीय राजनयातील दोष :–

१) संयुक्त राष्ट्रातील निर्णय बहुमताने घेतले जातात. त्यामुळे काही प्रश्न सुटण्याऐवजी तसेच राहतात.

२) राज्याच्या संसदेचे सर्व सदस्य राष्ट्रहिताचा विचार करतात. तर संयुक्त राष्ट्रातील सदस्य आपापल्या राष्ट्रहिताचा विचार करतात.

३) कोणत्याही समस्येचा खोलवर विचार होत नसल्याने कोणत्याही प्रश्नांचे समाधान होत नाही.

अशाप्रकारे राजनयाचे वरीलप्रमाणे स्थूलमानाने विविध प्रकार आढळतात.

## ४.२.११ राजनयाची भूमिका

आंतरराष्ट्रीय संबंधात राजनयिक कार्यात काही अडथळे निर्माण होत असले तरीही प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत राजनयाचे आपले कार्य यशस्वीपणे पार पाडले आहे. त्यामुळे राजनयाला मानवी कल्याण आणि अस्तित्त्वाच्या दृष्टीने महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले आहे. ते पुढील मुद्यांच्या आधारे सिद्ध होईल.

**१. अविकसित राष्ट्राच्या विकासाला चालना :-**

मुक्त अर्थव्यवस्थेचा स्वीकार आणि मुक्त बाजारपेठ, व्यापार यामुळे आशिया व आफ्रिकेतील अविकसित राष्ट्रांच्या विकासास चालना मिळाली. शिवाय सर्वच राष्ट्रांच्या राष्ट्रीय हितसंबंधात वृद्धी झाली. राजनयनाने राष्ट्रीय हिसंवर्धनाचे महत्त्वपूर्ण कार्य पार पाडले.

**२. हक्काचे व्यासपीठ :-**

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या स्थापनेमुळे नवस्वतंत्र राष्ट्रांना हक्काचे व्यासपीठ प्राप्त झाले. विकसित राष्ट्रांकडे त्यांनी आपल्या विकासासाठी न्याय हक्कांची मागणी केली. त्यांच्यात राजनय प्रस्थापित होऊन मुक्त अर्थव्यवस्थेची निर्मिती करण्यात आली. तसेच मुक्त व्यापारास त्यातून चालना मिळाली.

**३. जागतिक शांततेचे स्वप्न साकार :-**

पहिल्या व दुसऱ्या महायुद्धानंतर राष्ट्राराष्ट्रात सलोख्याचे संबंध प्रस्थापित व्हावेत त्यातून जागतिक शांततेचे स्वप्न साकारले जावे. यासाठी राजनयाद्वारे १९२० मध्ये राष्ट्रसंघाची आणि १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना करण्यात आली. या संघटनांनी शांतता व सुव्यवस्था टिकविण्याचे कार्य केले आहे.

**४. आधुनिक तंत्रज्ञानाचे हस्तांतरण :-**

जागतिक पातळीवर विकसित आणि अविकसित राष्ट्रांमध्ये परस्परावलंबित्त्व प्रस्थापित झाले. त्याद्वारे आधुनिक तंत्रज्ञानाचे हस्तांतरण, व्यापार, आयात-निर्यात, कच्च्या मालाचा पुरवठा, नैसगिक संसाधनांचा उपभोग इत्यादीबाबत सर्वच राष्ट्रांचे हित साध्य झाले. हे राजनयाचे महत्त्वपूर्ण यश होय.

**५. शस्त्रास्त्र स्पर्धा नियंत्रित :-**

राजनयाद्वारे शस्त्रास्त्र स्पर्धा नियंत्रित झाली. नि:शस्त्रीकरण आणि शस्त्रनियंत्रणासाठी राष्ट्राराष्ट्रांत

विभिन्न संधिवार्ता घडवून आणणे राजनयामुळे शक्य झाले. उदा. N.P.T. C.T.B.T. P.N.E. करार करण्यात आले.

**६. सत्ता समतोल :–**

आंतरराष्ट्रीय राजकारणात राष्ट्रा–राष्ट्रांमध्ये सत्तासंतुलन स्थिती व सामूहिक सुरक्षिततेची स्थिती निर्माण करण्यात राजनयाची भूमिका महत्त्वपूर्ण ठरली आहे. त्याद्वारे राष्ट्रांच्या गटांमध्ये समन्वय प्रस्थापित झाला आहे.

**७. शीतयुद्धाची समाप्ती :–**

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि रशिया या दोन महासत्तांमध्ये सुरु झालेल्या शीतयुद्धाची समाप्ती राजनयाद्वारे या राष्ट्रांमध्ये घडून आलेल्या शिखर परिषदा, करार, वाटाघाटी, तणावशैथिल्य या घटनांमुळे झाली. त्यामुळे तिसऱ्या महायुद्धाचा धोका टळला.

**८. नवस्वतंत्र राष्ट्रामध्ये संघटन :–**

पूर्वीच्या उत्तर–दक्षिण संघर्षातून आशिया व आफ्रिकेतील नवस्वतंत्र राष्ट्रांमध्ये संघटन होऊन दक्षिण–दक्षिण संवाद व सहकार्यवृत्ती निर्माण झाली. यामध्ये राजनयाची महत्त्वपूर्ण भूमिका राहिली आहे.

**९. परस्पर सहकार्य :–**

जगाच्या विभागणीतील उत्तरेकडील विकसित युरोपियन राष्ट्रे आणि दक्षिणेकडील अविकसित आशिया व आफ्रिकेतील राष्ट्रे यांच्यात पूर्वीपासून वैमनस्य होते. परंतू वर्तमान काळात राजनयामुळे उत्तर–दक्षिण संवाद निर्माण होऊन त्यांच्यात परस्पर सहकार्य प्रस्थापित झाले. यावरुन राजनयाचे महत्त्व लक्षात येते.

**१०. राजदूताला स्वातंत्र्य :–**

दुसऱ्या महायुद्धानंतर आशिया व आफ्रिका खंडात असलेल्या पाश्चिमात्यांच्या वसाहती असलेल्या राष्ट्रांना वाटाघाटी, करार, तह याद्वारे राजनयातून स्वातंत्र्य प्राप्त झाले. त्यामुळे आशिया व आफ्रिकेतील राजनयाचे महत्त्व वाढले.

**११. युद्धाची समाप्ती :–**

विसाव्या शताकच्या सुरुवातीस हुकूमशाही आणि लोकाशाहीवादी विचार प्रवाहातील संघर्षाची परिणती पहिल्या व दुसऱ्या महायुद्धात झाली. यात लोकशाही राजनयिक मार्गाने प्रश्न सोडवता येऊ

शकतात याची खात्री राष्ट्रांना झाली. त्यामुळे या कालखंडात पहिले व दुसरे महायुद्ध संपुष्टात आणण्यात राजनयाची भूमिका महत्त्वाची मानली जाते.

**१२. राष्ट्रीय हिताची जोपासना :–**

मध्ययुगीन कालखंडात राजनयाचे स्वरूप गुप्त होते. राजनयज्ञाला गुप्तहेराचे कार्य करावे लागत असे. हा राजनय जरी अनैतिक स्वरुपाचा, असत्यावर आधारित असला तरीही राष्ट्रीय हिताच्या दृष्टिकोनातून त्याला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले होते.

**१३. युरोप पुरताच मर्यादित :–**

प्राचीन काळातील राजनयाचे स्वरुप मर्यादित होते. राजा आणि राजघराण्याशी संबंधित असल्याने तो गुप्त पद्धतीने चालत असे. युरोपपुरताच हा राजनय मर्यादीत होता. राज्या–राज्यांतील मैत्रीपूर्ण संबंध वृद्धिंगत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य या काळातील राजनयाने केले आहे.

**१४. मानवी कल्याण :–**

शेवटी सारांश रुपाने राजनयाचे महत्त्व सांगावयाचे झाल्यास असे म्हणता येईल की, राजनयाचे सर्वात महत्वाचे फलित जर काय असेल तर ते म्हणजे मानवी कल्याणाच्या दृष्टीने विश्वशांती प्रस्थापित करण्यात राजनयाला आलेले यश होय.

अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय पातळीवर प्राचीन काळापासून वर्तमान काळापर्यंत राष्ट्राराष्ट्रात सलोख्याचे संबंध प्रस्थापित करून तिसरे महायुद्ध टाळण्याची महत्वपूर्ण भूमिका पार पाडून राजनयाने विश्वशांती टिकविण्याचा प्रयत्न केला आहे. त्या दृष्टिकोनातून राजनयाचे अनन्यसाधारण असे महत्त्व आहे.

## ४.३ सारांश

आधुनिक जगातील कोणतेही राज्य स्वावलंबी नाही. त्यामुळे परस्परावलंबी जगात प्रत्येक राष्ट्रांनी एकमेकांशी परस्पर संबंध ठेवणे आवश्यक आहे. हे संबंध निश्चित करण्याचे कार्य परराष्ट्र धोरण व राजनय करत असते. परराष्ट्र धोरण निश्चित करण्याचे एक महत्त्वाची कला म्हणून राजनयाकडे पाहिले जाते. परराष्ट्र धोरण व राजनय या दोहोच्या माध्यमातून प्रत्येक देश आंतरराष्ट्रीय राजकारणात आपली भूमिका निश्चित करून प्रत्यक्ष आकाराला आणण्याचे कार्य करीत असते.

## ४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. **राष्ट्रहित :** प्रत्येक राष्ट्रांचा स्वत:च्या फायदयाचा दृष्टीकोण.

२. **अलिप्तवाद :** शीतयुद्धाच्या काळात साम्यवादी आणि भांडवलशाही या दोन महासत्तापासून

अंतर ठेऊन राहणारी विचारसरणी.

३. **द्विपक्षीय :** दोन देशामधील.

४. **सार्वभौमत्व :** सर्वश्रेष्ठ.

५. **विदेश :** परराष्ट्र.

६. **पक्ष :** बाजू.

७. **राजनयज्ञ :** परराष्ट्र धोरण निश्चित करणारा अधिकारी.

८. **श्रेष्ठजन :** समाजातील उच्च वर्ग.

९. **कार्यबहुलता :** विविध/अनेक कार्ये.

१०. **लोकतांत्रिक :** लोकांच्या अपेक्षेने चालणारी.

## ४.५ स्वयं-अध्ययन प्रश्न आणि उत्तरे

१. पहिल्या महायुद्धानंतर ............. राष्ट्राने हुकूमशाही राजनयाचा स्वीकार केला.

२. ............. हे राज्याचे टॉनिक आहे.

३. राजनय याला इंग्रजीत ............. असे म्हणतात.

४. शिखर राजनय याला ............. राजनय असेही म्हणतात.

५. संसदीय राजनय हे नाव ............. यांनी दिले आहे.

६. राजदूत याला काहीवेळा ............. असे म्हटले जाते.

७. ब्रिटन ही ............. ची जननी मानली जाते.

८. परवेझ मुशरर्फ व अटलबिहारी वाजपेयी यांच्यात ............. परिषद झाली.

❑ **उत्तरे :-**

*१. जर्मनी, इटली.*

*२. युद्ध.*

*३. Diplomacy.*

*४. व्यक्तिगत राजनय.*

५. *अमेरिकेचे परराष्ट्र सचिव डीन रस्क.*

६. *टेलिफोन गर्ल.*

७. *लोकशाहीची.*

८. *आग्रा शिखर परिषद.*

## ४.६ सरावासाठी स्वाध्याय

❑ **अ) पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. परराष्ट्र धोरण म्हणजे काय? परराष्ट्र धोरणाची उद्दिष्टे स्पष्ट करा?

२. परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक सांगा?

३. राजनय म्हणजे काय सांगून राजनयाची कार्ये विशद करा?

४. लोकतांत्रिक राजनय स्पष्ट करा?

❑ **ब) टीपा लिहा.**

१. जुना राजनय.

२. शिखर राजनय.

३. परराष्ट्र धोरणांचे स्वरुप.

४. हुकूमशाही राजनय.

५. राजनयाची उद्दिष्टये.

६. नवा राजनय.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. **डॉ. वसंत रायपूरकर** *(२००६) : 'आंतरराष्ट्रीय संबंध'*, मंगेश प्रकाशन, नागपूर.

२. **के.सागर, व्ही. बी. पाटील** *(२००९) : 'आंतरराष्ट्रीय राजकारण'*, के. सागर पब्लिकेशन्स, पुणे.

३. **देवळाणकर शैलेंद्र** *(२००५) : 'आंतरराष्ट्रीय संबंध'*, विद्या बुक्स औरंगाबाद.

४. **डॉ. वासंती रासम, डॉ. करिअप्पा खापरे** *(२०११) : 'आंतराष्ट्रीय संबंध आणि राजकारण'*, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

५. **प्रा. सुधाकर कुलकर्णी** *: 'आंतरराष्ट्रीय संबंध'*, विद्याभारती प्रकाशन, लातूर.

६. **प्रा. वराडकर** *(२००१) : 'आंतरराष्ट्रीय संबंध आणि राजकारण'*, विद्या प्रकाशन, नागपूर.

७. **प्रा.डॉ.बी.डी. तोडकर** *(२०१०) : 'आंतरराष्ट्रीय संबंध'*, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

८. **दि. वा. इंदापवार** *(२००८) : 'राजनय'*, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

❑❑❑